**भारतीय रिझर्व्ह बँक**

**RESERVE BANK OF INDIA**

www.rbi.org.in

आरबीआय/2014-15/629

डीएनबीआर(पीडी) सीसी क्र. 037/03.01.001/2014-15 जून 11, 2015

प्रति,

सर्व सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट ठेवी न घेणा-या एनबीएफसी

महोदय,

**महापरिपत्रक. 'सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा धारण न करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व्ह बँक) निर्देश 2015'**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते. वर निर्देश केलेल्या तारखेपर्यंत अद्यावत केलेल्या अधिसूचना डीएनबीआर.009/सीजीएम (सीडीएस)-2015 दि. मार्च 27, 2015 मध्ये दिलेल्या सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://rbi.org.in/) टाकण्यात आली आहे.

आपला विश्वासु,

(सी. डी. श्रीनिवास)

मुख्य महाव्यवस्थापक

अबँकिंय विनियमन विभाग, केंद्रीय कायार्लय, 2 रा मजला, सेंटर 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई 400005

फोन: 22 189131 ; फॅक्स: 22163768 ; ई-मेल: helpdnbr@rbi.org.in

**अनुक्रमणिका**


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| 1 | ह्या सूचनांचे लघु शीर्षक, सुरुवात व लागु असणे |
| 2 | व्याख्या |
| 3 | उत्पन्न ओळख |
| 4 | गुंतवणुकींपासूनचे उत्पन्न |
| 5 | लेखा मानके |
| 6 | गुंतवणुकींच्या लेखा |
| 7 | डिमांड/कॉल कर्जांवरील धोरणाची आवश्यकता |
| 8 | ॲसेट-वर्गीकरण |
| 9 | तरतुदीकरणाच्या आवश्यकता |
| 10 | प्रमाणभूत ॲसेट तरतुदीकरण |
| 11 | ताळेबंदातील प्रकटीकरण |
| 12 | लेखा वर्ष |
| 13 | ताळेबंदाचे शेड्युल |
| 14 | सरकारी सिक्युरिटीजमधील व्यवहार |
| 15 | बँकेच्या वैधानिक ऑडिटरकडून प्रमाणपत्राचे सादरीकरण |
| 16 | कॅपिटल ॲडेक्वसीबाबत आवश्यकता |
| 17 | अबँकीय वित्तीय कंपन्यांच्या स्वतःच्या शेअर्सच्या विरुध्द कर्ज मनाई |
| 18 | एकमेव वस्तूच्या - सुवर्ण अलंकार तारणाविरुध्द कर्जे |
| 19 | सोन्याच्या मालकीबाबत पडताळणी |
| 20 | एलटीव्ही गुणोत्तर काढताना तारण म्हणून स्वीकारलेल्या सोन्याच्या मूल्याचे प्रमाणीकरण |
| 21 | सुवर्ण अलंकारांच्या तारणाविरुध्द कर्ज देणा-या अबँकीय वित्तीय कंपन्यांनी अनुसरावयाचे सुरक्षा उपाय |
| 22 | एक हजारापेक्षा अधिक शाखा उघडणे |
| 23 | शेअर्सच्या सिक्युरिटीविरुध्द कर्जे |
| 24 | कर्ज/गुंतवणुकींची घनता |
| 25 | पत्ता, संचालक, ऑडिटर्स इत्यादींमधील बदलाबाबत सादर करावयाची माहिती |
| 26 | भागीदारी कंपन्यांमध्ये एनबीएफसींची भागीदारी नसणे |
| 27 | अग्रिम राशींची पुनर्रचना करण्यासाठीचे नॉर्म्स |
| 28 | पायाभूत सोयीव कोअर उद्योगांसाठीच्या दीर्घ मुदतीच्या कर्जांची लवचिक पुनर्रचना |
| 29 | ‘ब्रँच इन्फो’ अहवाल सादर करणे |
| 30 | अपवाद |
| 31 | स्पष्टीकरणे |
| 32 | रद्द करणे व जतन करणे |
| 33 | जोडपत्र |

**भारतीय रिझर्व्ह बँक**

**अबँकीय विनियमन विभाग**
**केंद्रीय कार्यालय, केंद्र-1, वर्ल्ड ट्रेड सेंटर**
**कफ परेड, कुलाबा, मुंबई – 400005**

**अधिसूचना क्र. डीएनबीआर.009/ सीजीएम (सीडीएस)-2015 दि. मार्च 27, 2015**

जनतेच्या हितासाठी तसे करणे आवश्यक असल्याचा विचार करुन व देशाच्या लाभासाठी कर्ज प्रणाली विनियमित करण्यासाठी ह्या बँकेला साह्य करण्यासाठी, खाली दिलेले प्रुडेंशियल नॉर्म्स बाबत हे निर्देश देणे आवश्यक असल्याबाबत तिचे समाधान झाले असल्याने, ह्याबाबत तिला दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि अधिसूचना डीएनबीएस.*193/डीजी(व्हीएल)-2007* दि. फेब्रुवारी 22, 2007 रद्दबातल करुन, भारतीय रिझर्व्ह बँक खाली विहित केलेले निर्देश देत आहे.

**ह्या सूचनांचे लघु शीर्षक, सुरुवात व लागु असणे**

(1) (1) ह्या निर्देशांना '**सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या व न धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व्ह बँक) निर्देश, 2015'** म्हटले जाईल.

(2) हे निर्देश ताबडतोब जारी होतील.

(3) (1) ह्या नंतर दिलेल्या खंड (2) (3) व (4) मध्ये दिलेल्या तरतुदी सोडल्यास, ह्या निर्देशातील तरतुदी, ठेवी न स्वीकारणा-या/न धारण करणा-या आणि शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार रु.500 कोटी व त्यावरील ॲसेट आकारमान असलेल्या प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनीला लागु असतील.

(2) परिच्छेद 25 मधील तरतुदी सोडून, हे निर्देश, कंपनी अधिनियम 2013 (2011 चा 18) च्या कलम 2 च्या खंड (45) खाली व्याख्या केलेल्या व ठेवी न स्वीकारणा-या/न धारण करणा-या, सरकारी अबँकीय वित्तीय कंपनीला लागु असणार नाहीत. *

(3) ह्या निर्देशाच्या परिच्छेद 15, 16 व 24 मधील तरतुदी, सीआयसी निर्देशांमध्ये व्याख्या केलेल्या सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट कोअर इनवेस्टमेंट कंपनीला लागु असणार नाहीत.

---

* सरकारी कंपन्यांना डीएनबीएस.पीडी/सीसी.क्र.86/03.02.089/2006-07 दि. डिसेंबर 12, 2006 अन्वये सांगण्यात आले होते की, त्यांनी सरकारशी सल्लामसलत करुन एनबीएफसी विनियमांच्या विविध पैलूंचे पालन करण्याबाबत एक योजना तयार करुन, ती रिझर्व्ह बँकेला (अबँकीय पर्यवेक्षक विभाग - डीएनबीएस) सादर करावी.

(4) ह्या निर्देशाच्या परिच्छेद 8, 9 व 24 मधील तरतुदी, अबँकीय वित्तीय कंपन्या - सूक्ष्म वित्त संस्था (रिझर्व्ह बँक) निर्देश, 2011 मध्ये व्याख्या केलेल्या एनबीएफसी-एमएफआय ला लागु असणार नाही.

**व्याख्या**

(2) (1) ह्या निर्देशांसंबंधाने, अन्य संदर्भ नसल्यास -

(1) "ब्रेक अप व्हॅल्यु" म्हणजे, इक्विटी भांडवल व राखीव निधी वजा अमूर्त ॲसेट्स व पुनर् मूल्यमापन राखीव निधी भागिले निवेशक कंपनीच्या इक्विटी शेअर्सची संख्या

(2) 'कॅरियिंग कॉस्ट' म्हणजे, ॲसेट्सचे पुस्तकी मूल्य व त्यावर जमा झालेले परंतु प्राप्त न झालेले व्याज.

(3) 'कंपनीज इन दि ग्रुप' (गटातील कंपन्या) म्हणजे, पुढीलपैकी कोणत्याही नात्याने एकमेकींशी संबंधित असलेल्या दोन किंवा अधिक संस्था असलेली व्यवस्था - सहाय्यक - मूलभूत (पेरेंट) (एएस 21 नुसार व्याख्या केलेल्या) संयुक्त उद्योग (एएस 27 नुसार व्याख्या केलेल्या), संगत (एएस 23 नुसार व्याख्या केलेल्या), प्रायोजक-प्रायोजित (सेबी (ॲक्विझिशन ऑफ शेअर्स अँड टेक ओव्हर) विनियम 1997 मध्ये दिल्यानुसार), सूचिबध्द कंपन्यांसाठी, एस संबंधित पक्ष, (एएस 18 नुसार व्याख्या केलेल्या), सामान्य ब्रँड नावे व 20 टक्के व त्यापेक्षा जास्त इक्विटी शेअर्समधील गुंतवणुक.

(4) 'कंडक्ट ऑफ बिझिनेस रेग्युलेशन्स व्यवसायिक विनियम अनुसरण - उचित आचार संहिता व तुमचा ग्राहक जाणा ह्यावर ह्या बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचना.

(5) 'करंट इनवेस्टमेंट'. विद्यमान गुंतवणुक - म्हणजे अशी गुंतवणुक की जी स्वभावतः सहज वसुल करता येते व ती गुंतवणुक केल्याच्या तारखेपासून एक वर्ष पर्यंतच धारण करता येण्यासारखी असते.

(6) 'कस्टमर इंटरफेस' - ग्राहक संपर्क - म्हणजे, ग्राहक एनबीएफआयचा व्यवहार करत असताना, एनबीएफसी व तिचे ग्राहक ह्यामधील दळणवळण.

(7) 'शंकास्पद ॲसेट' म्हणजे अशा

(अ) एक मुदत कर्ज किंवा
(ब) एक लीज ॲसेट किंवा
(क) हायर परचेस ॲसेट किंवा
(ड) कोणताही एखादा ॲसेट

की जो, मार्च 31, 2015 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी '18 महिन्यांपेक्षा अधिक', मार्च 31, 2016 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी '16 महिन्यांपेक्षा अधिक', मार्च 31, 2017 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी '14 महिन्यांपेक्षा अधिक' आणि मार्च 31, 2018 रोजी व त्यानंतर संपणा-या वित्तीय वर्षासाठी '12 महिन्यांपेक्षा अधिक' सबस्टँडर्डॲसेट म्हणून राहतो.

(8) 'अर्निंग व्हॅल्यु' म्हणजे, कर वजा केल्यावर फायद्यांची सरासरी वजा प्रिफरन्स डिव्हिडंड, आणि मागील तीन वर्षांसाठी एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी व नॉन रिकरिंग बाबींसाठी समायोजन, भागिले निवेशक कंपनीच्या इक्विटी शेअर्सची संख्या व पुढील दराने भांडवलीकृत केलेले एखाद्या इक्विटी शेअरचे मूल्य.

(अ) मुख्यत्त्वेकरुन उत्पादन करणा-या कंपनीसाठी आठ टक्के.
(ब) मुख्यत्त्वेकरुन ट्रेडिंग करणा-या कंपनीसाठी दहा टक्के आणि
(क) अबँकीय वित्तीय कंपनीसह अन्य कोणत्याही कंपनीसाठी बारा टक्के.

टीप :- निवेशक कंपनी तोटा झालेली कंपनी असल्यास अर्निंग व्हॅल्यु शून्य धरले जाईल.

(9) 'फेअर व्हॅल्यु' म्हणजे अर्निंग व्हॅल्यु व ब्रेक अप व्हॅल्यु ह्यांचा मध्य.

(10) 'हायब्रिड डेट' म्हणजे असा एक भांडवली संलेख की ज्यात इक्विटी व कर्ज ह्या दोन्हीची काही लक्षणे असतात.

(11) 'इन्फ्रास्ट्रक्चर वित्त कंपनी' म्हणजे पुढील निकष पूर्ण करणारी व ठेवी न घेणारी एनबीएफसी.

(अ) तिच्या एकूण पैकी 75% ॲसेट्स हे 'इन्फ्रास्ट्रक्चर कर्जात' वापरण्यात आले आहेत.
(ब) तिचा नक्त स्वतःचा निधी रु.300 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक आहे.
(क) क्रिसील, फिच, केअर, आयसीआरए, ब्रिकवर्क रेटिंग इंडिया प्रा.लि. (ब्रिकवर्क) ह्यांच्या त्या सममूल्य किंवा किमान अ क्रेडिट रेटिंग किंवा आरबीआयने मान्यता दिलेल्या अन्य क्रेडिट रेटिंग कंपनीने दिलेले सममूल्य रेटिंग.
(ड) 15% चा सीआरएआर (किमान टायर 1 भांडवल 10% सह)

स्पष्टीकरण :- धनकोंनी (म्हणजे एनबीएफसी) त्यांच्या कर्जदारांना, पुढील इन्फ्रास्ट्रक्चर पोट-विभागांमधील एक्सपोझर्ससाठी दिलेली कर्ज सुविधा 'इन्फ्रास्ट्रक्चर कर्ज' म्हणून समजली जाईल.

| **अनु क्रमांक** | **वर्ग** | | **इन्फ्रास्ट्रक्चर पोट-विभाग** |
|---|---|---|---|
| 1 | वाहतूक | 1 | रस्ते आणि पूल |
| | | | बंदर 1 |
| | | | अंतर्देशीय जलमार्ग |
| | | | विमानतळ |
| | | | रेल्वे, ट्रॅक, बोगदे, वायडक्ट्स, पूल 2 |
| | | | शहरी सार्वजनिक परिवहन (शहरी रस्ता वाहतुकीच्या बाबतीत रोलिंग स्टॉक वगळता) |
| 2 | ऊर्जा | | वीज निर्मिती |
| | | | वीज प्रसारण |
| | | | वीज वितरण |
| | | | तेल पाइपलाइन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तेल / गॅस / लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) स्टोरेज सुविधा 3 |
| | | | गॅस पाईपलाईन 4 |
| 3 | पाणी आणि स्वच्छता | | घनकचरा व्यवस्थापन |
| | | | पाणीपुरवठा पाइपलाइन |
| | | | पाणी प्रक्रिया वनस्पती |
| | | | सांडपाणी संकलन, उपचार व विल्हेवाट व्यवस्था |
| | | | सिंचन (धरणे, वाहिन्या, बंधारे इ.) |
| | | | वादळ पाणी निचरा प्रणाली |
| | | | स्लरी पाईपलाईन |
| | | | |
| 4 | संप्रेषण | | दूरसंचार (निश्चित नेटवर्क) 5 |
| | | | दूरसंचार टॉवर्स |
| | | | दूरसंचार आणि दूरसंचार सेवा |
| 5 | सामाजिक आणि व्यावसायिक पायाभूत सुविधा | | शिक्षण संस्था (भांडवल साठा) |
| | | | रुग्णालये (भांडवलाचा साठा). |
| | | | 1 दशलक्षाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांबाहेर स्थित तीन-तारा किंवा उच्च श्रेणीची हॉटेल वर्गीकृत |
| | | | औद्योगिक उद्याने, सेझ, पर्यटन सुविधा आणि शेती बाजारासाठी सामान्य पायाभूत सुविधा |
| | | | खत (भांडवल गुंतवणूक) |
| | | | कोल्ड स्टोरेजसह शेती व बागायती उत्पादनांसाठी कापणीनंतरची साठवणुकीची पायाभूत सुविधा |
| | | | टर्मिनल मार्केट |
| | | | माती-चाचणी प्रयोगशाळा |
| | | | कोल्ड चेन 7 |
| | | | भारतातील कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही स्टार रेटिंगसाठी प्रत्येकी 200 कोटींपेक्षा जास्त किंमतीची प्रोजेक्ट असलेली 800 हॉटेल्स. |
| | | | प्रत्येकी 300 कोटींपेक्षा जास्त किंमतीचे प्रकल्प अधिवेशन केंद्रे |

| टीपा | |
|---|---|
| (1) | कॅपिटल ड्रेजिंग समाविष्ट |
| (2) | लोडिंग/अनलोडिंग टर्मिनल्स, स्टेशन्स व इमारती ह्यासारखे पूरक टर्मिनल इन्फ्रास्ट्रक्चर समाविष्ट |
| (3) | आणीबाणीसाठीच्या क्रूड ऑईलचा साठा करणे. |
| (4) | शहर गॅस वितरण नेटवर्क समाविष्ट |
| (5) | ब्रॉड बॅंड/इंटरनेट उपलब्ध करणारे ऑप्टिक फायबर/केबल नेटर्वक्स समाविष्ट |
| (6) | मेडिकल कॉलेजेस, पॅरा मेडिकल ट्रेनिंग संस्था व डायग्नोस्टिक्स केंद्रे समाविष्ट |
| (7) | शेतीमाल व संबंधित उत्पाद, सागरी उत्पाद व मांस ह्यांना जतन करण्यासाठी किंवा साठविण्यासाठी शेती स्तरावर पूर्व शीतन करण्यासाठीची शीतगृह सुविधा समाविष्ट. |
| (8) | ह्या परिपत्रकाच्या तारखेपासून लागु असून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पात्र असलेल्या प्रकल्पांसाठी उपलब्ध, पात्र असलेल्या खर्चात जमीनीची किंमत व लीज आकार समाविष्ट नाही पण बांधणीदरम्यानचे व्याज समाविष्ट आहे. |

(12) ‘एनबीएफसी-एमएफआय’ म्हणजे, पुढील अटी पूर्ण करणारी, ठेवी न घेणारी एनबीएफसी (भारतीय कंपनी अधिनियम, 1956 च्या कलम 25 खाली परवाना असलेली कंपनी सोडून).

(अ) किमान नेट ओन्ड फंड रु.5 कोटी (देशाच्या ईशान्य क्षेत्रात पंजीकृत झालेल्या एनबीएफसी-एमएफआय साठी किमान एनओएफ रु.2 कोटी असेल).

(ब) तिच्या नक्त शेअर्सच्या 85% शेअर्स ‘क्वालिफायिंग ॲसेट्स’ च्या स्वरुपाचे असतील.

वरील (ब) साठी

‘नक्त ॲसेट्स’ ची व्याख्या म्हणजे, रोकड व बँक शिल्लक व मनी मार्केट संलेख सोडून एकूण ॲसेट्स आणि

[1] ‘क्वालिफायिंग ॲसेट्स’ म्हणजे, पुढील निकष पूर्ण करणारे कर्ज :-

(1) एखाद्या एनबीएफसी-एमएफआयने रु.1,00,000 पर्यंतचे नागरी वार्षिक उत्पन्न आणि रु.1,60,000 पर्यंतचे अर्ध-नागरी वार्षिक उत्पन्न असलेल्या कर्जदाराला दिलेले कर्ज.

(2) कर्जाची रक्कम प्रथम चक्रात रु.60,000 पेक्षा व त्यानंतरच्या चक्रात रु.1,00,000 पेक्षा अधिक असत नाही.

(3) कर्जदाराचा एकूण कर्जबाजारीपणा रु.1,00,000 पेक्षा अधिक नाही.

प्रदान केलेल्या शिक्षणाद्वारे आणि वैद्यकीय खर्चाची पूर्तता करण्यासाठी जर कर्ज घेतले असेल तर कर्ज घेणा-याच्या एकूण कर्जात त्यांना वगळण्यात येईल.

(4) कोणत्याही दंडाशिवाय मुदतपूर्व कर्जफेडीसह, रु.15,000 पेक्षा जास्त कर्ज रकमेसाठी त्या कर्जाची मुदत 24 महिन्यांपेक्षा कमी नाही.

(5) कर्ज कोणत्याही तारणाशिवाय देण्यात आले आहे.

(6) उत्पन्न ओळखीसाठीची एकूण कर्ज रक्कम ही त्या एमएफआयने दिलेल्या एकूण कर्जाच्या 50% पेक्षा कमी आहे.

(7) त्या कर्जाची परतफेड कर्जदाराच्या निवडीनुसार साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक हप्त्यांनी करावयाची आहे.

------------

[1] अधिसूचना क्र. डीएनबीआर.015/सीजीएम(सीडीएस)-2015 दि. एप्रिल 8, 2015 अन्वये बदली करण्यात आले.

(13) 'अबँकीय वित्तीय कंपनी - फॅक्टर' म्हणजे, आरबीआय अधिनियम 1934 च्या कलम 45-आय च्या खंड (एफ) मध्ये व्याख्या केलेली एक अबँकीय वित्तीय कंपनी असून, तिचे फॅक्टरिंग व्यवसायातील वित्तीय ॲसेट्स तिच्या एकूण ॲसेट्सच्या किमान 50% असून तिचे फॅक्टरिंग व्यवसायामधील उत्पन्न तिच्या एकूण उत्पन्नाच्या 50% पेक्षा कमी नसेल व तिला फॅक्टरिंग विनियम अधिनियम, 2011 च्या कलम 3 च्या पोटकलम (1) खाली पंजीकरण प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(14) 'अकार्यकारी वित्तीय धारक कंपनी (एनओएफएचसी)' म्हणजे, रिझर्व्ह बँकेने, '**खाजगी क्षेत्रात नवीन बँकांना परवाना देण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे**' मध्ये दिल्यानुसार असलेली एम अबँकीय वित्तीय कंपनी, जी एका बँकिंग कंपनीचे शेअर्स व त्याच गटामधील इतर सर्व वित्तीय सेवा कंपन्यांचे - मग त्या कंपन्या रिझर्व्ह बँकेकडून अथवा अन्य कोणत्याही वित्तीय विनियामकाकडून विनियमित झालेल्या असोत अथवा नसोत - शेअर्स, लागु असलेल्या विनियामक तत्त्वांनुसार परवानगीप्राप्त संख्येने धारण करत आहे.

(15) 'तोट्याचा ॲसेट' म्हणजे

(अ) त्या अबँकीय वित्तीय कंपनीने किंवा तिच्या अंतर्गत किंवा बाह्य ऑडिटरने किंवा त्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या तपासणीत भारतीय रिझर्व्ह बँकेने लॉस ॲसेट (तोट्याचा ॲसेट) म्हणून ओळखलेली व त्या अबँकीय वित्तीय कंपनीने निर्लेखित (राईट ऑफ) न केलेली कंपनी, आणि

(ब) सिक्युरिटीच्या मूल्यामध्ये -हास झाल्यामुळे किंवा सिक्युरिटीची उपलब्धता नसल्याने किंवा एखाद्या कर्जदाराच्या फसवणुकीमुळे किंवा चूक-भूल ह्यामुळे वसुली न होण्याच्या संभाव्य जोखमीमुळे विपरीत रीतीने बाधित झालेला ॲसेट.

(16) 'दीर्घ कालीन गुंतवणुक' म्हणजे, विद्यमान गुंतवणुकीपेक्षा अन्य गुंतवणुक.

(17) 'नक्त ॲसेट मूल्य' म्हणजे, त्या विशिष्ट योजनेबाबत, त्या म्युच्युअल फंडाने घोषित केलेले नक्त ॲसेट मूल्य.

(18) 'नक्त पुस्तकी मूल्य' म्हणजे

(अ) हायर परचेस ॲसेटच्या बाबतीत थकित (ओव्हरड्यु) व भविष्यातील मिळणारे एकूण हप्ते, वजा अपरिपक्व वित्त आकाराची बाकी (शेष) वजा ह्या निर्देशाच्या परिच्छेद 9(2)(1) अनुसार केलेल्या तरतुदी.

(ब) लीज केलेल्या ॲसेटच्या बाबतीत, येणे असलेले म्हणून समजण्यात आलेले एकूण थकित लीज भाड्याचा मुद्दलाचा भाग आणि लीज ॲडजस्टमेंट अकाऊंटच्या शिल्लकेने समायोजित/तडजोडित केलेल्या लीज ॲसेटचे घसारायुक्त पुस्तकी मूल्य ह्यांची एकूण बेरीज.

(19) 'अकार्यकारी ॲसेट' (ह्या निर्देशात एनपीए म्हणून उल्लेखिलेले) म्हणजे :

(अ) ज्याच्या बाबतीत सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ व्याज थकित राहिले आहे असा ॲसेट.

(ब) सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ हप्ते थकित राहिले आहेत किंवा ज्यावरील व्याजाची रक्कम सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ थकित राहिली आहे असे, प्रदान न केलेल्या व्याजासह चे मुदत कर्ज.

(क) डिमांड किंवा कॉलच्या तारखेपासून सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळपर्यंत थकित राहिले आहे असे किंवा ज्यावरील व्याज सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ थकित राहिले आहे असे एक डिमांड व कॉल कर्ज.

(ड) सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ थकित राहिलेले देयक.

(ई) सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ, एखाद्या कर्जावरील व्याज किंवा लघु मुदतीची कर्जे/अग्रिम राशी स्वरुपातील 'इतर विद्यमान ॲसेट्स' ह्या शीर्षकाखालील येणे रक्कम थकित झाली असल्यास व ती सुविधा सहा महिने व त्यापेक्षा अधिक काळ थकित राहिली असल्यास.

(फ) सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ ॲसेट्सची किंवा दिलेल्या सेवांची विक्री ह्यामुळे असलेली येणे रक्कम.

**मात्र**, पोट-खंड अ ते फ मध्ये विहित केलेला 'सहा महिने किंवा अधिक' काळ हा, मार्च 31, 2016 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी 'पाच महिने किंवा अधिक' असेल. मार्च 31, 2017 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी 'चार महिने किंवा अधिक' असेल आणि मार्च 31, 2018 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी व त्यानंतर तो 'तीन महिने व अधिक' असेल.

(ग) बारा महिने किंवा अधिक काळ थकित झालेला लीज भाड्याचा व हायर परचेसचा हप्ता.

**मात्र**, ह्या पोट-खंडामध्ये विहित केलेला 'बारा महिने किंवा अधिक' काळ हा, मार्च 31, 2016 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी 'नऊ महिने किंवा अधिक' असेल. मार्च 31, 2017 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी तो 'सहा महिने किंवा अधिक' असेल आणि मार्च 31, 2018 रोजी संपणा-या व त्यानंतरच्या वर्षासाठी तो 'तीन महिने किंवा अधिक' असेल.

(ह) कर्जे, अग्रिम राशी व इतर कर्ज सुविधांच्या बाबतीत (खरेदी केलेल्या व डिसकाऊंट केलेल्या बिलांसह) त्या कर्ज सुविधांखाली (उपवर्जित व्याजासह) वरीलपैकी कोणतीही कर्ज सुविधा अकार्यकारी ॲसेट झाल्यास, त्याच कर्जदाराला/लाभार्थीला उपलब्ध केलेली आऊटस्टँडिंग शिल्लक.

**मात्र**, लीज व हायर परचेस व्यवहारांबाबत, अबँकीय वित्तीय कंपनी वसुलीच्या रेकॉर्डवर आधारित अशा प्रत्येक खात्याचे वर्गीकरण करु शकते.

(20) 'निजनिधी' म्हणजे, भरणा झालेले इक्विटी भांडवल, इक्विटीमध्ये सक्तीने परिवर्तनीय असलेले प्रिफरन्स शेअर्स, मुक्त राखीव निधी, शेअर प्रिमियम खात्यातील शिल्लक, आणि ॲसेट्सचे पुनर् मूल्यमापन करुन आलेला राखीव निधी सोडून, ॲसेटच्या विक्रीतून आलेला अतिरिक्त पैसा वजा संचयित शिल्लक तोटा, अमूर्त ॲसेट्सचे पुस्तकी मूल्य व असल्यास डिफर्ड रेव्हेन्यु खर्च.

(21) 'सार्वजनिक निधी' मध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत - सार्वजनिक/जनतेच्या ठेवींमधून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उभा केलेला निधी, कमर्शियल पेपर्स, डिबेंचर्स, इंटर कॉर्पोरेट ठेवी व बँक वित्त. परंतु, देण्याच्या

तारखेपासून 5 वर्षांमध्ये, इक्विटी शेअर्समध्ये सक्तीने परिवर्तनीय असे संलेख देऊन उभा केलेला निधी ह्यात समाविष्ट नाही.

(22) 'प्रमाणभूत ॲसेट' म्हणजे, ज्याच्या बाबतीत मुद्दल किंवा व्याजाचे प्रदान करण्यात कोणतीही कसुरी दिसून येत नाही व ज्याच्या बाबतीत कोणतेही प्रश्न दिसून येत नाहीत किंवा व्यवसायाला येणारी जोखीम नॉर्मल आहे असे ॲसेट्स.

(23) 'सबस्टँडर्ड ॲसेट' म्हणजे :

(अ) 18 महिन्यापर्यंतच्या काळापर्यंत अकार्यकारी ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आलेला ॲसेट.

**मात्र,** ह्या पोट-खंडात विहित केलेला '18 महिन्यांपेक्षा अधिक नसलेला' कालावधी, मार्च 31, 2016 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी '16 महिन्यांपेक्षा अधिक नसलेला' काळ असेल. मार्च 31, 2017 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी तो '14 महिन्यांपेक्षा अधिक नसलेला' काळ असेल व मार्च 31, 2018 रोजी संपणा-या वित्तीय वर्षासाठी व त्यानंतर तो '12 महिन्यांपेक्षा अधिक नसलेला' कालावधी असेल.

(ब) तडजोड केलेल्या किंवा पुनर् वेळापत्रक केलेल्या किंवा पुर्नरचित केलेल्या अटींखाली समाधानकारक कामगिरीचे एक वर्ष संपेपर्यंत, व्याज आणि/किंवा मुद्दलाबाबतच्या अटींचा करारनामा पुनर् तडजोडित किंवा पुनर् वेळापत्रकाने किंवा पुर्नरचित केलेला ॲसेट.

**मात्र,** पायाभूत सोयी कर्जाचे सबस्टँडर्ड ॲसेट म्हणून केलेले वर्गीकरण ह्या निर्देशांच्या परिच्छेद 27 मधील तरतुदीनुसार असेल.

(24) 'सबॉर्डिनेटेड कर्ज' म्हणजे,संपूर्णपणे भरणा झालेला, सिक्युअर्ड नसलेला, व इतर धनकोंच्या दाव्यांबाबत दुय्यम (सबॉर्डिनेटेड) असलेला व निर्बंधित खंडांपासून मुक्त असलेला व धारकाच्या इच्छेनुसार किंवा त्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या पर्यवेक्षकीय प्राधिकरणाच्या संमतीशिवाय विमोचन न करता येण्याजोगा संलेख. अशा संलेखाचे पुस्तकी मूल्य खाली दिल्यानुसार डिसकाऊंट करता येईल.

| संलेखांची शेष परिपक्वता | | डिसकाऊंटचा दर |
|---|---|---|
| (अ) | एक वर्षापर्यंत | 100% |
| (ब) | एक वर्षापेक्षा जास्त परंतु दोन वर्षांपर्यंत | 80% |
| (क) | दोन वर्षापेक्षा अधिक परंतु तीन वर्षांपर्यंत | 60% |
| (ड) | तीन वर्षापेक्षा अधिक परंतु चार वर्षांपर्यंत | 40% |
| (ई) | चार वर्षापेक्षा अधिक परंतु पाच वर्षांपर्यंत | 20% |

मात्र, अशी डिसकाऊंट केलेली मूल्ये टायर 1 भांडवलाच्या 50% पेक्षा अधिक नसावीत.

(25) 'सबस्टँशियल इंटरेस्ट' (लक्षणीय व्याज)म्हणजे, एखादी व्यक्ती किंवा तिचा पती/पत्नी किंवा अल्पवयीन मूल ह्यांनी व्यक्तिशः किंवा एकत्र मिळून एखाद्या कंपनीच्या शेअर्समध्ये लाभार्थी हितसंबंध धारण करणे व त्या शेअर्स वरील भरणा झालेली रक्कम ही त्या कंपनीच्या भरणा झालेल्या भांडवलाच्या किंवा एखाद्या भागीदारी कंपनीच्या सर्व भागीदारांनी वर्गणी रुपाने जमा केलेल्या भांडवलाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

(26) 'सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट ठेवी न घेणारी अबँकीय वित्तीय कंपनी' म्हणजे, सार्वजनिक ठेवी न घेणारी/न धारण करणारी अबँकीय वित्तीय कंपनी की तिचे एकूण ॲसेट्स तिच्या शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदात दाखविल्यानुसार रु.500 कोटी व त्यापेक्षा अधिक आहे.

(27) 'टायर 1 भांडवल' म्हणजे, निज निधी वजा, इतर अबँकीय वित्तीय कंपन्यांच्या शेअर्समध्ये केलेल्या व त्याच गटातील सहाय्यक कंपन्यांचे शेअर्स, डिबेंचर्स, बाँड्स, थकित कर्जे व अग्रिम राशी - ह्यात त्यांना केलेले हायर परचेस व लीज अर्थसहाय्यही समाविष्ट आहे. ह्यात केलेली गुंतवणुक व अशी गुंतवणुक निज निधीच्या, आणि ठेवी न घेणा-या अबँकीय कंपनीने प्रत्येक वर्षी दिलेल्या व अशा कंपनीच्या मागील लेखा वर्षाच्या मार्च 31 रोजी असलेल्या एकूण टायर 1 भांडवलाच्या 15% पेक्षा अधिक नाही.

(28) 'टायर-2 भांडवला' मध्ये पुढील गोष्टी येतात -

(अ) इक्विटीमध्ये सक्तीने परिवर्तनीय असलेले सोडून अन्य प्रिफरन्स शेअर्स.

(ब) पंचावन्न टक्के ह्या डिसकाऊंटेड दराने पुनर् मूल्यांकन राखीव निधी.

(क) सर्वसाधारण तरतुदी (स्टँडर्ड ॲसेट्स साठी असलेल्या तरतुदींसह) आणि तोट्यासाठीचा राखीव निधी - ही तरतुद मूल्यात प्रत्यक्ष झालेला -हास किंवा कोणत्याही विशिष्ट ॲसेटमध्ये संभाव्य तोटा ह्यामुळे केलेली नसेल आणि ह्या तरतुदी जोखीम भारित ॲसेट्सच्या सव्वा टक्क्यापर्यंत अनपेक्षित तोटा भरुन काढण्यासाठी उपलब्ध असेल.

(ड) हायब्रिड कर्ज भांडवली संलेख.

(ई) सबॉर्डिनेटेड कर्ज आणि

(फ) टायर 1 भांडवलासाठी आवश्यक असल्यापेक्षा अतिरिक्त असे, ठेवी न घेणा-या अबँकीय वित्तीय कंपनीने दिलेले परपेच्युअल कर्ज संलेख एकूण बेरीज मात्र टायर 1 भांडवलापेक्षा अधिक असू नये.

(2) ह्या निर्देशांमध्ये व्याख्या न केलेले परंतु भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम 1934 (1934 चा 2) मध्ये किंवा अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व्ह बँक) निर्देश, 1998 मध्ये व्याख्या केलेले शब्द किंवा संज्ञा ह्यांचा अर्थ त्यांना वरील अधिनियमात किंवा निर्देशात दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल. ह्या निर्देशात किंवा आरबीआय अधिनियम किंवा आरबीआयने दिलेल्या कोणतेही निर्देश ह्यात वापरलेले परंतु व्याख्या न केली गेलेल्या शब्दांचा किंवा संज्ञाचा अर्थ कंपनीज अधिनियम, 2013 मध्ये (2013 चा 18) त्यांना अनुक्रमे देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**उत्पन्न ओळख**

(3) (1) उत्पन्नाची ओळख मान्यताप्राप्त लेखा तत्त्वांवर आधारित असेल.

(2) व्याज/डिसकाऊंट/हायर चार्जेस/लीज भाडे किंवा एनपीए वरील इतर कोणतेही आकार ते प्रत्यक्ष वसुल झाल्यावरच ओळखले जातील. तो ॲसेट अकार्यकारी होण्यापूर्वी व वसुली झाली नसताना ओळखण्यात आल्यास ती रक्कम रिव्हर्स करण्यात येईल.

**गुंतवणुकींपासूनचे उत्पन्न**

(4) (1) कॉर्पोरेट संस्थांच्या शेअर्सवरील डिव्हिडंड आणि म्युच्युअल फंडाचे युनिट्स ह्यांना रोख स्वरुपात हिशेबात धरण्यात येईल.

**मात्र**, कॉर्पोरेट संस्थेने शेअर्सवरील डिव्हिडंड तिच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केले असल्यास आणि त्या अबँकीय वित्तीय कंपनीचा त्याचे प्रदान मिळविण्याचा हक्क सिध्द झाल्यासच, कॉर्पोरेट संस्थांच्या शेअर्सवरील डिव्हिडंड ॲक्रुअल धर्तीवर हिशेबात घेता येईल.

(2) कॉर्पोरेट संस्थांचे बाँड्स व डिबेंचर्स आणि सरकारी सिक्युरिटीज/बाँड्स पासून मिळालेले उत्पन्न ॲक्रुअल धर्तीवर हिशेबात घेतले जावे.

**मात्र,** ह्या संलेखांवरील व्याजदर पूर्व निश्चित केलेला असावा व व्याज नियमितपणे दिले जात असावे, कसुरी नसावी.

(3) केंद्र सरकार किंवा एखादे राज्य सरकार ह्यांनी व्याजाचे प्रदान व मुद्दलाची परतफेड ह्याची हमी दिलेल्या, कॉर्पोरेट संस्थांच्या किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या सिक्युरिटीजवरील उत्पन्न, ॲक्रुअल धर्तीवर हिशेबात घेतले जावे.

**लेखा मानके**

(5) ह्या निर्देशांच्या विपरीत नसल्यास, इंस्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया (ह्या निर्देशात ‘आयसीएआय’ म्हणून निर्देशित) ह्यांनी दिलेल्या लेखा मानकांचे व मार्गदर्शक सूचनांचे अनुसरण केले जाईल.

**गुंतवणुकींच्या लेखा**

(6) (1) (अ) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनीच्या संचालक मंडळाने त्या कंपनीसाठी गुंतवणुक धोरण तयार करुन त्याची अंमलबजावणी करावी.

(ब) विद्यमान व दीर्घकालीन गुंतवणुकी असे वर्गीकरण करण्यासाठीचे निकष त्या कंपनीच्या संचालक मंडळाने त्या गुंतवणुक धोरणात स्पष्टपणे द्यावेत.

(क) प्रत्येक गुंतवणुक करतेवेळी, सिक्युरिटीज मधील गुंतवणुकींचे चालु/विद्यमान व दीर्घकालीन असे वर्गीकरण केले जावे.

(ड) इंटर-क्लास हस्तांतरणाबाबत :-

(1) तात्पुरत्या धर्तीवर असे कोणतेही हस्तांतरण केलेले असू नये.

(2) असे हस्तांतरण केले गेल्यास ते, संचालक मंडळाच्या मंजुरीने, प्रत्येक सहामाहीच्या सुरुवातीस, एप्रिल 1 किंवा ऑक्टोबर 1 रोजी केले जावे.

(3) अशा गुंतवणुकी स्क्रिप निहाय व चालु ते दीर्घकालीन किंवा त्या उलट, पुस्तकी मूल्यावर किंवा मार्केट मूल्यावर - जे कमी असेल त्यावर - केल्या जाव्यात.

(4) प्रत्येक स्क्रिप मधील घसा-यासाठी पूर्ण तरतुद केली जावी व फायदे दुर्लक्षित केले जावे.

(5) त्याच वर्गातील स्क्रिप्स असल्या तरीही, अशा इंटर-क्लास हस्तांतरणाचे वेळी एका स्क्रिपमधील घसारा, दुस-या स्क्रिपमधील फायद्याबरोबर सेट ऑफ केला जाऊ नये.

(2) (अ) मूल्यमापन करण्यासाठी कोटेड चालु गुंतवणुकीचे पुढील वर्गात गट पाडण्यात यावेत. जसे -

(अ) इक्विटी शेअर्स

(ब) प्रिफरन्स शेअर्स.

(क) डिबेंचर्स व बाँड्स

(ड) ट्रेझरी बिलांसह सरकारी सिक्युरिटीज

(ई) म्युच्युअलफंडांचे युनिट्स आणि

(फ) इतर

(ब) प्रत्येक वर्गासाठीच्या कोटेड चालु गुंतवणुकींचे मूल्यांकन त्यांची किंमत किंवा मार्केट मूल्याने - ह्यापैकी जे कमी असेल त्याने - केले जाईल. ह्यासाठी, प्रत्येक वर्गातील गुंतवणुकींचा स्क्रिपनिहाय विचार केला जाईल आणि प्रत्येक वर्गातील सर्व गुंतवणुकींसाठी मार्केट मूल्य एकत्रित केले जाईल. त्या वर्गासाठीचे एकूण/एकत्रीकृत मार्केट मूल्य, त्या वर्गासाठीच्या एकूण मूल्यापेक्षा कमी असल्यास, नक्त घसा-यासाठी तरतुद केली जाईल किंवा नफा-तोटा लेखेत चार्ज केले जाईल. त्या वर्गासाठीचे एकूण मार्केट मूल्य त्या वर्गासाठीच्या एकूण मूल्यापेक्षा अधिक असल्यास, नक्त घसारा दुर्लक्षित केला जाईल. गुंतवणुकीच्या एका वर्गातील घसारा, दुस-या वर्गातील नफ्याबरोबर लेट ऑफ केला जाऊ नये.

(3) चालु गुंतवणुकींच्या स्वरुपातील अनकोटेड इक्विटी शेअर्सचे मूल्यांकन, किंमत किंवा ब्रेक अप मूल्य ह्यापैकी कमी असेल त्याने - केले जावे. तथापि, अबँकीय वित्तीय कंपन्या, तशी आवश्यकता वाटल्यास, शेअर्सच्या ब्रेक अप मूल्याऐवजी वाजवी (फेअर) मूल्य घेऊ शकतात. निवेशक कंपनीचा ताळेबंद दोन वर्षे उपलब्ध नसल्यास अशा शेअर्सचे मूल्य केवळ रुपये एक धरले जाईल.

(4) चालु गुंतवणुकीच्या स्वरुपातील अनकोटेड प्रिफरन्स शेअर्सचे मूल्यांकन, किंमत किंवा दर्शनी मूल्यापैकी जे कमी असेल त्याने केले जाईल.

(5) अनकोटेड सरकारी सिक्युरिटीज किंवा सरकारी हमीयुक्त बाँड्सचे मूल्यांकन कॅरियिंग कॉस्टने केले जाईल.

(6) चालु गुंतवणुकीच्या स्वरुपातील, म्युच्युअलफंडामधील अनकोटेड गुंतवणुकींचे मूल्यांकन प्रत्येक विशिष्ट योजनेबाबत म्युच्युअल फंडाने घोषित केलेल्या नेट ॲसेट मूल्याने केले जाईल.

(7) कमर्शियल पेपर्सचे मूल्यांकन कॅरियिंग कॉस्टने केले जाईल.

(8) दीर्घकालीन गुंतवणुकीचे मूल्यांकन आयसीएआयने दिलेल्या लेखा मानकानुसार केले जाईल.

सूचना - उत्पन्न ओळख व ॲसेट वर्गीकरणासाठी, अनकोटेड डिबेंचर्सना, अशा डिबेंचर्सच्या मुदतीवर अवलंबून, मुदत कर्जे किंवा अन्य प्रकारच्या कर्ज सुविधा समजले जाईल.

**डिमांड/कॉल कर्जासाठी धोरण असण्याची आवश्यकता**

(7) (1) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनीचे डिमांड/कॉल कर्जे देणारे/देऊ इच्छिणारे संचालक मंडळ त्याबाबतचे एक धोरण तयार करुन त्याची अंमलबजावणी करील.

(2) अशा धोरणात अन्य पुढील बाबी समाविष्ट असतील.

(1) त्या डिमांड किंवा कॉल कर्जाच्या परतफेडीसाठी किंवा कॉल अप साठी असलेली कट ऑफ तारीख.

(2) ते डिमांड/कॉल कर्ज मंजुर केल्याच्या तारखेपासून एक वर्षानंतर ते कर्ज डिमांड कॉल अप करण्यासाठीची कट ऑफ तारीख एक वर्षानंतर ठेवली गेली असल्यास, ते कर्ज मंजुर करणारे प्राधिकरण त्यासाठीची विशिष्ट कारणे लेखी रेकॉर्ड करुन ठेवील.

(3) अशा कर्जासाठी देय असलेला व्याजदर

(4) अशा कर्जावरील व्याज मासिक किंवा त्रैमासिक रीतीने देय असेल.

(5) डिमांड किंवा कॉल कर्जावर कोणतेही व्याज आकारावयाचे नसल्यास किंवा कोणत्याही कालावधीसाठी मोराटोरियम दिले गेले असल्यास ते कर्ज मंजुर करण्याचे प्राधिकरण, ते कर्ज मंजुर करतेवेळी त्यासाठीची विशिष्ट/खास कारणे रेकॉर्ड करुन ठेवील.

(6) मंजुर केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये, त्या कर्जाच्या कामगिरीचे पुनरावलोकन करण्यासाठी कट ऑफ तारीख.

(7) कर्जाच्या मंजुरीच्या अटींचे समाधानकारक पालन केले गेले असल्याचे, पुनरावलोकनात दिसून आल्याशिवाय अशा डिमांड किंवा कॉल कर्जाचे नूतनीकरण केले जाणार नाही.

**ॲसेट वर्गीकरण**

(8) (1) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, सुनिश्चित केलेल्या कर्ज-दुर्बलतेचा स्तर व वसुलीबाबतच्या तारण-सिक्युरिटीवर अवलंबून राहण्याची व्याप्ती विचारात घेऊनच तिचे लीज/हायर परचेस ॲसेट्स, कर्जे व अग्रिम राशी व कर्जाचा अन्य कोणताही प्रकार ह्यांचे वर्गीकरण पुढील वर्गात करील :-

(1) प्रमाणभूत ॲसेट्स

(2) सबस्टॅंडर्ड ॲसेट्स

(3) शंकास्पद ॲसेट्स आणि

(4) तोट्याचे ॲसेट्स

(2) वर दिलेल्या वर्गाचे उच्चीकरण (अपग्रेडेशन) तसे करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी पूर्ण केल्या गेल्याशिवाय केवळ रिशेड्युलींगचा परिणाम म्हणून केले जाणार नाही.

**तरतुदीकरणाच्या आवश्यकता**

(9) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, एखादे खाते अकार्यकारी होणे, ते तसे झाल्याचे ओळखले जाणे, सिक्युरिटी वसुल होणे व आकारण्यात आलेल्या सिक्युरिटीच्या मूल्यामध्ये काळानुसार झालेला -हास ह्या सर्व काळासाठीचा वेळ लक्षात घेऊनच, सबस्टँडर्ड ॲसेट्स, शंकास्पद ॲसेट्स व लॉस ॲसेट्स ह्यांच्या विरुध्द खाली दिल्यानुसार तरतुदी करील.

खरेदी केलेली व डिसकाऊंट केलेली बिले ह्यासह कर्जे, अग्रिम राशी व इतर कर्ज सुविधा -

(3) खरेदी केलेल्या व डिसकाऊंट केलेल्या बिलांसह, कर्जे, अग्रिम राशी व इतर सर्व सुविधांसाठीच्या तरतुदीकरण आवश्यकता पुढीलप्रमाणे असतील.

(1) तोट्याचे ॲसेट्स :- संपूर्ण ॲसेट निर्लेखित केला जावा. कोणत्याही कारणाने असा ॲसेट पुस्तकात ठेवला गेल्यास थकित (आऊटस्टँडिंग) साठी 100% तरतुद केली जावी.

(2) शंकास्पद ॲसेट्स :- (अ) ती अबँकीय वित्तीय कंपनी परत मिळवू/वसूल करु शकेल अशा सिक्युरिटीच्या वसुलीक्षम मूल्यात ती अग्रिम राशी येत नसल्याच्या रकमेच्या 100% तरतुद असे वसुलीक्षम मूल्य वास्तववादी धर्तीवर काढले जावे.

(ब) वरील (अ) च्या व्यतिरिक्त तो ॲसेट शंकास्पद राहिला असल्याच्या कालावधीवर अवलंबून, प्रतिभूतीयुक्त भागाच्या (म्हणजे येणे/थकित रकमेचे वसुलीक्षम मूल्य) 20% ते 50% पर्यंतची तरतुद पुढील धर्तीवरच केली जावी :-

| तो ॲसेट शंकास्पद असल्याचा कालावधी | % तरतुद. |
|---|---|
| 1 वर्षापर्यंत | 20 |
| एक ते तीन वर्षे | 30 |
| तीन वर्षांपेक्षा अधिक | 50 |

(3) सबस्टँडर्ड ॲसेट्स :- एकूण आऊटस्टँडिंगच्या 10% एव्हढी सर्वसाधारण तरतुद केली जावी.

(2) लीज व हायर परचेस ॲसेट्स :- हायर परचेस ॲसेट्सच्या बाबतीत एकूण येणे (थकित व भविष्यातील येणे एकत्रित करुन) वजा

(अ) नफा-तोटा लेखेमध्ये जमा न केलेले व अपरिपक्व वित्त आकार म्हणून कॅरी फॉरवर्ड केलेले वित्त आकार आणि

(ब) संबंधित ॲसेटचे घसारायुक्त मूल्य ह्यासाठी तरतुद केली जाईल.

स्पष्टीकरण :- ह्या परिच्छेदासाठी

(1) ॲसेटचे घसारायुक्त मूल्य नोशनली काढण्याची रीत - त्या ॲसेटचे मूळ मूल्य वजा सरळ रेषा रितीने दरसाल वीस टक्के दराने घसारा आणि

(2) सेकंडहँड ॲसेटच्या बाबतीत, असा सेकंडहँड ॲसेट मिळविण्यासाठीचा प्रत्यक्ष खर्च/मूल्य म्हणजे मूळ मूल्य असेल.

हायर परचेस व लीज्ड ॲसेट्ससाठी अतिरिक्त तरतुद

(2) हायर परचेस व लीज्ड ॲसेट्ससाठी अतिरिक्त तरतुद पुढीलप्रमाणे केली जाईल.

| | |
|---|---|
| (अ)हायर चार्जेस किंवा लीज भाडे 12 महिन्यापर्यंत थकित असल्यास | कॉलम 2 निल, |
| (ब) हायर चार्जेस किंवा लीज भाड्याचे 12 महिन्यांपेक्षा जास्त परंतु 24 महिन्यांपर्यंत थकित असल्यास | नक्त पुस्तकी मूल्याच्या 10% |
| (क) हायर चार्जेस किंवा लीज भाडे 24 महिन्यांपेक्षा जास्त परंतु 36 महिन्यांपर्यंत थकित असल्यास | नक्त पुस्तकी मूल्याच्या 40% |
| (ड) हायर चार्जेस किंवा लीज भाडे 36 महिन्यांपेक्षा जास्त परंतु 48 महियांपर्यंत थकित असल्यास | नक्त पुस्तकी मूल्याच्या 70% |
| (ई) हायर चार्जेस किंवा लीज भाडे 48 महिन्यांपेक्षा अधिक काळ थकित असल्यास. | नक्त पुस्तकी मूल्याच्या 100% |

(3) त्या हायर परचेस/लीज्ड ॲसेटच्या शेवटच्या हप्त्याच्या ड्यु तारखेपासून 12 महिन्यांचा कालावधी संपल्यावर संपूर्ण नक्त पुस्तकी मूल्याची तरतुद केली जावी.

सूचना :-

(1) हायर परचेस करारानुसार कर्जदाराने अबँकीय वित्तीय कंपनीकडे ठेवलेली कॉशन मनी/मार्जिन मनी किंवा सुरक्षा ठेवीची रक्कम, त्या कराराखालील इक्वेटेड मासिक हप्ते काढताना हिशेबात/विचारात आधीच घेतली नसल्यास वरील खंड (1) मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार कापली/वजा केली जावी. हायर परचेस करारानुसार उपलब्ध असलेल्या अन्य कोणत्याही सिक्युरिटीचे मूल्य केवळ वरील खंड (2) मधील तरतुदीनुसार वजा केले जावे.

(2) अबँकीय वित्तीय कंपनीकडे कर्जदाराने लीज करारानुसार ठेवलेली सुरक्षा ठेवीची रक्कम आणि लीज करारानुसार उपलब्ध अन्य कोणत्याही सिक्युरिटीचे मूल्य हे केवळ वरील खंड (2) मधील तरतुदीनुसारच कापले/वजा केले जावे.

(3) येथे स्पष्ट करण्यात येते की, उत्पन्न ओळख व तरतुदीकरण ह्या बाबी, प्रुडेंशियल नॉर्म्सचे दोन वेगवेगळे भाग/पैलू आहेत. आणि लीज ॲडजस्टमेंट अकाऊंटमध्ये शिल्लक (असल्यास) तडजोडित केल्यानंतर संबंधित लीज्ड ॲसेटचा घसारायुक्त पुस्तकी मूल्यासह, एकूण आऊटस्टँडिंग बॅलन्सेसवर, एनपीओवर, नॉर्म्सनुसार तरतुदी करावयाच्या असतात. एनपीएवरील उत्पन्न ओळखण्यात आले नाही हे तरतुद न करण्याचे कारण असू शकत नाही.

(4) ह्या निर्देशाच्या परिच्छेद (2)(1)(23)(ब) मध्ये निर्देशित केल्यानुसार पुनर् तडजोड किंवा रिशेड्युल केला गेलेला ॲसेट हा एक सबस्टँडर्ड ॲसेट असेल किंवा एक शंकास्पद ॲसेट किंवा तोट्याचा ॲसेट (असेल त्यानुसार) म्हणून त्याच्या पुनर् तडजोडीपूर्वी किंवा रिशेड्युल होण्यापूर्वी तो ज्या वर्गात होता त्याच वर्गात राहील. अशा ॲसेटचे उच्चीकरण होईपर्यंत लागु असल्यानुसार आवश्यक ती तरतुद करणे आवश्यक आहे.

(5) एनबीएफसीने तयार करावयाचा ताळेबंद, परिच्छेद 11 च्या पोट परिच्छेद (2) मधील तरतुदींनुसार तयार केला जावा.

(6) एप्रिल 1, 2001 रोजी किंवा त्यानंतर करण्यात आलेल्या सर्व वित्तीय लीजेसना, हायर परचेस ॲसेट्सना लागु असलेल्या तरतुदीकरण आवश्यकता लागु असतील.

(7) एनबीएफसी-एमएफआयच्या बाबतीत निम्न उत्पन्न गृहनिर्माणासाठीच्या कर्ज जोखीम हमी निधी ट्रस्टने (सीआरजीएफटीएलआयएच) संरक्षित अग्रिम राशी अकार्यकारी ठरल्यास, हमी देण्यात आलेल्या भागासाठी कोणतीही तरतुद करण्याची आवश्यकता नाही. अकार्यकारी अग्रिम राशींसाठी तरतुदीकरणावरील विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार हमी दिलेल्या भागापेक्षा जास्त असलेल्या आऊटस्टँडिंग रकमेबाबत तरतुद केली जावी.

**स्टँडर्ड ॲसेट तरतुदीकरण**

(10) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी नक्त एनपीए काढण्यासाठी हिशेबात न घेण्याच्या आऊटस्टँडिंगच्या 0.25% रक्कमेची तरतुद मार्च 2015 अखेर, 0.30% एवढी तरतुद मार्च 2016 अखेर, 0.35% एवढी तरतुद मार्च 2017 अखेर व 0.40% तरतुद मार्च 2018 व त्यानंतर स्टँडर्ड ॲसेट्ससाठी करील. स्टँडर्ड ॲसेट्ससाठी केलेल्या तरतुदीचे नेटिंग, एकूण/ढोबळ अग्रिम राशींमधून करण्याची गरज नाही. परंतु ती तरतुद ताळेबंदामध्ये 'कॉंटिंजंट प्रोव्हिजन अगेन्स्ट स्टँडर्ड ॲसेट्स' म्हणून दाखविली जावी.

**ताळेबंदामधील प्रकटीकरण**

(11)(1) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, तिच्या ताळेबंदामध्ये वरील परिच्छेद 9 मधील केलेल्या तरतुदी उत्पन्नामधून किंवा ॲसेट्सच्या, मूल्याविरुध्द नेटिंग न करता वेगळ्या दर्शविल/प्रकट करील.

(2) ह्या तरतुदी, लेखेच्या वेगवेगळ्या शीर्षकांखाली खाली दिल्याप्रमाणे स्पष्टपणे दर्शविल्या जातील.

(1) वाईट व शंकास्पद कर्जांसाठीच्या तरतुदी आणि
(2) गुंतवणुकींमधील घसा-यांसाठीच्या तरतुदी.

(3) अशा तरतुदी त्या अबँकीय वित्तीय कंपनीने, सर्वसाधारण तरतुदी व ठेवलेल्या लॉस रिर्झव्ह मधून घेऊ/तडजोडित केल्या जाऊ नयेत.

(4) प्रत्येक वर्षासाठीच्या अशा तरतुदी नफा-तोटा लेखेमधून डेबिट केल्या जाव्यात. सर्वसाधारण तरतुदी व लॉस रिझर्व्हज खाली ठेवलेल्या अतिरिक्त तरतुदींना त्यांच्या विरुध्द समायोजन केल्याशिवाय राईट बॅक केले जावे.

(5) प्रत्येक अबँकीय कंपनी तिच्या ताळेबंदात पुढील तपशील प्रकट करील.

(1) कॅपिटल टु रिस्क ॲसेट्स रेशो (सीआरएआर)
(2) रियल इस्टेट क्षेत्राबाबतचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष एक्सपोझर
(3) ॲसेट्स व दायित्वे ह्यांचा परिपक्वता साचा/रचना

**लेखा वर्ष**

(12) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, दर वर्षी मार्च 31 रोजी असल्यानुसार तिचा ताळेबंद व नफा तोटा लेखा तयार करील. कंपनीज अधिनियमानुसार एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीला तिच्या ताळेबंदाची तारीख वाढवावयाची असल्यास, तिने ह्यासाठी रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे जाण्यापूर्वी भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्व मंजुरी घ्यावी.

ह्याशिवाय, ह्या बँकेने व रजिस्ट्रार ऑफ कंपनीजने वेळ वाढवून दिली असली तरीही ती अबँकीय वित्तीय कंपनी ह्या बँकेला त्या वर्षाच्या मार्च 31 रोजी असल्यानुसार असलेला एक प्रोफॉर्मा ताळेबंद (ऑडिट न केलेला) व त्या तारखेस द्यावयाचे वैधानिक अहवाल सादर करील. प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, तिच्या ताळेबंदाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत तिचा ताळेबंद अंतिम स्वरुपात/निश्चित करील.

**ताळेबंदाचे शेड्युल**

(13) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, कंपनीज अधिनियम 2013 खाली विहित केल्यानुसार तिच्या ताळेबंदासोबत जोडपत्र 1 मध्ये दिल्यानुसार द्यावयाच्या शेड्युलमध्ये तपशील देईल.

**सरकारी सिक्युरिटीज मधील व्यवहार**

(14) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी तिच्या सीएसजीएल खात्यामधून किंवा तिच्या डिमॅट खात्यामधून सरकारी सिक्युरिटीजचे व्यवहार करील.

**मात्र**, कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी सरकारी सिक्युरिटीजमधील कोणतेही व्यवहार प्रत्यक्ष स्वरुपात किंवा एखाद्या दलालामार्फत करणार नाही.

**वैधानिक ऑडिटरकडून ह्या बँकेला सादर करावयाचे प्रमाणपत्र**

(15) (1) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी तिच्या वैधानिक ऑडिटरकडून एक प्रमाणपत्र सादर करील की, ती कंपनी, अबँकीय वित्तीय कंपनीचा [2][व्यवसाय] करत असून तिला आरबीआय अधिनियमाच्या कलम 45-आयए खाली पंजीकरण प्रमाणपत्र घेणे/धारण करणे आवश्यक असून ते धारण करण्यास ती पात्र आहे. मार्च 31 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षी असलेल्या त्या कंपनीच्या स्थिती संबंधीचे वैधानिक ऑडिटरचे प्रमाणपत्र, ती अबँकीय वित्तीय कंपनी ज्याच्या अधिकार क्षेत्रात येते त्या अबँकीय पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे, तो ताळेबंद अंतिम/निश्चित केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत व कोणत्याही परिस्थितीत त्या वर्षाच्या डिसेंबर 30 च्या पूर्वी सादर केले जावे. अशा प्रमाणपत्रात, ह्या अबँकीय वित्तीय कंपनीचे, ॲसेट वित्त कंपनी, गुंतवणुक कंपनी किंवा कर्ज कंपनी म्हणून वर्गीकरण करण्यास ती कंपनी पात्र होण्यासाठी तिचा ॲसेट/उत्पन्न आकृतीबंध (पॅटर्न) दर्शविला जावा.

(2) एखाद्या एनबीएफसी एमएफआय साठी अशा प्रमाणपत्रात निर्देशित केले जावे की, अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र.234/सीजीएम(युएस)-2011 दि. डिसेंबर 2, 2011 नुसार एक एनबीएफसी एमएफआय म्हणून वर्गीकृत होण्यासाठी विहित केलेल्या सर्व अटी त्या कंपनीने पूर्ण केल्या आहेत.

(3) एनबीएफसी-फॅक्टरसाठी, अशा प्रमाणपत्रात, फॅक्टरिंग अधिनियमाच्या कलम 3 खाली असे प्रमाणपत्र धारण करण्याची आवश्यकता निर्देशित केली जावी. अशा प्रमाणपत्रात फॅक्टरिंग ॲसेट्स व उत्पन्न ह्यांची टक्केवारी तसेच तिचे एनबीएफसी-फॅक्टर म्हणून वर्गीकरण करण्यास ह्या अधिनियमाखाली विहित केलेल्या सर्व अटींचे तिने पालन केले आहे व एफडीआय प्राप्त झाला असल्यास किमान भांडवली नॉर्म्सचे पालन केले आहे ह्या गोष्टीही निर्देशित केल्या जाव्यात.

**कॅपिटल ॲडेक्वसी बाबतची आवश्यकता**

(16) (1) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, टायर 1 व टायर 2 भांडवलाचे किमान भांडवली गुणोत्तर ठेवील व ते गुणोत्तर, तिचे ताळेबंदावरील एकूण जोखीम भारित ॲसेट्स व ताळेबंदाबाहेरील बाबींचे जोखीम समायोजित मूल्य ह्याच्या 15% पेक्षा कमी असणार नाही.

(2) कोणत्याही वेळी एकूण टायर 1 भांडवल मार्च 31, 2016 पर्यंत 8.5% पेक्षा व मार्च 31, 2017 पर्यंत 10% पेक्षा कमी असणार नाही.

(3) सुवर्ण अलंकारांच्या विरुध्द मुख्यत्त्वेकरुन कर्ज देणा-या एनबीएफसींनी (अशी कर्जे त्यांच्या वित्तीय ॲसेट्सच्या 50% किंवा अधिक असल्यास) 12% एवढे किमान टायर 1 भांडवल ठेवावे.

--------------

(2) डीएनबीएस(पीडी) सी.सी.क्र. 81/03.05.002/2006-07 दि. ऑक्टोबर 19, 2006 मध्ये स्पष्ट करण्यात आले होते की, अबँकीय वित्तीय संस्थेचा (एनबीएफआय) व्यवसाय म्हणजे, आरबीआय अधिनियम 1934 च्या कलम 45 आय (ए) मध्ये दिल्यानुसार, वित्तीय संस्थेचा व्यवसाय करणारी एक कंपनी ह्यासाठी, वृत्तपत्र निवेदन 1998-99/1269 दि. एप्रिल 8, 1999 अन्वये दिलेल्या 'मुख्य व्यवसाय'च्या व्याख्येचे अनुसरण करावे.

(4) कोणत्याही ठेवी एनबीएफसी-एमएफआयचे एकूण टायर 2 भांडवल टायर 1 भांडवलाच्या 100% पेक्षा अधिक असू नये.

स्पष्टीकरणे :-

(1) ताळेबंदावरील ॲसेट्स :-

(1) ह्या निर्देशांमध्ये, अमुक टक्के भार म्हणून कर्ज जोखमीचे स्तर/प्रमाण ताळेबंदावरील ॲसेट्सना देण्यात आले आहेत. ह्यामुळे, त्या ॲसेटचे जोखीम तडजोडित मूल्य काढण्यासाठी प्रत्येक ॲसेट/बाबीला संबंधित जोखीम भाराने गुणणे आवश्यक आहे. किमान भांडवली गुणोत्तर काढण्यासाठी एकूण बेरीज (ॲग्रिगेट) हिशेबात घेतले जाईल. जोखीम भारित ॲसेटचे गणन, खाली दिल्यानुसार निधीयुक्त बाबींची एकूण भारित बेरीज म्हणून केले जाईल.

| भारित जोखीम ॲसेट्स | % भार. |
|---|---|
| ताळेबंदावरील बाबी | |
| (1) रोख रक्कम व बँकांकडील स्थित ठेवी व ठेवी प्रमाणपत्रांसह बँक शिल्लका - | 0. |
| (2) गुंतवणुकी | |
| (अ) मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज - | 0. |
| खालील (क) मध्ये दिलेल्या सोडून | |
| (ब) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे बॉंड्स - | 20. |
| (क) स्थिर ठेवी/ठेवींची प्रमाणपत्रे/सार्वजनिक वित्तीय संस्थांचे बॉंड्स - | 100. |
| (ड) सर्व कंपन्यांचे शेअर्स आणि सवे कंपन्यांचे डिबेंचर्स/बॉंड्स/कमर्शियल पेपर्स आणि म्युच्युअल फंडाचे युनिट्स - | 100. |
| [3](ई) पीपीपीमधील सर्व कार्यकृती आणि त्या कमर्शियल ऑपरेशनच्या एक वर्षावर विद्यमान असलेले कमर्शियल ऑपरेशन्स डेट (सीओडी) इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पातील सर्व ॲसेट्स - | 50. |
| (3) विद्यमान/चालु ॲसेट्स | |
| (अ) स्टॉक ऑन हायर (नक्त पुस्तकी मूल्य) - | 100. |
| (ब) आंतर कॉर्पोरेट कर्जे/ठेवी - | 100. |
| (क) कंपनीनेच धारण केलेल्या ठेवींविरुध्द संपूर्णपणे सुरक्षित कर्जे व अग्रिम राशी - | 0. |
| (ड) कर्मचा-यांना दिलेली कर्जे - | 0. |

------------

[3] अधिसूचना क्र.डीएनबीआर.022/सीजीएम(सीडीएस)-2015 दि. मे 14, 2015 अन्वये घालण्यात आला.

| | |
|---|---|
| (ई) चांगली समजली जाणारी इतर सुरक्षित कर्जे व अग्रिम राशी - | 100. |
| (फ) खरेदी केलेली/डिसकाऊंट केलेली देयके - | 100. |
| (ग) इतर (तपशील द्यावा) - | 100. |
| (4) स्थिर ॲसेट्स (घसा-याचे नक्त) | |
| (अ) लीज आऊट केलेले ॲसेट्स (नक्त पुस्तकी मूल्य) - | 100. |
| (ब) कार्यालय (प्रिमायसेस) - | 100. |
| (क) फर्निचर व फिक्चर्स - | 100. |
| (5) इतर ॲसेट्स. | |
| (अ) मूळ स्त्रोतातून वजा केलेला आयकर (तरतुदीचे नक्त) | 0. |
| (ब) प्रदान केलेला अग्रिम कर (तरतुदीचे नक्त) | 0. |
| (क) सरकारी सिक्युरिजवरील येणे व्याज | 0. |
| इतर (तपशील द्यावा) | 100. |

सूचना :-

(1) घसारा किंवा वाईट व शंकास्पद कर्जासाठी तरतुदी केल्या आहेत केवळ अशाच ॲसेट्सबाबत नेटिंग केले जावे.

(2) नक्त निज निधी काढण्यासाठी, निज निधीमधून वजा केलेल्या ॲसेट्ससाठी ‘शून्य’ भार असेल.

(3) जोखीम भार देण्यासाठी एखाद्या कर्जदाराचे निधीयुक्त एक्सपोझर काढताना अशा अबँकीय वित्तीय कंपन्या, त्या कर्जदाराच्या एकूण आऊटस्टँडिंग एक्सपोझर मधून, दिलेल्या अग्रिम राशींविरुध्द तारण म्हणून ठेवलेल्या, रोख रक्कम, मार्जिन/कॉशन मनी/सिक्युरिटी ठेवी (ज्यांच्या विरुध्द सेट ऑफ करण्याचा हक्क उपलब्ध आहे) ची रक्कम नेट ऑफ करु शकतात.

(5) निम्न उत्पन्न गृहनिर्माणासाठी कर्ज जोखीम हमी निधी ट्रस्टने (सीआरजीएफटीएलआयएच) हमी दिलेल्या कर्जांसाठी, एनबीएफसी-एमएफआय हमी दिलेल्या भागासाठी शून्य जोखीम भार लावू शकतात. हमी दिलेल्या भावापेक्षा अतिरिक्त असलेल्या आऊटस्टँडिंग शिल्लकेला विद्यमान मार्गदर्शन तत्वांनुसार जोखीम भार लागु होतील.

(6) पायाभूत सोयी कर्जांसाठीचे नॉर्म्स

(अ) एएए रेटिंग असलेल्या सिक्युरिटाइज्ड पेपरमध्ये गुंतवणुक करण्यासाठीचा जोखीम भार.

त्या पायाभूत सोयी सुविधेसंबंधाने, ‘एएए’ रेटींगच्या सिक्युरिटाइज्ड पेपरमध्ये केलेल्या गुंतवणुकीला, कॅपिटल ॲडेक्वसीसाठी, पुढील अटी पूर्ण केल्या असल्यास 50% एवढा जोखीम भार लागु असेल.

(1) ती पायाभूत सोयी सुविधा त्या सिक्युरिटाईज्ड पेपरचे सर्व्हिसिंग/परतफेड करण्यासाठी/करण्याजोगे उत्पन्न/कॅश फ्लो निर्माण करत आहे.

(2) एका मंजुरीप्राप्त/मान्यताप्राप्त क्रेडिट रेटिंग एजन्सीकडून मिळालेले रेटिंग विद्‌यमान/चालु व वैध असले पाहिजे.

स्पष्टीकरण

तो इश्यु ओपन झाल्याच्या तारखेस ते रेटिंग एक महिन्यापेक्षा जुने/दिलेले नसल्यास आणि तो इश्यु ओपन झाल्याच्या तारखेस रेटिंग एजन्सीने दिलेले रेटिंग रॅशनल एक वर्षापेक्षा जुने नसल्यास आणि रेटिंगबाबतचे पत्र व रेटिंग रॅशनल ह्या इश्युच्या ऑफर डॉक्युमेंटचा एक भाग असल्यासच आधारभूत रेटिंग हे विद्‌यमान/चालु व वैध समजले जाईल.

(3) सेकंडरी मार्केट अॅक्विझिशनच्या बाबतीत, त्या इश्युचे 'एएए' रेटिंग जारी असून संबंधित रेटिंग एजन्सीने प्रसिध्द केलेल्या तिच्या मासिक बुलेटिनमध्ये त्याबाबत दुजोरा दिलेला असावा.

(4) तो सिक्युरिटाइज्ड पेपर हा एक कार्यकारी/कार्यक्षम अॅसेट असावा.

(ब) इन्फ्रास्ट्रक्चर वित्तीय कंपन्यांसाठी, किमान एक वर्ष कमर्शियल ऑपरेशन्स समाधानकारक रितीने पूर्ण केलेल्या पोस्ट कमर्शियल ऑपरेशन्स डेट (सीओडी) प्रकल्पांसाठी व पीपीपीच्या अॅसेट्ससाठीचा जोखीम भार 50% टक्के असेल.

**(2) ताळेबंदाबाहेरील बाबी**

**(अ) सर्वसाधारण**

एनबीएफसी, ताळेबंदाबाहेरील क्रेडिट एक्सपोझरचा एकूण जोखीम भारित भार हा, मार्केट संबंधित व मार्केटशी संबंधित नसलेल्या ताळेबंदाबाहेरील बाबींच्या जोखीम भारित रकमेची बेरीज म्हणून गणन करतील. क्रेडिट एक्सपोझर निर्माण करणा-या, ताळेबंदाबाहेरील बाबींची जोखीम भारित रक्कम, एका दोन पाय-या असलेल्या प्रक्रियेने काढली जाईल.

(अ) व्यवहाराची नोशनल रक्कम, त्या रकमेला, विहित केलेल्या क्रेडिट कन्व्हर्शन फॅक्टरने गुणून किंवा विद्‌यमान एक्सपोझर रीत लागु करुन, एका कर्ज सममूल्य रकमेत रुपांतरित केली जाईल. आणि

(ब) आलेल्या कर्ज सममूल्य रकमेला लागु असलेल्या जोखीम भाराने गुणण्यात येईल - म्हणजे - केंद्र सरकार/राज्य सरकारे ह्यांच्याबाबतच्या एक्सपोझरसाठी शून्य टक्के, बँकांबाबतच्या एक्सपोझरसाठी 20% व इतरांसाठी 100%.

**(ब) मार्केटशी संबंधित नसलेल्या ताळेबंदाबाहेरील बाबी**

(1) मार्केटशी संबंधित नसलेल्या एखाद्‌या ताळेबंदाबाहेरील बाबी संबंधीची कर्ज सममूल्य रक्कम, त्या विशिष्ट व्यवहाराच्या कॉंट्रॅक्टेड रकमेला, संबंधित क्रेडिट कनव्हर्शन फॅक्टरने (सीसीएफ) गुणून निश्चित केले जाईल.

| अनु क्र | संलेख | | कर्ज रुपांतरण घटक |
|---|---|---|---|
| i. | वित्तीय व इतर हमी | | 100 |
| ii. | शेअर/डिबेंचर अंडररायटिंग दायित्वे | | 50 |
| iii. | अंशतः प्रदान केलेले शेअर्स/डिबेंचर्स | | 100 |
| iv. | डिसकाऊंटेड/रिडिसकाऊंटेड देयके | | 100 |
| v. | केलेले परंतु अजून प्रत्यक्षात सुरु न झालेले लीज करार | | 100 |
| vi. | कर्ज जोखीम एनबीएफसीवरच आहे असे विक्री व पुनर् खरेदी करार व आधार असलेले ॲसेट सेल्स. | | 100 |
| vii. | फॉरवर्ड ॲसेट खरेद्या, फॉरवर्ड ठेवी व विशिष्ट ड्रॉ डाऊनबाबत दायित्व दर्शविणारे अंशतः प्रदान केलेले शेअर्स व सिक्युरिटीज. | | 100 |
| viii. | एनबीएफसींच्या सिक्युरिटीज कर्जाऊ देणे किंवा रेपो स्टाईल व्यवहारांमधून निर्माण झालेल्या प्रसंगासह, एनबीएफसींकडून तारण म्हणून सिक्युरिटीजचे पोस्टिंग केले जाणे. | | 100 |
| ix. | एक वर्षापर्यंत, एक वर्षापेक्षा अधिक काळासाठींच्या मूळ परिपक्वतेची इतर दायित्वे (उदा. फॉर्मल स्टँडबाय सुविधा व क्रेडिट लाईन्स).<br>एक वर्षापर्यंत<br>एक वर्षापेक्षा अधिक | | <br><br>20<br>50 |
| x. | कोणतीही पूर्व सूचना न देता, कोणत्याही वेळी, कोणत्याही अटीशिवाय रद्द करता येण्याजोगी किंवा कर्जदाराच्या कर्ज घेण्याच्या लायकीमधील -हासामुळे आपोआप रद्दीकरण उपलब्ध करुन देणारी त्याच प्रकारची दायित्वे. | | 0 |
| xi. | ताबा मिळविणा-या संस्थेच्या पुस्तकांमधील टेक आऊट वित्त. | | |
| | | विनाअट टेक आऊट वित्त | 100 |
| | | अटींसह टेक आऊट वित्त | 50 |
| | | टीप :- प्रतिपक्षाचे एक्सपोझर जोखीम भार ठरविणार असल्याने तो सर्व कर्जदारांसाठी 100 टक्के असेल किंवा सरकारी हमी खाली असल्यास तो शून्य टक्के असेल. | |
| xii. | प्रमाणभूत ॲसेट्स व्यवहारांच्या सिक्युरिटायझेशनसाठी लिक्विडिटी सुविधा पुरविण्याचे दायित्व | 100 | |
| xiii. | तृतीय पक्षाने दिलेल्या प्रमाणभूत ॲसेट व्यवहारांच्या सिक्युरिटायझेशनसाठी सेकंड लॉस सहाय्य. | 100 | |
| xiv. | इतर आणीबाणीची दायित्वे (तपशील दिला जावा) | 50 | |

सूचना :

*(1) रुपांतरण घटक लागु करण्यापूर्वी कॅश मार्जिन्स/ठेवी वजा केल्या जातील.*

*(2) मार्केटशी संबंध नसलेली ताळेबंदाबाहेरील बाब ही ड्रॉन किंवा अंशतः ड्रॉन निधी आधारित सुविधा असल्यास, ताळेबंदाबाहेरील मार्केटशी संबंधित नसलेल्या क्रेडिट एक्सपोझर्स काढण्यासाठी समाविष्ट करण्याची अनड्रॉन दायित्वाची रक्कम, म्हणजे परिपक्वतेच्या शेष कालावधीदरम्यान काढू शकता येईल असा दायित्वाचा न वापरलेल्या*

*भागाचा कमाल भाग असेल. दायित्वाचा कोणताही काढलेला भाग, एनबीएफसीचा ताळेबंदावरील क्रेडिट एक्सपोझरचा एक भाग होतो.*

*उदाहरणार्थ :*

*तीन वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने काढता/घेता येण्याजोगे रु.700 कोटींचे कर्ज एका मोठ्या प्रकल्पासाठी मंजुर करण्यात आले आहे. मंजुरीच्या अटीनुसार तीन टप्प्यांमध्ये ड्रॉ डाऊन करण्यास परवानगी आहे - प्रथम टप्प्यात रु.150 कोटी, दुस-या टप्प्यात रु.200 कोटी व तिस-या टप्प्यात रु.350 कोटी. येथे कर्जदाराला काही शिष्टाचार पूर्ण केल्यावर टप्पा 2 व टप्पा 3 खाली, ड्रॉ डाऊन करण्यासाठी त्या एनबीएफसीची नेमकी मंजुरी घेणे आवश्यक आहे. कर्जदाराने पहिल्या टप्प्यात रु.50 कोटी आधीच काढले असल्यास, न काढलेला भाग केवळ पहिल्या टप्प्याच्या संदर्भातच गणन केला जाईल. म्हणजे, तो रु.100 कोटी असेल. पहिला टप्पा एक वर्षात पूर्ण करावयाचा असल्यास सीसीएफ 20% असेल व तो एक वर्षापेक्षा अधिक असल्यास लागु असलेला सीसीएफ 50% असेल.*

**(क) मार्केट संबंधित ताळेबंदाबाहेरील बाबी**

(1) ताळेबंदाबाहेरील जोखीम भारित क्रेडिट एक्सपोझर्सचे गणन करतेवेळी, एनबीएफसींनी, मार्केट संबंधित ताळेबंदाबाहेरील सर्व बाबी (ओटीसी डेरिवेटिवज् व सिक्युरिटीज् रेपो/रिव्हर्स रेपो/सीबीएलओ इत्यादि सारखे वित्तीय व्यवहार) हिशेबात घ्यावेत.

(2) मार्केट संबंधित ताळेबंदाबाहेरील बाबींवरील कर्ज जोखीम हा, प्रतिपक्षाने कसुरी केल्यास, करारनाम्याच्या अटींनुसार विहित केलेला कॅश फ्लो परत आणण्यासाठी एनबीएफसीला येणारा खर्च आहे. तथापि, हे इतर बाबींबरोबर, कंत्राटाची परिपक्वता व त्या संलेखाच्या प्रकाराच्या दराच्या अस्थिरतेवर अवलंबून असेल.

(3) मार्केट संबंधित ताळेबंदाबाहेरील बाबींमध्ये पुढील गोष्टी येतील.

(अ) व्याजदर कंत्राटे - एकल चलन व्याज दर स्वॅप्स, बेसिस स्वॅप्स, फॉरवर्ड रेट करार आणि व्याजदर फ्युचर्स हयासह.

(ब) विदेशी मुद्रा कंत्राटे - सुवर्ण संबंधित कंत्राटासह - क्रॉस करन्सी स्वॅप्स (क्रॉस करन्सी व्याजदर स्वॅप्स सह), फॉरवर्ड विदेशी मुद्रा विनिमय कंत्राटे, करन्सी फ्युचर्स, करन्सी ऑप्शन्स, हयासह.

(क) क्रेडिट डिफॉल्ट स्वॅप्स आणि

(ड) कर्ज जोखीम निर्माण करणारी, रिझर्व्ह बँकेने खास करुन परवानगी दिलेली इतर कोणतीही मार्केट संबंधित कंत्राटे.

(4) भांडवली आवश्यकतापासूनची सूट मिळण्यास पुढील बाबी पात्र आहेत.

(अ) 14 कॅलेंडर दिवस किंवा त्यापेक्षा कमी दिवसांची मूळ परिपक्वता असलेली विदेशी मुद्रा (सोने सोडून) कंत्राटे आणि

(ब) दैनंदिन मार्क-टु-मार्केट व मार्जिन प्रदान करण्याच्या अटीवरील, फ्युचर्स व ऑप्शन एक्सचेंजेस वर ट्रेडिंग केलेले संलेख.

(5) डेरिवेटिवजचे ट्रेडिंग व सिक्युरिटीज् फायनान्सिंग व्यवहारांमुळे (उदा - तारणयुक्त कर्ज घेणे व देणे दायित्वे - सीबीएलओ, रेपोज) त्यांच्याविरुध्द आऊटस्टँडिंग असलेले केंद्रीय प्रतिपक्षांना (सीसीपी) येणा-या एक्सपोझर्सना, प्रतिपक्ष कर्ज जोखमीसाठी शून्य एक्सपोझर मूल्य दिले जाईल; कारण असे समजण्यात येते की, सीसीपींचे त्यांच्या प्रतिपक्षांबाबतचे एक्सपोझर दैनंदिन धर्तीवर संपूर्णपणे तारणयुक्त/तारणाने सुरक्षित करण्यात आले आहे व त्यामुळे सीसीपीच्या कर्ज जोखीम एक्सपोझरला संरक्षण मिळाले आहे.

(6) सीसीपींकडे तारण ठेवलेल्या कॉर्पोरेट सिक्युरिटीजना 100% सीसीएफ लागु केला जाईल आणि परिणामी येणा-या ताळेबंदाबाहेरील एक्सपोझरला त्या सीसीपींच्या स्वरुपानुसार योग्य असे जोखीम भार दिले जातील. क्लियरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (सीसीआयएल) च्या बाबत जोखीम भार 20% असेल व इतर सीसीपींसाठी तो 50% असेल.

(7) डेरिवेटिवजच्या व्यवहारांबाबत एखाद्या प्रतिपक्षाला असणारे एक्सपोझर, खाली दिलेल्या विद्यमान एक्सपोझर रीतीनुसार काढले जावे :-

**(ड) विद्यमान/चालु एक्सपोझर रीत**

विद्यमान एक्सपोझर रीत वरुन, एखाद्या मार्केट संबंधित ताळेबंदाबाहेरील व्यवहाराची कर्ज सममूल्य रक्कम म्हणजे - (अ) विद्यमान कर्ज एक्सपोझर व (ब) त्या कंत्राटाचे संभाव्य फ्युचर कर्ज एक्सपोझर ह्यांची बेरीज.

(अ) विद्यमान/चालु कर्ज एक्सपोझरची व्याख्या म्हणजे, केवळ एकाच प्रतिपक्षाबाबतच्या सर्व कंत्राटांच्या एकूण/ढोबळ सकारात्मक मार्क टु मार्केट मूल्यांची बेरीज (त्याच प्रतिपक्षाबरोबर केलेल्या सकारात्मक (धन) व नकारात्मक (ऋण) मूल्यांचे नेटिंग केले जाऊ नये). ही कंत्राटे मार्केटला मार्क करुन, विद्यमान कर्ज एक्सपोझर्सचे नियतकालिक गणन करणे, ह्या विद्यमान एक्सपोझरसाठी आवश्यक आहे.

(ब) संभाव्य फ्युचर कर्ज एक्सपोझर, ह्यापैकी प्रत्येक कंत्राटच्या नोशनल मुद्दल रकमेला - मग त्या कंत्राटाला शून्य, धन किंवा ऋण मार्क टु मार्केट मूल्य असले तरी - त्या संलेखाचे स्वरुप व शेष परिपक्वतानुसार खाली दिल्यानुसार संबंधित ॲड ऑन घटकाने गुणून निश्चित केले जाते.

| व्याजदर संबंधित, विनिमय दर संबंधित व सुवर्ण संबंधित डेरिवेटिवज्साठी कर्ज रुपांतरण घटक. | | |
|---|---|---|
| कर्ज रुपांतरण घटक (%) | | |
| व्याजदर कंत्राटे | विनिमय दर कंत्राटे व सुवर्ण | |
| एक वर्ष किंवा कमी | 0.50 | 2.00 |
| एक वर्षापेक्षा अधिक ते पाच वर्षे. | 1.00 | 10.00 |
| पाच वर्षांपेक्षा अधिक. | 3.00 | 15.00 |

(1) मुद्दलाचे अनेक विनिमय असलेल्या कंत्राटांबाबत, ॲड ऑन घटकांना, त्या कंत्राटामधील उरलेल्या/शेष प्रदानांच्या संख्येने गुणावयाचे आहे.

(2) विहित केलेल्या प्रदान तारखांचे पालन करणा-या व ह्या विहित केलेल्या तारखांना त्या कंत्राटाची किंमत शून्य असेल अशा प्रकारे अटी पुनर्रचित करुन, आऊटस्टँडिंग एक्सपोझर निश्चित (सेटल) करण्यासाठी रचना केलेल्या कंत्राटांसाठी, उर्वरित परिपक्वता ही पुढील रिसेट तारखेपर्यंतच्या वेळेपर्यंत/वेळेसमान सेट केली जाईल. तथापि, एक वर्षापेक्षा अधिक उर्वरित परिपक्वता असलेल्या व वरील निकष पूर्ण करणा-या व्याजदर कंत्राटांसाठी, सीसीएफ किंवा ॲड ऑन घटक 1.0 टक्के असेल.

(3) एकल चलन फ्लोटिंग/फ्लोटिंग व्याजदर स्वॅप्ससाठी कोणतेही संभाव्य फ्युचर कर्ज एक्सपोझर काढले/गणन केले जाणार नाही. ह्या कंत्राटांवरील क्रेडिट एक्सपोझर केवळ त्यांच्या मार्क टु मार्केट मूल्याच्या धर्तीवरच काढले जाईल.

(4) संभाव्य फ्युचर एक्सपोझर्स हे, 'दर्शनी नोशनल रकमां' ऐवजी परिणाम आधारित असावेत.व्यवहाराच्या रचनेमुळे 'दर्शविलेली नोशनल रक्कम', वाढविली/लिव्हरेज केली गेल्यास संभाव्य फ्युचर एक्सपोझर ठरविण्यासाठी 'परिणामकारक नोशनल रक्कम' वापरली जावी. उदाहरणार्थ, एनबीएफसीच्या कर्ज देण्याच्या दराच्या दुप्पट अंतर्गत दरावर आधारित प्रदाने असलेल्या व युएसडी एक दशलक्ष स्टेटेड नोशनल रक्कमेबाबतची परिणामकारक नोशनल रक्कम असेल. युएसडी 2 मिलियन असेल.

**(ई) क्रेडिट डिफॉल्ट स्वॅप्स (सीडीएस) साठी कर्ज रुपांतरण घटक**

एनबीएफसींना, केवळ त्या धारण करत असलेल्या कॉर्पोरेट बाँड्सवरील कर्ज जोखीम हेज करण्यासाठी कर्ज संरक्षण विकत घेण्यास परवानगी आहे. हे बाँड्स चालु वर्गात किंवा कायम वर्गात धारण केले जाऊ शकतात. ह्या एक्सपोझर्ससाठीचा भांडवली आकार पुढीलप्रमाणे असेल.

(1) चालु वर्गात धारण केलेल्या व सीडीएसने हेज केलेल्या आणि सीडीएस व हेज केलेला बाँडमध्ये असमानता (मिस मॅच) नसल्यास, कर्ज संरक्षण हे हेजिंग केलेल्या एक्सपोझरच्या कमाल 80% ठेवण्यासपरवानगी आहे. ह्यासाठी, ती एनबीएफसी त्या कॉर्पोरेट बाँडसाठीचा भांडवली आकार हा, लागु असलेल्या भांडवली आकाराच्या 20% पर्यंत ठेवणे सुरु ठेवील. त्या बाँडच्या मार्केट मूल्याच्या 20% एवढे एक्सपोझर मूल्य घेऊन व त्यानंतर त्याला इश्यु करणा-या संस्थेच्या जोखीम भाराने गुणून हे मिळविता येते. ह्याशिवाय, विकत घेतलेल्या सीडीएस स्थितीला प्रतिपक्ष जोखमीसाठी भांडवली आकार लागु पडेल व तो काढण्यासाठी 100% कर्ज रुपांतरण घटक व ते संरक्षण विक्रेत्याला लागु असलेला जोखीम भार लागु असेल - म्हणजे, बँकांसाठी 20% व इतरांसाठी 100%.

(2) कायम वर्गात धारण केलेल्या सीडीएसने हेज केलेल्या व सीडीएस व हेज केलेल्या बाँडमध्ये असमानता नसलेल्या कॉर्पोरेट बाँड्ससाठी, एनबीएफसी संबंधित ॲसेटसाठी संपूर्ण कर्ज संरक्षण मानू शकतात व त्यासाठी कोणतेही भांडवल ठेवण्याची गरज नाही. ह्या एक्सपोझर ऐवजी/च्या जागी संरक्षण विक्रेत्याला

असलेले संपूर्ण एक्सपोझर असेल व त्याला, संरक्षण विक्रेत्याला लागु असलेला जोखीम भार लागु असेल. म्हणजे, बँकांसाठी 20% व इतरांसाठी 100%.

**अबँकीय वित्तीय कंपनीच्या स्वतःच्या शेअर्सविरुध्द कर्जांना मनाई**

(17) कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी तिच्या स्वतःच्या शेअर्स विरुध्द कर्ज देणार नाही.

**एकल वस्तु/उत्पादाच्या सिक्युरिटी विरुध्द कर्जे - सुवर्ण अलंकार**

(18) (अ) सर्व एनबीएफसी -

(1) सुवर्ण अलंकारांच्या तारणाविरुध्द दिलेल्या कर्जांसाठी 75% पेक्षा जास्त नसलेले कर्ज : मूल्य (एलटीव्ही) गुणोत्तर ठेवतील.

**मात्र**, परवानगीप्राप्त कमाल कर्ज रक्कम ठरविण्यासाठी सुवर्ण अलंकारांचे मूल्य, त्या दागिन्यांमधील सोन्याच्या किंमतीएवढीच असेल व त्यात अन्य कोणताही खर्च जोडला जाणार नाही. दागिन्यांमध्ये असलेल्या केवळ सुवर्णाचे मूल्य ह्या निर्देशांमधील परिच्छेद 17क(1) मध्ये दिल्यानुसार काढले जाईल.

त्यांच्या ताळेबंदामध्ये अशा कर्जांची त्यांच्या एकूण ॲसेटशी असलेली टक्केवारी प्रकट करतील.

(ब) एनबीएफसींनी सोने/प्राथमिक सुवर्ण व सोन्याच्या नाण्यांविरुध्द कोणतीही अग्रिम राशी देऊ नये. प्राथमिक सोने, गोल्ड बुलियन, सुवर्णालंकार, सोन्याची नाणी, एक्सचेंज ट्रेडेड फंड (इटीएफ व गोल्ड म्युच्युअल फंड ह्यांच्यासह कोणत्याही स्वरुपातील सोने खरेदी करण्यास कोणतीही अग्रिम राशी देऊ नये.

**सोन्याच्या मालकीची पडताळणी करणे**

(19) (1) एखाद्या कर्जदाराने कोणत्याही एके वेळी किंवा संचयित रितीने, थकित कर्जावर प्लेज केलेले सोन्याचे अलंकार 20 ग्रामपेक्षा अधिक असल्यास, एनबीएफसीने त्या अलंकारांच्या मालकीच्या पडताळणीचे रेकॉर्ड ठेवावे. अशी मालकी पडताळणी केवळ त्या गहाणवट अलंकारांसाठीच्या मूळ पावतीद्वाराच करणे आवश्यक नाही तर, विशेषतः थकित कर्जावर, कर्जदाराने एके वेळी किंवा संचयित रितीने प्लेज केलेले अलंकार 20 ग्राम पेक्षा अधिक असल्यास, प्रत्येक प्रकरणामध्ये त्या सोन्याची मालकी कशी ठरविण्यात आली ह्याबाबतचे एक सुयोग्य डॉक्युमेंट तयार केले जावे.

(2) संचालक मंडळाच्या सर्वसमावेशक धोरणांमध्ये, त्या मंडळाने ह्या बाबत मंजुर केलेले नेमके धोरण प्रत्येक एनबीएफसीकडे असावे.

**एलटीव्ही गुणोत्तर काढण्यासाठी, तारण म्हणून स्वीकारलेल्या सोन्याच्या मूल्याचे प्रमाणभूतीकरण**

(20) (1) अबँकीय वित्तीय कंपनीने तारण म्हणून स्वीकारलेल्या सुवर्ण अलंकारांचे मूल्य/मूल्यांकन पुढील रितीने केले जाईल :

(1) अबँकीय वित्तीय कंपनीने तारण म्हणून स्वीकारलेल्या सुवर्ण अलंकाराचे मूल्यांकन, बॉंबे बुलियन असोशिएशनने (बीबीए) दिलेल्या 22 कॅरट सोन्याच्या बंद किंमतीच्या मागील 30 दिवसांच्या सरासरीने किंवा फॉरवर्ड मार्केट्स कमिशनद्वारा विनियमित केलेल्या कमोडिटी एक्सचेंजने सार्वजनिकरीत्या प्रसृत केलेल्या [4] हिस्टॉरिकल स्पॉट गोल्ड प्राईसनुसार केले जाईल.

(2) त्या सोन्याची शुध्दता 22 कॅरेटपेक्षा कमी असल्यास, ती एनबीएफसी ते तारण 22 कॅरटमध्ये रुपांतरित करील व त्या तारणाचे नेमके ग्राम्स सांगील. दुस-या शब्दात, कमी शुध्दतेच्या सोन्याचे मूल्यांकन प्रथमानुसार केले जाईल.

(3) तारण म्हणून सोने स्वीकारताना, एनबीएफसींनी, त्यांच्या लेटरहेडवर कर्जदाराला, तिने त्या सोन्याचे पारख केले असल्याचे व तारण ठेवलेल्या सोन्याची शुध्दता (कॅरेट्समध्ये) व वजन निर्देशित केलेले प्रमाणपत्र द्यावे.

विमोचन करतेवेळी तंटा-वादापासून संरक्षण करण्यासाठी एनबीएफसी सुयोग्य कॅव्हिअ‍ॅट्स ठेवू शकतात, परंतु परवानगीप्राप्त कमाल कर्ज व लिलावासाठीची राखीव किंमत ह्या दोन्ही वेळी प्रमाणित केलेली शुध्दता लागु असेल.

(2) लिलाव

(अ) कर्ज दिलेली शाखा ज्या शहरात किंवा तालुक्यात असेल त्याच शहरात किंवा तालुक्यात लिलाव केला जावा.

(ब) [5]सोन्याचा लिलाव करताना एनबीएफसीने तारण ठेवलेल्या अलंकारांसाठी एक राखीव किंमत घोषित करावी. तारण ठेवलेल्या अलंकारांची राखीव किंमत, बॉंबे बुलियन असोशिएशन लि. (बीबीए) किंवा फॉरवर्ड मार्केट्स कमिशनद्वारा विनियमित असलेल्या एखाद्या कमोडिटी एक्सचेंजने सार्वजनिक रितीने प्रसृत

केलेल्या हिस्टॉरिकल स्पॉट गोल्ड प्राईस डेटानुसार 22 कॅरट सोन्याच्या मागील 30 दिवसांच्या बंद किंमतीच्या सरासरी मूल्याच्या 85% पेक्षा कमी नसावी आणि कॅरटच्या हिशेबाने कमी शुध्दतेच्या दागिन्यांचे मूल्य त्या प्रमाणात कमी केले जावे.

(क) एनबीएफसींसाठी हे सक्तीचे असेल की त्यांनी लिलावात मिळालेल्या मूल्याचा संपूर्ण तपशील, तडजोडित केलेली थकित रक्कम ह्याचाही तपशील द्यावा आणि थकित कर्जापेक्षा अधिक असलेली रक्कम कर्जदाराला परत करावी.

-------------------

(4) अधिसूचना क्रमांक डीएनबीआर.025/सीजीएम(सीडीएस)-2015 दि. मे 21, 2015 अन्वये टाकण्यात आले.

(5) अधिसूचना क्रमांक डीएनबीआर.025/सीजीएम(सीडीएस)-2015 दि. मे 21, 2015 अन्वये बदली टाकण्यात आले.

(ड) एनबीएफसींनी त्यांच्या वार्षिक अहवालांमध्ये, कर्ज खाती, थकित रकमा, मिळालेले मूल्य व तिच्या सिस्टर संस्थेने लिलावात भाग घेतला होता काय ह्यासह, त्या वर्षात केलेल्या लिलावांचा तपशील द्यावा.

**सुवर्ण अलंकारांच्या तारणाविरुध्द कर्ज देताना, अबँकीय वित्तीय कंपन्यांनी अनुसरण्याचे सुरक्षा व सुरक्षितता उपाय**

(21) (1) सुवर्ण अलंकारांच्या विरुध्द कर्ज देण्याचा व्यवसाय करणा-या अबँकीय वित्तीय कंपन्यांनी, जेथे तारण म्हणून सुवर्ण अलंकार स्वीकारले जातात अशा त्यांच्या प्रत्येक शाखेत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व तो चालविण्यासाठीचे सुयोग्य सुरक्षा उपाय ह्यासह, आवश्यक त्या पायाभूत सोयी व सुविधा ठेवण्यात आल्या असल्याची खात्री करुन घ्यावी. तारण म्हणून स्वीकारलेल्या सुवर्ण अलंकारांच्या सुरक्षेसाठी व कर्जदारांसाठी सोय म्हणून हे आवश्यक आहे.

(2) सेफ डिपॉझिट व्हॉल्टसह सुवर्ण अलंकार ठेवण्यासाठी व सुरक्षेसाठी सुयोग्य व्यवस्था केल्याशिवाय कोणत्याही नवीन शाखा उघडल्या जाऊ नयेत.

**एक हजारापेक्षा अधिक संख्येने शाखा उघडणे**

(22) 1000 पेक्षा अधिक शाखा उघडण्यासाठी अबँकीय वित्तीय कंपन्या रिझर्व्ह बँकेची पूर्व मंजुरी मिळवतील. तथापि, 1000 पेक्षा अधिक शाखा आधीच असलेल्या एनबीएफसी आणखी विस्तार करण्यासाठी ह्या बँकेकडे पूर्व मंजुरीसाठी जाऊ शकतात. ह्याशिवाय सुवर्ण अलंकार ठेवण्यासाठी आणि तारण ठेवलेल्या सुवर्ण अलंकारासाठी किमान सुरक्षा सुविधांशिवाय कोणत्याही नवीन शाखा उघडण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**शेअर्सच्या प्रतिभूती विरुध्द कर्जे देणे**

(23) [6]सूचिबध्द शेअर्सच्या तारणाविरुध्द कर्ज देणा-या एनबीएफसींनी -

(1) शेअर्सच्या तारणाविरुध्द दिलेल्या कर्जांसाठी लोन टु व्हॅल्यु (एलटीव्ही) गुणोत्तर 50% ठेवावे. हे 50% एलटीव्ही गुणोत्तर सर्व वेळी ठेवले जाणे आवश्यक आहे.

शेअर्सच्या किंमतीमधील बदलांमुळे येणारी 50% एलटीव्ही ठेवण्यातील तूट 7 दिवसांच्या आत भरुन टाकण्यात यावी.

(2) भांडवली बाजारात गुंतवणुक करण्यासाठी कर्ज देण्यात येत असल्यास, 5 लाखांपेक्षा अधिक रकमेच्या कर्जासाठी, ह्या बँकेने पुनरावलोकन करण्याच्या अटीवर, केवळ ग्रुप 1 सिक्युरिटीच स्वीकाराव्यात (सेबीने दिलेल्या एसएमडी/ पॉलिसी/ सीआयआर- 9/2003 दि. मार्च 11, 2003 मध्ये विहित केलेल्या)

(3) कर्जदारांनी कर्जे मिळविण्यासाठी त्यांच्या हितसंबंधात प्लेज केलेल्या शेअर्सवरील माहिती, जोडपत्र 6 मधील नमुन्यात, तिमाही धर्तीवर स्टॉक एक्सचेंजेसना ऑनलाईन कळविली जावी.

-------------

[6] अधिसूचना क्रमांक डीएनबीआर (पीडी) 018/सीजीएम(सीडीएस)-2015 दि. एप्रिल 10, 2015 अन्वये बदली टाकण्यात आले.

**कर्ज/गुंतवणुक ह्यांची घनता (कॉन्सेंट्रेशन)**

(24)(1) एप्रिल 1, 2007 रोजी व त्यापासून कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी पुढील गोष्टी करणार नाही.

(1) पुढीलप्रमाणे कर्ज देणे.

(अ) तिच्या निजनिधीच्या 15% पेक्षा अधिक कर्ज एकल/एकमेव कर्जदाराला

(ब) कर्जदारांच्या एकल गटाला तिच्या निधीच्या 25% पेक्षा अधिक कर्ज

(2) पुढीलमध्ये गुंतवणुक करणे :

(अ) तिच्या निजनिधीच्या 15% पेक्षा अधिक गुंतवणुक अन्य कंपनीच्या शेअर्समध्ये

(ब) तिच्या निजनिधीच्या 25% पेक्षा जास्त गुंतवणुक केवळ एकाच कंपनी गटाच्या शेअर्समध्ये.

(3) पुढीलपेक्षा जास्त कर्ज देणे व गुंतवणुक करणे (कर्जे/गुंतवणुकी एकत्रित)

(अ) एकल पक्षाला तिच्या निजनिधीच्या 25% आणि

(ब) एकल कंपनी गटाला तिच्या निजनिधीच्या 40%

**मात्र**, अन्य कंपनीच्या शेअर्समधील गुंतवणुकीवरील मर्यादा, रिझर्व्ह बँकेने लेखी स्वरुपात परवानगी दिलेल्या व्याप्तीपर्यंत एखाद्या वित्त कंपनीच्या इक्विटी भांडवलामधील गुंतवणुकीबाबत अबँकीय वित्तीय कंपनीला लागु असणार नाही.

**मात्र**, ह्याशिवाय, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सार्वजनिक निधी व न मिळविणारी किंवा हमी न देणारी कोणतीही अबँकीय वित्तीय कंपन्या, एक्सपोझर मर्यादांच्या गुणधर्मांना अनुसरुन सुयोग्य वाटप करण्यासाठी ह्या बँकेकडे अर्ज करु शकतात.

**मात्र,** ह्याशिवाय, एखादी अबँकीय वित्तीय कंपनी, अतिरिक्त एक्सपोझर हे इन्फ्रास्ट्रक्चर कर्ज आणि/किंवा गुंतवणुकीमुळे आले असल्यास, कर्ज/गुंतवणुक घनतेचे नॉर्म्स, कोणत्याही एकल पक्षासाठी 5% ने आणि पक्षाच्या एकल गटासाठी 10% ने वाढवू शकते.

**मात्र,** इन्फ्रास्ट्रक्चर वित्त कंपन्या कर्जाच्या नॉर्म्सची घनता पुढील बाबतीत वाढवू शकतात.

(1) पुढीलप्रमाणे कर्ज देण्यास

(अ) तिच्या निजनिधीच्या 10% पर्यंत कोणत्याही एकल कर्जदारास

(ब) तिच्या निजनिधीच्या 15% पर्यंत कर्जदारांच्या एकल गटास

(2) पुढीलप्रमाणे कर्ज देण्यास व त्यांच्यामध्ये गुंतवणुक करण्यात (कर्जे/अग्रिम राशी एकत्रित)

(अ) तिच्या निजनिधीच्या 5% पर्यंत एकल पक्षास आणि

(ब) तिच्या निजनिधीच्या 10% पर्यंत पक्षाच्या एकल गटास

(2) एकल पक्ष/पक्षांचा एकल गट बाबतच्या एक्सपोझर्स संबंधाने प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी एक धोरण तयार करील.

(3) एनओएफएचसीने धारण केलेली एनबीएफसी :

(1) प्रायोजक गट किंवा एनओएफएचसीशी संबंधित/संगत असलेले प्रायोजक/प्रायोजक गट संस्था किंवा व्यक्ती ह्यांच्याबाबत कोणतेही एक्सपोझर/(इक्विटी/कर्ज भांडवली संलेखांस कर्ज व गुंतवणुकी) ठेवणार नाही.

(2) त्या एनओएफएचसी खालील कोणत्याही वित्तीय संस्थांच्या इक्विटी/कर्ज भांडवली संस्थांमध्ये गुंतवणुक करणार नाही.

(3) इतर एनओएफएचसींच्या इक्विटी संलेखांमध्ये गुंतवणुक करणार नाही.

स्पष्टीकरण :- ह्या परिच्छेदासंबंधाने ‘प्रायोजक’ व ‘प्रायोजक गट’ ह्या संज्ञांनचे अर्थ, रिझर्व्ह बँकेने (जोडपत्र 2) दिलेल्या ‘खाजगी क्षेत्रातील नवीन बँकांसाठीच्या परवान्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे’ मधील जोडपत्र 1 मध्ये त्या संज्ञांना दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

सूचना :

(1) मर्यादा निश्चित करण्यासाठी ताळेबंदाच्या बाहेरील एक्सपोझर्सना कर्ज जोखमीत रुपांतरित करण्यासाठी, परिच्छेद 16 मध्ये दिल्याप्रमाणे रुपांतरण घटक लावून गुणावे लागेल.

(2) ह्या परिच्छेदात विहित केलेल्या हेतूसाठी डिबेंचर्समध्ये केलेल्या गुंतवणुकींना कर्ज समजले जाईल, - गुंतवणुकी नव्हे.

(3) अशा अबँकीय वित्तीय कंपनीने, तिच्याच गटातील कंपन्या/संस्था ह्यांना तसेच कर्जदार/निवेशक कंपनीच्या गटाला दिलेली कर्जे/गुंतवणुकींना ह्या मर्यादा लागु असतील.

**पत्ता, संचालक, ऑडिटर्स इत्यादिमधील बदलाची माहिती सादर करणे**

(25) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, पुढील बाबतीत झालेल्या बदलाची माहिती, तो बदल झाल्यापासून एक महिन्याच्या आत, अबँकीय वित्तीय कंपन्या, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व्ह बँक) निर्देश, 1998 च्या दुस-या शेड्युलमध्ये निर्देशित केल्यानुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अबँकीय पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाला सादर करील.

(अ) पंजीकृत/कॉर्पोरेट ऑफिसचा संपूर्ण पोस्टल पत्ता, टेलिफोन क्रमांक आणि फॅक्स क्रमांक.

(ब) कंपनीच्या संचालकांची नावे व राहण्याचे पत्ते.

(ब) प्रमुख अधिका-यांची नावे व कार्यालयीन हुद्दे.

(ड) कंपनीच्या ऑडिटरांची नावे व कार्यालयीन पत्ता आणि

(ई) कंपनीच्या वतीने सही करण्यास प्राधिकृत असलेल्या अधिका-यांच्या नमुना सह्या.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बिगर-बँकिंग पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयात, सार्वजनिक ठेवी (रिझर्व्ह बँक) निर्देश, 1998 च्या अबँकिंग वित्तीय कंपन्यांच्या स्वीकृतीच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये सूचित केल्याप्रमाणे.

**एनबीएफसींनी, भागीदारी कंपन्यांमध्ये भागीदार असू/होऊ नये**

(26) (1) कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, एखाद्या भागीदारी कंपनीच्या भांडवलात वर्गणी देणार नाही किंवा अशा कंपनीची भागीदार होणार नाही.

(2) एखाद्या भागीदारी कंपनीच्या भांडवलात आधीच वर्गणी दिलेल्या किंवा एखाद्या भागीदारी कंपनीत भागीदार असलेल्या अबँकीय वित्तीय कंपनीने त्या भागीदारी कंपनीतून शीघ्र निवृत्ती घ्यावी.

(3) ह्या संबंधात पुढे स्पष्ट करण्यात येते की

(अ) वर निर्देशिलेल्या भागीदारी कंपन्यांमध्ये सीमित दायित्व भागीदारीही (एलएलपी) समाविष्ट असेल.

(ब) ह्याशिवाय, वरील मनाई, भागीदारी कंपनी समान स्वरुप असलेल्या, व्यक्ती संघालाही लागु असेल.

एखादी एलएलपी/व्यक्तींचा संघ ह्यांच्या भांडवलात आधीच वर्गणी दिलेल्या किंवा एलएलपीचा भागीदार किंवा व्यक्ती संघाचा सभासद असलेल्या एनबीएफसींना सांगण्यात येते की त्यांनी ती एलएलपी/व्यक्ती संघ ह्यामधून शीघ्र निवृत्त व्हावे.

**अग्रिम राशींची पुनर्रचना करण्यासाठीचे नॉर्म्स**

(27) एनबीएफसींनी दिलेल्या अग्रिम राशींची पुनर्रचना करण्यासाठीचे नॉर्म्स, जोडपत्र 3 मध्ये बदलून दिल्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या नॉर्म्सच्या अनुसार असतील.

**इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्योगांना दिलेल्या दीर्घकालीन प्रकल्प कर्जांची लवचिक पुनर्रचना**

(28) एनबीएफसींनी, इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्योगांना दिलेल्या दीर्घकालीन प्रकल्प कर्जांची लवचिक पुनर्रचना करण्यासाठीचे नॉर्म्स, जोडपत्र 4 मध्ये बदलून दिल्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या नॉर्म्सच्या अनुसार असतील.

**'ब्रँच इन्फो' अहवाल सादर करणे**

(29) सर्व एनबीएफसी, अबँकीय वित्तीय कंपन्या, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व्ह बँक) निर्देश 1998 च्या दुस-या शेड्युल अनुसार, जोडपत्र 5 मध्ये विहित केलेल्या नमुन्यात, दरसाल मार्च 31, जून 30, सप्टेंबर 30 व डिसेंबर 31 रोजी संबंधित तिमाही संपल्यापासून दहा दिवसांच्या आत, ती एनबीएफसी ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अबँकीय पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे, शाखा-माहितीवरील एक तिमाही

अहवाल सादर करील. हा अहवाल https://cosmos.rbi.org.in वर उपलब्ध असलेल्या नमुन्यात ऑनलाईन सादर करावयाचा आहे.

## सूट

(30) भारतीय रिझर्व्ह बँक, त्रास टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक वाटल्यास किंवा एखाद्या न्याय्य व पुरेशा कारणासाठी, तिने टाकलेल्या अटी व शर्तीवर, कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनीला किंवा अबँकीय वित्तीय कंपन्यांच्या वर्गाला, ह्या निर्देशातील तरतुदींचे पालन सर्वसाधारणतः किंवा कोणत्याही विहित कालावधीसाठी करण्यास वेळ वाढवून देऊ शकते किंवा सूट देऊ शकते.

## स्पष्टीकरणे

(31) ह्या निर्देशांमधील तरतुदी परिणामकारक करण्यास, भारतीय रिझर्व्ह बँक, तिला तसे वाटल्यास ह्यामध्ये दिलेल्या कोणत्याही बाबीसंबंधाने आवश्यक ती स्पष्टीकरणे देऊ शकते आणि ह्या निर्देशांमधील कोणत्याही तरतुदींचे भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले अर्थबोधन/स्पष्टीकरण हे अंतिम व सर्व संबंधित पक्षांसाठी बंधनकारक असेल.

## रद्द करणे व जतन करणे

(32) (1) ह्या निर्देशांमुळे, अबँकीय वित्तीय कंपन्या (ठेवी न स्वीकारणा-या व न धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व्ह बँक) निर्देश, 2007 रद्दबातल केले जातील/रद्दबातल झाले आहेत.

(2) असे रद्दीकरण केले असले तरीही पोट विभाग (1) खाली ह्या निर्देशाखाली देण्यात आलेले कोणतेही परिपत्रक, सूचना, आदेश हे, अबँकीय वित्तीय कंपन्यांना, असे रद्दीकरण केले जाण्यापूर्वी लागु असल्याप्रमाणेच लागु असणे सुरुच राहील.

(सी. डी. श्रीनिवासन)
मुख्य महाव्यवस्थापक

**जोडपत्र 1**

## ठेवी न स्वीकारणा-या अबँकीय वित्तीय कंपनीच्या ताळेबंदाचे शेड्युल

(रुपये लाख मध्ये)

| | **तपशील** | | |
|---|---|---|---|
| | **दायित्व बाजू** | | |
| (1) | अबँकीय वित्तीय कंपनीने मिळविलेली कर्जे व अग्रिम राशी - त्यावरील उपवर्जित झालेल्या परंतु **प्रदान** न केलेल्या व्याजासह :-<br>(अ) डिबेंचर्स : प्रतिभूतित : अप्रतिभूतित<br>(सार्वजनिक ठेवी* च्या व्याख्येत बसणारे सोडून अन्य)<br><br>(ब) डिफर्ड कर्जे<br>(क) मुदत कर्जे<br>(ड) आंतर कॉर्पोरेट कर्जे व कर्जे घेणे.<br>(ई) कमर्शियल पेपर<br>(फ) इतर कर्जे (स्वरुप द्यावे)<br><br>*कृपया खालील सूचना 1 पहा. | आऊटस्टँडिंग रक्कम | थकित रक्कम |

| | **अॅसेट्सची बाजू** | |
|---|---|---|
| (2) | येणे असलेल्या बिलांसह (खालील (4) मध्ये समाविष्ट असलेली सोडून अन्य), कर्जांचे ब्रेक अप/तपशील<br>(अ) प्रतिभूतित<br>(ब) अप्रतिभूतित | आऊटस्टँडिंग रक्कम |
| (3) | लीज केलेले अॅसेट्स, व स्टॉक ऑन हायर आणि एएफसी कार्यकृतींमध्ये धरले जाणारे इतर अॅसेट्स ह्यांचा ब्रेक-अप<br>(1) संड्री डेटर्स खालील लीज रेंटल्ससह लीज अॅसेट्स :<br>(अ) वित्तीय लीज<br>(ब) ऑपरेटिंग लीज<br><br>(2) संड्री डेटर्स खालील हायर चार्जेस सह स्टॉक ऑन हायर<br>(अ) भाड्याने दिलेले अॅसेट्स (अॅसेट्स ऑन हायर)<br>(ब) पुनर् ताबा मिळविलेले अॅसेट्स | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (3) एएफसी कार्यकृतींमध्ये धरली जाणारी इतर कर्जे :<br>(अ) ॲसेट्सचा पुनर् ताबा मिळविला असलेली कर्जे<br>(ब) वरील (अ) सोडून अन्य कर्जे | | | |
| (4) | <u>**गुंतवणुकींचे ब्रेक-अप :**</u><br>विद्यमान गुंतवणुकी :<br>**(1) कोटेड**<br>(1) शेअर्स :<br>(अ) इक्विटी<br>(ब) प्रिफरन्स<br>(2) डिबेंचर्स व बाँड्स<br>(3) म्युच्युअल फंडांचे युनिट्स<br>(4) सरकारी सिक्युरिटीज<br>(5) इतर (कृपया तपशील द्यावा)<br><br>**(2) अनकोटेड** :<br>(1) शेअर्स<br>(अ) इक्विटी<br>(ब) प्रिफरन्स<br>(2) डिबेंचर्स व बाँड्स<br>(3) म्युच्युअल फंडांचे युनिट्स<br>(4) सरकारी सिक्युरिटीज<br>(5) इतर (कृपया तपशील द्यावा) | | | |
| (5) | **वरील (2) व (3) मध्ये वित्तसहाय्य केलेल्या ॲसेट्सचे कर्जदार-गट निहाय वर्गीकरण**<br>कृपया खालील सूचना क्र.2 पहावी. | | | |
| | वर्ग | तरतुदींच्या नेट रक्कम | | |
| | | प्रतिभूतित | अप्रतिभूतित | एकूण |
| | (1) संबंधित पक्ष ।। | | | |
| | (अ) सहाय्यक संस्था | | | |
| | (ब) त्याच गटातील कंपन्या | | | |
| | (क) इतर संबंधित पक्ष | | | |
| | (2) संबंधित पक्ष सोडून इतर | | | |
| | एकूण बेरीज | | | |
| (6) | शेअर्स आणि सिक्युरिटीजमधील (कोटेड व अनकोटेड दोन्हीही) सर्व गुंतवणुकींचे (चालु व दीर्घकालीन) निवेशक-गट निहाय वर्गीकरण :<br>कृपया खालील सूचना 3 पहा. | | | |
| | वर्ग | मार्केट मूल्य/फेअर मूल्याचा किंवा एएनव्हीचा ब्रेक | पुस्तकी मूल्य (तरतुदींच्या नेट) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अप | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | (1) संबंधित पक्ष ** | | |
| | (अ) सहाय्यक संस्था | | |
| | (ब) त्याच गटातील कंपन्या | | |
| | (क) इतर संबंधित पक्ष | | |
| | (2) संबंधित पक्ष सोडून इतर | | |
| | एकूण बेरीज | | |

** आयसीएआयच्या लेखा मानकानुसार (कृपया सूचना 3 पहा)

(7) इतर माहिती

| तपशील | | रक्कम |
|---|---|---|
| (1) | ढोबळ अकार्यकारी ॲसेट्स | |
| | (अ) संबंधित पक्ष | |
| | (ब) संबंधित पक्ष सोडून इतर | |
| (2) | नक्त कार्यकारी ॲसेट्स | |
| | (अ) संबंधित पक्ष | |
| | (ब) संबंधित पक्ष सोडून इतर | |
| (3) | कर्जाच्या वसुलीसाठी मिळविलेले ॲसेट्स | |

सूचना :

(1) अबँकीय वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व्ह बँक) निर्देश, 1998 च्या परिच्छेद 2(1)(12) मध्ये व्याख्या केल्यानुसार.

(2) नॉन - सिमेट्रिकली इंपॉर्टंट अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा न धारण करणा-या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व्ह बँक) निर्देश 2015 किंवा सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणा-या किंवा न धारण करणा-या) कंपन्या (रिझर्व्ह बँक) निर्देश, 2015 ह्यातील लागु असेल. ह्यामध्ये विहित केलेले तरतुदीकरणाचे नॉर्म्स लागु असतील.

(3) गुंतवणुकी व इतर ॲसेट्स आणि कर्ज वसुलीबाबत मिळविलेले ॲसेट्स ह्यांच्या मूल्यमापनासह, आयसीएआयने दिलेली सर्व लेखा मानके व मार्गदर्शक सूचना. तथापि, कोटेड गुंतवणुकीबाबतचे मार्केट मूल्य व अनकोटेड गुंतवणुकीबाबतचे ब्रेक अप/फेअर मूल्य/एनएव्ही ह्यांचे वरील (4) मध्ये दीर्घकालीन किंवा विद्यमान असे कोणतेही वर्गीकरण केले असले तरी प्रकटीकरण केले जावे.

**जोडपत्र 2**

## खाजगी क्षेत्रात नवीन बँकांना परवाना देण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे.

### व्याख्या

**(1) प्रायोजक**

प्रायोजक म्हणजे अशी व्यक्ती की जी तिच्या नातेवाईकांसह (कंपनीज अधिनियम 1956 च्या कलम 6 मध्ये व्याख्या केल्यानुसार) व मताधिकार (व्होटिंग) इक्विटी शेअर्सची मालकी असल्याने, एनओएफएचसीचे परिणामकारक नियंत्रण करते/करु शकते. आणि त्यात, लागु असेल तेथे प्रायोजक गटाचा भाग असलेल्या सर्व संस्था समाविष्ट आहेत.

**(2) प्रायोजक गट**

'प्रायोजक गटात' पुढील समाविष्ट आहेत :-

(1) प्रायोजक

(2) कंपनीज अधिनियम 1956 च्या कलम 6 मध्ये व्याख्या केलेले प्रायोजकाचे नातेवाईक.

(3) प्रायोजक हा एक कॉर्पोरेट बॉडी असल्यास :-

(अ) अशा बॉडी कॉर्पोरेटची एखादी सहाय्यक किंवा होल्डिंग कंपनी.

(ब) कोणतीही बॉडी कॉर्पोरेट की जिच्यामध्ये प्रायोजकाने इक्विटी शेअर भांडवलाचे 10% किंवा अधिक धारण केले आहेत किंवा जिने प्रायोजकाच्या इक्विटी शेअर भांडवलाचे 10% किंवा अधिक धारण केले आहेत.

(क) अशी कोणतीही बॉडी कॉर्पोरेट की जिच्यामध्ये, त्या बॉडी कॉर्पोरेटमधील इक्विटी शेअर भांडवलाचा 20% किंवा अधिक हिस्सा धारण करणारा व्यक्तींचा किंवा कंपन्यांचा किंवा त्यांचे संयोगाने बनलेला गट, त्या प्रायोजकाच्या इक्विटी शेअर भांडवलाच्या 25% किंवा जास्त भाग धारण करीत आहे.

(ड) प्रायोजकाबरोबर केलेला संयुक्त उद्‌योग (एएस 23 अन्वये व्याख्या करण्यात आलेला)

(ई) प्रायोजकाचा संगत (असोशिएट)/संलग्न (एएस 27) अन्वये व्याख्या केलेला)

(फ) प्रायोजकाशी संबंधित/नात्याचा पक्ष (एएस 18 मध्ये व्याख्या केलेला) आणि

(4) प्रायोजक ही एक व्यक्ती असल्यास :-

(अ) अशी एक कॉर्पोरेट बॉडी की जिच्या मध्ये, तो प्रायोजक किंवा त्या प्रायोजकाचा एक नातेवाईक किंवा जिच्यामध्ये तो प्रायोजक किंवा त्याचे एक किंवा अधिक जवळचे नातेवाईक सभासद आहेत अशी एक कंपनी किंवा अविभक्त हिंदु कुटुंब, इक्विटी शेअर भांडवलाचे 10% किंवा अधिक धारण करत आहेत.

(ब) कोणतीही कॉर्पोरेट बॉडी की जिच्यामध्ये, वरील (अ) मधील बॉडी कॉर्पोरेट, इक्विटी शेअर भांडवलाच्या 10% किंवा अधिक धारण करत आहे.

(क) कोणतेही हिंदु अविभक्त कुटुंब, की ज्यात प्रायोजक व त्याचे जवळचे नातेवाईक ह्यांचे एकूण शेअर धारण, एकूण शेअरांच्या 10% एवढे किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

(5) अशा सर्व व्यक्ती की ज्यांचे शेअर धारण, 'प्रायोजक गटाचे शेअर धारण' ह्या शीर्षकाखालील प्रॉस्पेक्टस 21 मध्ये प्रकट करण्यासाठी एकत्रित करण्यात आले आहे.

(6) जेथे प्रायोजक ही एक बॉडी कॉर्पोरेट आहे तेथे अ, ब, क, ड, ई, फ मधील संस्थांबरोबर, आणि जेथे प्रायोजक ही एक व्यक्ती आहे तेथे अ, ब, क मधील संस्थांबरोबर सामान्य/एकच नाममुद्रा (ब्रँड नेम) शेअर करणारी संस्था.

मात्र, एखादी वित्तीय संस्था, शेड्युल बँक, विदेशी संस्थात्मक निवेशक किंवा म्युच्युअल फंड ह्या संस्था, त्यांनी केवळ प्रायोजकाच्या इक्विटी शेअर भांडवलाच्या 10% किंवा अधिक भाग धारण केला आहे म्हणून प्रायोजक गट होऊ शकत नाहीत.

**जोडपत्र 3**

**एनबीएफसींकडून अग्रिम राशींची पुनर्रचना केली जाण्यावरील नॉर्म्स**

(1) सीडीआर यंत्रणेखाली असलेल्यांसह सर्व पुनर्रचनांना हे प्रुडेंशियल नॉर्म्स लागु आहेत. सीडीआर यंत्रणा व एसएमई कर्ज पुनर्रचना यंत्रणांसाठीचा संस्थात्मक/संघटनात्मक साचा, डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.1/21.04.048/2013-14 दि. जुलै 1, 2013 च्या जोडपत्र 4 अनुसार बँकांना लागु असतील ते जोडपत्र 3 मध्ये देण्यात आले आहेत.

**(2) कळीच्या/मुख्य संकल्पना**

ह्या नॉर्म्समध्ये वापरण्यात आलेल्या मुख्य संकल्पनांच्या व्याख्या जोडपत्र 2 मध्ये दिल्या आहेत.

**(3) अंमलबजावणीखालील प्रकल्प**

(3.1) एनबीएफसींनी वित्तसहाय्य केलेल्या सर्व प्रकल्पांसाठी, 'पूर्ण केल्याची तारीख' आणि 'कमर्शियल कार्यकृती सुरु करण्याची तारीख' (डीसीसीओ) ह्या तारखा, तो प्रकल्प वित्तीय दृष्ट्या बंद करतेवेळी स्पष्टपणे दिल्या जाव्यात व त्यांची नोंद ठेवली जावी. कर्ज मंजुर करण्यादरम्यान ह्या तारखा अॅप्रेजल नोट मध्ये लिहून ठेवण्यात याव्यात.

**(3.2) प्रकल्प कर्जे**

असेही प्रसंग येतात की जेथे कायदेशीर कारणे व सरकारी मंजु-यांमधील विलंब ह्यासारख्या कारणांनी तो प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होतो. प्रायोजकांच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या ह्या घटकांमुळे प्रकल्प पूर्ण होण्यात विलंब होऊ शकतो व त्यामुळे एनबीएफसींनी दिलेल्या कर्जांची पुनर्रचना करावी लागते. त्यानुसार, कमर्शियल कार्यकृती सुरु होण्यापूर्वी, त्या प्रकल्प कर्जांना पुढील अॅसेट वर्गीकरण नॉर्म्स लागु होतील.

ह्यासाठी, सर्व प्रकल्प कर्जांची विभागणी पुढील दोन वर्गात करण्यात आली आहे.

(अ) इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रासाठीची प्रकल्प कर्जे

(ब) बिगर इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रासाठीची प्रकल्प कर्जे.

(ब) बिगर इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रासाठीची प्रकल्प कर्जे.

ह्या निर्देशांबाबत 'प्रकल्प कर्ज'चा अर्थ म्हणजे, एखादा आर्थिक उद्योग/धाडस स्थापन करण्यासाठी देण्यात आलेले कोणतेही मुदत कर्ज. ह्याशिवाय, इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्राची व्याख्या, एनबीएफसींसाठीच्या विद्यमान प्रुडेंशियल नॉर्म्स निर्देशात देण्यात आली आहे.

**(3.3) इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रासाठी प्रकल्प कर्जे**

(1) एखाद्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पासाठीचे कर्ज, त्याची पुनर्रचना न केली गेल्यास व खालील परिच्छेद (3) ते (5) अनुसार 'प्रमाणभूत अॅसेट' म्हणून वर्गीकरण करण्यास पात्र न ठरल्यास, त्या कर्जाच्या वसुलीच्या/परतफेडीच्या रेकॉर्डनुसार, कमर्शियल कार्यकृती सुरु होण्याआधीच एनपीए म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते.

(2) एखाद्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पासाठीचे कर्ज, त्याची पुनर्रचना केल्याशिवाय व खालील परिच्छेद (3) ते (5) मधील अटींनुसार 'प्रमाणभूत ॲसेट' म्हणून वर्गीकृत केले गेल्याशिवाय, वसुलीच्या रेकॉर्डनुसार ते नियमित असले तरीही, मूळ डीसीसीओ पासून दोन वर्षांच्या आत कमर्शियल कार्यकृती सुरु न केल्या गेल्यास, एनपीए म्हणून वर्गीकृत केले जाईल.

(3) 'प्रमाणभूत ॲसेट' म्हणून वर्गीकृत केलेल्या कोणत्याही प्रकल्प कर्जाची मूळ डीसीसीओच्या तारखेपासून दोन वर्षेपर्यंतच्या काळात केव्हाही पुनर्रचना केली गेल्यास, नवीन डीसीसीओ पुढील मर्यादांमध्ये निश्चित केल्या गेल्यास आणि पुनर्रचनेच्या अटींनुसार ते खाते सुरु राहिल्यास, ते कर्ज प्रमाणभूत ॲसेट म्हणून ठेवता येऊ शकते.

**(अ) कोर्ट प्रकरणे असलेले इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प**

आणखी 2 वर्षांपर्यंत (परिच्छेद 3.3 मध्ये विहित केल्यानुसार विद्यमान 2 वर्षांच्या पलिकडे, म्हणजे एकूण मुदतवाढ 4 वर्षे) - परंतु ह्यासाठी उत्पादन सुरु करण्याच्या तारखेस मुदतवाढ देण्याचे कारण हे मध्यस्थीची प्रक्रिया किंवा कोर्ट केस असल्यास.

**(ब) प्रायोजकांच्या नियंत्रणाबाहेरील इतर कारणामुळे इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांना विलंब झाल्यास**

अन्य कोर्ट केसेस मध्ये आणखी एक वर्षापर्यंत (परिच्छेद 3.3 (2) मध्ये विहित केल्यानुसार विद्यमान विस्तारित कालावधी 2 वर्षांच्या पलिकडे, म्हणजे एकूण मुदतवाढ 3 वर्षे).

(4) येथे पुनः सांगण्यात येते की, परिच्छेद 3.3 (2) मधील विभागणी ही, खात्यांच्या पुनर्रचनेबाबतच्या तरतुदींच्या पालनाच्या अटीवर व त्यासाठी आवश्यक आहे की, पुनर्रचनेसाठीचा अर्ज मूळ डीसीसीओपासून दोन वर्षांच्या समाप्तीच्या कालावधीपूर्वी मिळालेला असावा आणि ते खाते, वसुलीच्या रेकॉर्डनुसार अजूनही प्रमाणभूत असावे. लागु असलेल्या इतर अटी पुढीलप्रमाणे असतील :-

(अ) व्याज प्रदान करण्यासाठी मोराटोरियम असलेल्या प्रकरणांमध्ये, अशा पुनर्रचित खात्यांमधील उच्चतर जोखीम विचारात घेऊन एनबीएफसींनी, मूळ डीसीसीओपासून दोन वर्षांपलिकडे, उपवर्जित धर्तीवर उत्पन्न हिशेबात घेऊ (बुक) नये.

(ब) फेअर मूल्यामधील -हासासाठी तरतुदीच्या व्यतिरिक्त, एनबीएफसींनी, अशा खात्यांवर, स्टँडर्ड ॲसेट्स म्हणून वर्गीकृत केली असेपर्यंत पुढील तरतुदी ठेवाव्यात :-

(5) ह्या निर्देशांसाठी, सुधारित डीसीसीओ, मूळ डीसीसीओपासून दोन वर्षांच्या कालावधीतयेत असल्यास, त्या केवळ डीसीसीओचा विस्तार/मुदतवाढ ही पुनर्रचना समजली जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये डीसीसीओच्या विस्ताराएव्हढा किंवा त्यापेक्षा कमी कालावधी मधील (सुधारित परतफेड शेड्युल मधील सुरु होण्याची तारीख व संपण्याची तारीख ह्यासह) परिणामी होणारा बदल हा देखील, त्या कर्जाच्या इतर सर्व अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल न झाल्यास, पुनर्रचना समजली जाणार नाही. अशा प्रकल्प कर्जांना सर्व बाबतीत प्रमाणभूत ॲसेट्स समजले जाणार असल्याने त्यांना 0.25% ची स्टँडर्ड ॲसेट तरतुद लागु असेल.

| तपशील | तरतुदीकरणाची आवश्यकता |
| --- | --- |
| वित्तीय बंद करतेवेळी, विहित केलेल्या मूळ डीसीसीओपासून, सुधारित डीसीसीओ दोन वर्षांच्या आत असल्यास | *0.25 % |
| ती डीसीसीओ, असेल त्यानुसार, मूळ डीसीसीओपासून दोन वर्षे ते चार वर्षे किंवा तीन वर्षे ह्या पलिकडे, विस्तारित केला गेल्यास, अशा विलंबासाठीच्या कारणांवर अवलंबून. | जानेवारी 24, 2014 पासून पुनर्रचित केलेली प्रकल्प कर्जे |
| | * 5.00% - अशा पुनर् रचनेपासून ते सुधारित डीसीसीओ पर्यंत किंवा पुनर्रचनेच्या तारखेपासून 2 वर्षांपर्यंत - ह्यातील उशीरा असेल तेथपर्यंत. |
| | * जानेवारी 23, 2014 रोजी असल्यानुसार, पुनर्रचित म्हणून वर्गीकृत केलेल्या प्रकल्प कर्जांचा स्टॉक. |
| | - 2.75% - मार्च 31, 2014 पासून |
| | - 3.50% - मार्च 31, 2015 पासून (2014-15 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | - 4.25% - मार्च 31, 2016 पासून (2015-16 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | - 5% - मार्च 31, 2017 पासून (2016-17 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | * वरील तरतुदी, पुनर्रचनेच्या तारखेपासून सुधारित डीसीसीओ किंवा पुनर्रचनेच्या तारखेपासून 2 वर्षे पर्यंत ह्यापैकी जे उशीरा असेल तेथपर्यंत लागु असतील. |

(5) (अ) डीसीसीओच्या अनेक आवृत्त्या व त्यामुळे समान किंवा लघु कालासाठी झालेला परतफेडीच्या शेड्युल मधील बदल (सुधारित परतफेड वेळापत्रकाची सुरुवात तारीख व समाप्ती तारीख ह्यासह) ह्यांना, पुनर्रचनेची एकच घटना/प्रसंग समजले जाईल. मात्र त्यासाठी, सुधारित डीसीसीओ वर दिलेल्या संबंधित काल मर्यादांमध्ये निश्चित केली गेली असावी व त्या कर्जाच्या इतर सर्व अटी व शर्तींमध्ये बदल झाला नसावा.

त्यांना तसे योग्य वाटल्यास, एनबीएफसी, वरील (3)(अ) ते (ब) मध्ये दिलेल्या संबंधित कालमर्यादांपलिकडेही डीसीसीओ विस्तारित करु शकतात. तथापि अशा बाबतीत, एनबीएफसींना, अशा कर्ज खात्यांचा ‘स्टँडर्ड’ ॲसेटवर्गीकरण दर्जा ठेवता येणे शक्य होणार नाही.

(5)(ब) जेथे एनबीएफसींनी, फंड कॉस्ट ओव्हर रन्सना, सुरुवातीच्या वित्तीय बंदचे वेळी, खास करुन ‘स्टँड बाय सुविधा’ मंजुर केली आहे तेथे, संमत केलेल्या अटी व शर्तींनुसार त्या कॉस्ट ओव्हर रन्सना निधी पुरवठा करु शकतात.

जेथे सुरुवातीच्या वित्तीय बंद मध्ये अशा कॉस्ट ओव्हररन्ससाठीचे निधी सहाय्य दिसून येत नाही तेथे, वरील 3 (अ) ते (ब) मध्ये दिलेल्या कालमर्यादांमधील डीसीसीओच्या विस्तारामुळे निर्माण होऊ शकणा-या कॉस्ट ओव्हररन्सना निधी सहाय्य करण्याची परवानगी एनबीएफसींना, ‘पुनर्रचित ॲसेट’ म्हणून कर्जांना न समजताही, पुढील अटींवर देण्यात आली आहे :-

(1) एखादा प्रकल्प पूर्ण होण्यातील विलंबामुळे निर्माण झालेल्या ‘इंटरेस्ट ड्युरिंग कन्स्ट्रक्शन’ ला एनबीएफसी अर्थसहाय्य करु शकतात.

(2) मूळ प्रकल्प खर्चाच्या कमाल 10% इतर कॉस्ट ओव्हररन्स (इंटरेस्ट ड्युरिंग कन्स्ट्रक्शन सोडून), ही मर्यादा, इतर चलनांविरुध्द भारतीय रुपयाच्या मूल्यात कमी-जास्त झाल्यामुळे होण्यासह, कमर्शियल ऑपरेशन्स सुरु करण्याच्या तारखेला मुदतवाढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या, इतर सर्व कॉस्ट ओव्हररन्सना वित्त सहाय्य करण्याबाबत लागु आहे.

(3) सुरुवातीच्या वित्तीय बंदच्या वेळी संमत झालेले कर्ज-इक्विटी गोणोत्तर, कॉस्ट ओव्हररन्सना अर्थ सहाय्य केल्यानंतरही न बदलले पाहिजे किंवा त्यात धनकोंच्या हितसंबंधात सुधारणा झाली पाहिजे आणि सुधारित डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो धनकोंना स्वीकार्य असला पाहिजे.

(4) कॉस्ट ओव्हररन्ससाठीच्या निधी वाटपाची सुरुवात ही प्रायोजक/प्रवर्तक ह्यांनी, त्या कॉस्ट ओव्हररन्ससाठीच्या अर्थसहाय्याचा त्यांचा वाटा आणल्यानंतरच केली जावी.

(5) कर्जाच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल झाला नसावा किंवा त्या धनकोच्या हितसंबंधात असाव्यात.

(6) आवश्यक त्या अटींचे पालन करण्यास कन्सेशन प्राधिकरण असमर्थ ठरल्यामुळे, ठरविलेल्या तारखेत (कन्सेशन करारनाम्यात व्याख्या केल्यानुसार) बदल झाला आहे अशा, अंमलबजावणीखालील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांच्या बाबतीत, कमर्शियल कार्यकृतींची सुरुवात करण्याच्या तारखेतील (डीसीसीओ) बदल हा, पुढील अटींवर 'पुनर्रचना' समजला जाऊ नये. :-

(अ) तो प्रकल्प, एका सार्वजनिक प्राधिकरणाने, सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल खालील एक इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प आहे.

(ब) कर्जाचे वाटप अद्याप सुरु झालेले नाही.

(क) कमर्शियल ऑपरेशन्स सुरु होण्याची सुधारित तारीख, कर्जदार व धनको ह्यादरम्यान केलेल्या पूरक करारनाम्याद्वारे नोंदविली आहे. आणि

(ड) त्या प्रकल्पाच्या सफलताक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले असून, पूरक करार करतेवेळी, सुयोग्य प्राधिकरणाकडून मंजुरी घेण्यात आली आहे.

**(3.4) बिगर इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पासाठी (कमर्शियल रियल इस्टेट एक्सपोझर्स सोडून) अन्य प्रकल्प कर्जे**

(1) बिगर इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पासाठीचे कर्ज, ते पुनर्रचित न केले गेल्यास व खालील परिच्छेद (3) ते (5) मधील अटींनुसार, 'स्टँडर्ड ॲसेट' म्हणून वर्गीकरण करण्यास पात्र न झाल्यास वसुलीच्या रेकॉर्डनुसार, कमर्शियल कार्यकृती सुरु होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, एनपीए म्हणून वर्गीकृत केले जाईल.

(2) बिगर इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पासाठीचे कर्ज, वसुलीच्या रेकॉर्डनुसार ते नियमित असले तरीही, ते पुनर्रचित केले न गेल्यास आणि खालील परिच्छेद (3) ते (5) मधील अटींनुसार 'स्टँडर्ड ॲसेट' म्हणून वर्गीकृत न केले गेल्यास, मूळ डीसीसीओपासून एक वर्षाच्या आत, कमर्शियल कार्यकृती सुरु न झाल्यास, एनपीए म्हणून वर्गीकृत केले जाईल.

(3) बिगर इन्फ्रास्टक्चर प्रकल्पांच्या बाबतीत, वित्तीय बंदच्या वेळी ठरविल्याप्रमाणे, कमर्शियल कार्यकृतीमधील विलंब हा पूर्ण केल्याच्या तारखेपासून एक वर्षापेक्षा अधिक असल्यास, एनबीएफसी नवीन डीसीसीओ विहित करु शकतात आणि खात्यांची पुनर्रचना करुन 'स्टँडर्ड' वर्गीकरण तसेच ठेवू शकतात. मात्र, नवीन डीसीसीओ, ही मूळ

डीसीसीओपासून दोन वर्षांपेक्षा अधिक असू नये. ह्याचा अर्थ असा होईल की, वसुलीच्या रेकॉर्डनुसार ते खाते अजूनही 'स्टँडर्ड' असल्यास, पुनर्रचनेसाठीचा अर्ज, मूळ डीसीसीओपासून एक वर्ष समाप्त होण्याच्या आत मिळाला आहे.

लागु असणा-या इतर अटी अशा असतील -

(अ) अशा पुनर्रचित खात्यांमधील उच्चतर जोखीम विचारात घेता, व्याज प्रदान करण्यात मोराटोरियम असलेल्या प्रकरणांमध्ये, एनबीएफसींनी, मूळ डीसीसीओपासून एक वर्षानंतरचे उत्पन्न उपवर्जित धर्तीवर बुक करु नये.

(ब) एनबीएफसींनी, डीसीसीओच्या विस्तारामुळे फेअर मूल्यात झालेल्या -हासासाठी ठेवलेल्या तरतुदी व्यतिरिक्त, अशा खात्यांवर, ती खाती स्टँडर्ड ॲसेट्स म्हणून वर्गीकृत झाली असेपर्यंत पुढील तरतुदी ठेवाव्यात.

| तपशील | तरतुदीकरणाची आवश्यकता |
|---|---|
| वित्तीय बंद करतेवेळी, विहित केलेल्या मूळ डीसीसीओपासून, सुधारित डीसीसीओ एक वर्षाच्या आत असल्यास | *0.25 % |
| वित्तीय बंद करतेवेळी विहित केलेल्या डीसीसीओपासून, ती डीसीसीओ एक वर्ष ते दोन वर्षे पर्यंत विस्तारित केल्यास. | जानेवारी 24, 2014 पासून पुनर्रचित केलेली प्रकल्प कर्जे |
| | * 5.00% - अशा पुनर् रचनेपासून 2 वर्षांसाठी. |
| | * जानेवारी 23, 2014 रोजी असल्यानुसार, पुनर्रचित म्हणून वर्गीकृत केलेल्या प्रकल्प कर्जांचा स्टॉक. |
| | - 2.75% - मार्च 31, 2014 पासून |
| | - 3.50% - मार्च 31, 2015 पासून (2014-15 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | - 4.25% - मार्च 31, 2016 पासून (2015-16 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | - 5% - मार्च 31, 2017 पासून (2016-17 च्या चार तिमाहींवर विस्तारित) |
| | * वरील तरतुदी, पुनर्रचनेच्या तारखेपासून किंवा पुनर्रचनेच्या तारखेपासून 2 वर्षे पर्यंत लागु असतील. |

(4) ह्या निर्देशांसाठी, सुधारित डीसीसीओ, मूळ डीसीसीओपासून एक वर्षाच्या कालावधीत असल्यास, त्या केवळ डीसीसीओचा विस्तार/मुदतवाढ ही पुनर्रचना समजली जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये डीसीसीओच्या विस्ताराएव्हढा किंवा त्यापेक्षा कमी कालावधी मधील (सुधारित परतफेड शेड्युल मधील सुरु होण्याची तारीख व संपण्याची तारीख ह्यासह) परिणामी होणारा बदल हा देखील, त्या कर्जाच्या इतर सर्व अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल न झाल्यास, पुनर्रचना समजली जाणार नाही. अशा प्रकल्प कर्जांना सर्व बाबतीत प्रमाणभूत ॲसेट्स समजले जाणार असल्याने त्यांना 0.25% ची स्टँडर्ड ॲसेट तरतुद लागु असेल.

(4)(अ) डीसीसीओच्या अनेक आवृत्त्या व त्यामुळे समान किंवा लघु कालासाठी झालेला परतफेडीच्या शेड्युल मधील बदल (सुधारित परतफेड वेळापत्रकाची सुरुवात तारीख व समाप्ती तारीख ह्यासह) ह्यांना, पुनर्रचनेची एकच घटना/प्रसंग समजले जाईल. मात्र त्यासाठी, सुधारित डीसीसीओ वर दिलेल्या संबंधित काल मर्यादांमध्ये निश्चित केली गेली असावी व त्या कर्जाच्या इतर सर्व अटी व शर्तींमध्ये बदल झाला नसावा.

त्यांना तसे योग्य वाटल्यास, एनबीएफसी, वरील (3)(अ) ते (ब) मध्ये दिलेल्या संबंधित कालमर्यादांपलिकडेही डीसीसीओ विस्तारित करु शकतात. तथापि अशा बाबतीत, एनबीएफसींना, अशा कर्ज खात्यांचा 'स्टँडर्ड' ॲसेट वर्गीकरण दर्जा ठेवता येणे शक्य होणार नाही.

(4)(ब) जेथे एनबीएफसींनी, फंड कॉस्ट ओव्हर रन्सना, सुरुवातीच्या वित्तीय बंदचे वेळी, खास करुन 'स्टँड बाय सुविधा' मंजुर केली आहे तेथे, संमत केलेल्या अटी व शर्तीनुसार त्या कॉस्ट ओव्हर रन्सना निधी पुरवठा करु शकतात.

जेथे सुरुवातीच्या वित्तीय बंद मध्ये अशा कॉस्ट ओव्हररन्ससाठीचे निधी सहाय्य दिसून येत नाही तेथे, वरील 3 (अ) ते (ब) मध्ये दिलेल्या कालमर्यादांमधील डीसीसीओच्या विस्तारामुळे निर्माण होऊ शकणा-या कॉस्ट ओव्हररन्सना निधी सहाय्य करण्याची परवानगी एनबीएफसींना, 'पुनर्रचित ॲसेट' म्हणून कर्जांना न समजताही, पुढील अटींवर देण्यात आली आहे :-

(1) एखादा प्रकल्प पूर्ण होण्यातील विलंबामुळे निर्माण झालेल्या 'इंटरेस्ट ड्युरिंग कन्स्ट्रक्शन' ला एनबीएफसी अर्थसहाय्य करु शकतात.

(2) मूळ प्रकल्प खर्चाच्या कमाल 10% इतर कॉस्ट ओव्हररन्स (इंटरेस्ट ड्युरिंग कन्स्ट्रक्शन सोडून), ही मर्यादा, इतर चलनांविरुध्द भारतीय रुपयाच्या मूल्यात कमी-जास्त झाल्यामुळे होण्यासह, कमर्शियल ऑपरेशन्स सुरु करण्याच्या तारखेला मुदतवाढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या, इतर सर्व कॉस्ट ओव्हररन्सना वित्त सहाय्य करण्याबाबत लागु आहे.

(3) सुरुवातीच्या वित्तीय बंदच्या वेळी संमत झालेले कर्ज-इक्विटी गोणोत्तर, कॉस्ट ओव्हररन्सना अर्थ सहाय्य केल्यानंतरही न बदलले पाहिजे किंवा त्यात धनकोंच्या हितसंबंधात सुधारणा झाली पाहिजे आणि सुधारित डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो धनकोंना स्वीकार्य असला पाहिजे.

(4) कॉस्ट ओव्हररन्ससाठीच्या निधी वाटपाची सुरुवात ही प्रायोजक/प्रवर्तक ह्यांनी, त्या कॉस्ट ओव्हररन्ससाठीच्या अर्थसहाय्याचा त्यांचा वाटा आणल्यानंतरच केली जावी.

(5) कर्जाच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल झाला नसावा किंवा त्या धनकोच्या हितसंबंधात असाव्यात.

**(3.5) इतर प्रश्न**

(1) प्रकल्पाची व्याप्ती व आकारात वाढ झाल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात झालेल्या वाढीमुळे एखाद्या प्रकल्पाच्या परतफेड वेळापत्रकात झालेला बदल, पुढील बाबतीत पुनर्रचना समजला जाणार नाही.

(अ) त्या प्रकल्पाची व्याप्ती व आकार ह्यातील वाढ ही, विद्यमान प्रकल्पाच्या वाणिज्य कार्यकृती सुरु होण्यापूर्वी झाली असल्यास

(ब) मूळ प्रकल्पाबाबत, कॉस्ट ओव्हर-रन सोडून झालेली खर्चातील वाढ, मूळ खर्चाच्या 25% किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास

(क) व्याप्ती वाढविण्यास मंजुरी देण्यापूर्वी व नवीन डीसीसीओ निश्चित करण्यापूर्वी एनबीएफसीने त्या प्रकल्पाच्या सफलताक्षमतेचे पुनर्-मूल्यांकन केले असल्यास

(ड) पुनर्-रेटिंग केल्यावर (आधीच रेटिंग केले असल्यास), नवे रेटिंग हे पूर्वीच्या रेटिंगपेक्षा एका खुणेपेक्षा खाली नसल्यास.

(2) वाणिज्य रियल इस्टेटसाठी प्रकल्प कर्जे

सीआरई प्रकल्पांसाठी, सुधारित डीसीसीओ ही मूळ डीसीसीओपासून एक वर्षाच्या आत असल्यास, व डीसीसीओच्या विस्तार कालावधीच्या तुलनेत, परतफेड वेळापत्रकातील बदल व कर्ज सर्व्हिसिंग हे समान किंवा कमी कालांतराने करावयाचे सोडून, इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल झाला नसल्यास केवळ डीसीसीओचा विस्तार केला जाणे ही पुनर्-रचना समजली जाणार नाही. अशी सीआरई प्रकल्प कर्जे, ह्यासाठी सर्व बाबतीत स्टँडर्ड ॲसेट्स समजली जातील व त्यांना, पुनर्रचितस्टँडर्ड ॲसेट्सना लागु असलेले उच्चतर तरतुदीकरण लागु असणार नाही. तथापि, पुनर्-रचना केली गेल्यास, सीआरई प्रकल्पांना ॲसेट वर्गीकरणाचे लाभ उपलब्ध असणार नाहीत.

(3) विनियामक संयम देण्यात आला आहे अशा वरील सर्व प्रकरणांमध्ये, एनबीएफसींच्या संचालक मंडळांनी, त्या प्रकल्पाची सफलताक्षमता व पुनर्-रचना योजना ह्याबाबत स्वतःचे समाधान करुन घ्यावे.

**(3.6) उत्पन्न ओळख**

(1) 'प्रमाणभूत' म्हणून वर्गीकृत केल्या गेलेल्या, अंमलबजावणी खालील प्रकल्पांच्या बाबतीत एनबीएफसींनी उत्पन्न ओळखही उपार्जित (ॲक्रुअल)धर्तीवर ठेवावी.

(2) 'सबस्टँडर्ड ॲसेट' म्हणून वर्गीकृत केलेल्या व अंमलबजावणीखाली असलेल्या प्रकल्पांबाबत, एनबीएफसींनी उत्पन्न ओळख ही उपार्जित धर्तीवर ठेवू नये. अशा खात्यांमधील उत्पन्नाची ओळख एनबीएफसी केवळ रोख रक्कम वसुलीवर ठेवू शकतात.

परिणामी, भूतकाळात चुकीने/चुकीची उत्पन्न ओळख केली असलेल्या एनबीएफसींनी, चालु वर्षात उत्पन्न म्हणून ओळखण्यात आलेले व्याज रिव्हर्स करावे, किंवा मागील वर्षी/वर्षामध्ये ते उत्पन्न म्हणून ओळखले गेले असल्यास त्याच्या सममूल्य रकमेची तरतुद करावी. उत्पन्न म्हणून ओळखण्यात आलेले 'निधीयुक्त व्याज' व इक्विटी, डिबेंचर्स व अन्य कोणत्याही संलेखात रुपांतरण करण्याबाबत एनबीएफसींनी पुढील रीत अनुसरावी.

(अ) निधीयुक्त व्याज कर्ज कराराची पुनर्रचना/पुनर् वेळापत्रक/अटींची तडजोड केलेली असली किंवा केलेली नसली तरी, एनपीएंच्या बाबतीमधील उत्पन्न ओळख फक्त रोख धर्तीवरच प्रत्यक्ष वसुलीनंतरच केली जावी - थकित व्याजाच्या रकमेचे फंडिंग केले गेले असल्यास नाही. तथापि, निधीयुक्त व्याजाची रक्कम उत्पन्न म्हणून ओळखली गेली असल्यास, त्याच वेळी त्यासमान रकमेची तरतुद देखील केली जावी. दुस-या शब्दात, एनपीएंच्या बाबतीत केलेले व्याजाचे फंडिंग हे उत्पन्न म्हणून ओळखले गेल्यास त्यासाठी तरतुद ठेवली जाणे.

(ब) इक्विटी, डिबेंचर्स किंवा अन्य कोणत्याही संलेखात रुपांतरण :- थकित रकमेचे इतर संलेखांमध्ये केलेल्या रुपांतरणात सामान्यतः मुद्दल व व्याज घटक असावेत. येणे असलेल्या व्याजाची रक्कम इक्विटी किंवा अन्य संलेखात रुपांतरित केली गेल्यास व परिणामी उत्पन्न म्हणून ओळखली गेल्यास, अशा उत्पन्न ओळखीचा परिणाम

ऑफ-सेट करण्यासाठी त्या उत्पन्नाच्या रकमेसाठी तरतुद केली जावी. मूल्यांकन-नॉर्म्सनुसार, इक्विटी किंवा इतर संलेखांच्या घसा-यासाठी आवश्यक असलेल्या तरतुदी व्यतिरिक्त अशी तरतुद केली जावी. तथापि, व्याजाचे रुपांतरण, कोटेड असलेल्या इक्विटीमध्ये केले असल्यास, व्याजाची उत्पन्न ओळख, त्या रुपांतरणाच्या तारखेस, त्या सिक्युरिटीच्या मार्केट मूल्याएवढी व इक्विटीमध्ये रुपांतरित केलेल्या व्याज रकमेपेक्षा अधिक नसल्यास केली जाऊ शकते. त्यानंतर मात्र अशी इक्विटी 'चालु/विद्यमान इक्विटी' म्हणून वर्गीकृत केली जावी व तिचे मूल्यांकन कमी किंमतीवर किंवा मार्केट मूल्याने केले जावे.एनपीएंच्या बाबतीत, मुद्दल आणि/किंवा व्याजाचे डिबेंचर्समध्ये रुपांतरण केले गेल्यास, अशा एनपीएंना, त्यांचे रुपांतरण होण्यापूर्वीच्या कर्जांना लागु असलेल्या ॲसेट वर्गीकरणातील एनपीए म्हणून सुरुवातीपासूनच समजले जावे. आणि त्यासाठी नॉर्म्सनुसार तरतुदी केल्या जाव्यात. देणा-याचे (इश्युअर) दायित्व डिफर करु पाहणा-या झीरो कुपन बाँड्सना किंवा इतर संलेखांना हाच नॉर्म लागु असेल. अशा डिबेंचर्सवरील उत्पन्न प्रत्यक्ष वसुली झाल्यावरच ओळखले जावे. डिबेंचर्स किंवा स्थिर परिपक्वता असलेल्या अन्य कोणत्याही संलेखांमध्ये रुपांतरित केलेल्या व प्रत्यक्षात वसुल न झालेल्या व्याजाबाबतचे उत्पन्न हे, अशा संलेखाचे विमोचन आल्यानंतरच ओळखले जावे. वरील अटींवर, कर्जाच्या मुद्दलाचे रुपांतरण केल्याने निर्माण झालेले इक्विटी शेअर्स किंवा इतर संलेखांनाही अशा संलेखांना लागु होणारे नेहमीचे प्रुडेंशियल मूल्यांकन नॉर्म्स लागु होतील.

**(4) पुनर्रचित अग्रिम राशींसाठीची सर्वसाधारण तत्त्वे व प्रुडेंशियल नॉर्म्स**

ह्या परिच्छेदामध्ये दिलेली तत्त्वे व प्रुडेंशियल नॉर्म्स, परिच्छेद 7 मध्ये विहित केलेल्या ॲसेट वर्गीकरणासाठीच्या विशेष विनियामक वर्तणुकीसाठी/लागु करण्यासाठी पात्र असलेल्या कर्जदारांसह सर्व अग्रिम राशींना लागु आहेत.

**(4.1) अग्रिम राशींची पुनर्रचना करण्यासाठीचे पात्रता निकष**

(4.1.1) 'स्टँडर्ड' 'सबस्टँडर्ड' व 'शंकास्पदश' वर्गाखाली वर्गीकृत केलेल्या खात्यांची पुनर्रचना एनबीएफसी करु शकतात.

(4.1.2) एनबीएफसी कर्ज खात्यांचे पुनर्वेळापत्रक/पुनर्रचना/नव्याने तडजोड करणे पूर्व कालापासून/सुरुवातीपासून करु शकत नाहीत. एखादा पुनर्रचनेचा प्रस्ताव विचाराधीन असतानाही, नेहमीचे ॲसेट वर्गीकरणाचे नॉर्म्स लागु असणे सुरुच राहील. केवळ पुनर्रचनेचा प्रस्ताव विचाराधीन आहे म्हणून, एखाद्या ॲसेटची पुनर् वर्गीकरणाची प्रक्रिया थांबू नये. सक्षम प्राधिकरणाने त्या पुनर्रचित पॅकेजला दिलेल्या मंजुरीच्या तारखेस असलेला ॲसेट वर्गीकरण दर्जा/स्थिती हीच, त्या खात्याची पुनर्रचना/पुनर्शेड्युलिंग/नव्याने तडजोडी केल्यानंतरच ॲसेट वर्गीकरण दर्जा ठरविण्यासाठी संबंधित असेल. एखादे पुनर्रचना पॅकेज मंजुर करण्यास अतिशय विलंब झाल्यास व दरम्यानच्या काळात त्या खात्याच्या ॲसेट वर्गीकरण दर्जामध्ये -हास झाल्यास, ती पर्यवेक्षणीय बाब असेल.

(4.1.3) सामान्यतः, कर्जदाराची औपचारिक संमती/अर्ज मिळाल्याशिवाय, व मूळ कर्ज करारनाम्यामध्ये बदल/फरक केल्याखेरीज पुनर्रचना करता येत नाही. तथापि, ग्राहकाने अटी व शर्तींबाबत सहमती दर्शविल्यास, एनबीएफसी, पात्र असलेल्या प्रकरणांमध्ये पुनर्रचनेची प्रक्रिया सुरु करु शकतात.

(4.1.4) वित्तीय सफलताक्षमता सिध्द झाल्याशिवाय व पुनर्रचना पॅकेजच्या अटींनुसार कर्जदाराकडून परतफेडीची वाजवी शक्यता/खात्री असल्याशिवाय एनबीएफसींकडून कोणतेही खाते पुनर्रचनेसाठी विचारात घेतले जाणार नाही.

कर्जदाराच्या कॅश फ्लोजकडे दुर्लक्ष करुन व एनबीएफसींनी अर्थसहाय्य केलेल्या प्रकल्पांची/कार्यकृतींची सफलताक्षमता दुर्लक्षित करुन केलेल्या पुनर्रचनेला एका दुर्बल कर्ज सुविधेला खतपाणी घालण्याचा प्रयत्न समजले जाईल व त्याबाबत पर्यवेक्षणीय कारवाई केली जाईल. अशा खात्यांच्या बाबतीत एनबीएफसींनी वसुली करण्याचे उपाय वाढवावेत. एनबीएफसींनी, त्यांनी ठरविलेल्या स्वीकार्य - सफलताक्षमतेच्या बेंचमार्क अनुसार, सफलताक्षमता ठरवावी आणि प्रत्येक प्रकरणात मेरिटवर अवलंबून ती लागु केली जावी. उदाहरणार्थ, ह्यासाठीच्या पॅरामीटर्समध्ये, गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो, परताव्याचा अंतर्गत दर व निधीचे मूल्य/खर्च ह्यामधील तफावत आणि पुनर्रचित अग्रिम राशीच्या फेअर मूल्यातील -हासामुळे आवश्यक असलेली तरतुदीची रक्कम समाविष्ट असू शकतात. अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या क्षेत्रांच्या कामगिरीचे निर्देशक वेगवेगळे असल्याकारणाने, एनबीएफसींनी हे बेंचमार्कस, सुयोग्य बदल करुन स्थूलमानाने अंगिकारावेत. ह्यासाठी ठरविण्यात आले आहे की, एनबीएफसींनी निश्चित केलेल्या प्रत्येक पॅरामीटर साठीच्या स्वीकार्य सफलताक्षमता पॅरामीटर्स व बेंचमार्कसवर आधारित अशी सफलताक्षमता एनबीएफसींनी निश्चित करावी. सीडीआर यंत्रणेने अंगिकारलेल्या सफलताक्षमता पॅरामीटर्स साठीचे बेंचमार्कस जोडपत्र 1 मध्ये दिले आहेत. नॉन-सीडीआर प्रकरणांमधील खात्यांची पुनर्रचना करतेवेळी, विशिष्ट क्षेत्रांसाठी, त्यात सुयोग्य बदल/तडजोडी करुन एनबीएफसी त्यांचा अंगिकार करु शकतात.

(4.1.5) फसवणुकी व दुष्कृत्ये करणारे कर्जदार पुनर्रचना करण्यासाठी अपात्र असणे सुरुच राहील.

(4.1.6) बीआयएफआरची प्रकरणे त्यांच्याबाबतची नेमकी मंजुरी मिळाल्याशिवाय पुनर्रचनेसाठी पात्र नाहीत. सीडीआर यंत्रणेखाली पुनर्रचना केलेल्या अग्रिम राशींच्या प्रकरणातील सीडीआर कोअर ग्रुप, तसेच एसएमई कर्ज पुनर्रचना यंत्रणेच्या प्रकरणातील लीड बँक आणि इतर प्रकरणातील वैय्यक्तिक एनबीएफसी, बीआयएफआरची मंजुरी मिळविण्यामधील सर्व औपचारिकता, त्या पॅकेजची अंमलबजावणी होण्यापूर्वी पूर्ण केल्याची खात्री केल्यानंतरच, अशा प्रकरणामधील पुनर्रचनेच्या प्रस्तावांचा विचार करतील.

**(4.2) ॲसेट वर्गीकरण नॉर्म्स**

अग्रिम राशींची पुनर्रचना पुढील टप्प्यांमध्ये केली जाऊ शकते :

(अ) कमर्शियल उत्पादन/कार्यकृती सुरु करण्यापूर्वी

(ब) कमर्शियल उत्पादन/कार्यकृती सुरु केल्यानंतर परंतु तो ॲसेट ‘सबस्टँडर्ड’ किंवा ‘शंकास्पद’ म्हणून वर्गीकृत केला जाण्यापूर्वी

(क) कमर्शियल उत्पादन/कार्यकृती सुरु केल्यानंतर परंतु तो ॲसेट ‘सबस्टँडर्ड’ किंवा ‘शंकास्पद’ म्हणून वर्गीकृत केल्यानंतर

(4.2.1) ‘स्टँडर्ड ॲसेट्स’ म्हणून वर्गीकृत झालेल्या खात्यांचे, पुनर्रचना झाल्यानंतर लगेच/ताबडतोब ‘सबस्टँडर्ड ॲसेट्स’ म्हणून पुनर्-वर्गीकरण केले जावे.

(4.3.2) अकार्यकारी ॲसेट्स त्यांची पुनर्रचना केल्यानंतर, पुनर् रचनेच्या पूर्वी ते वर्गीकृत असलेल्या ॲसेट वर्गीकरणात राहणे सुरुच राहील आणि रचनापूर्व परतफेड वेळापत्रकाच्या संदर्भात, विद्यमान ॲसेट वर्गीकरण नॉर्म्सनुसार ते आणखी खालच्या वर्गीकरणे वर्गात/प्रकारात जातील.

(4.2.3) एनपीए म्हणून वर्गीकृत केलेली प्रमाणभूत खाती आणि एनबीएफसीने पुनर्रचना केल्यानंतर त्याच वर्गात ठेवलेली एनपीए खाती ह्यांचे उच्चतर वर्गीकरण/बदली हे केवळ त्या खात्यामधील सर्व आऊटस्टँडिंग कर्ज/सुविधा, विहित केलेल्या कालावधीत (जोडपत्र 2) समाधानकारक कामगिरी करत असल्यासच केले जावे. म्हणजे - त्या खात्यातील सर्व सुविधांवरील मुद्दल व व्याज ह्यांचे सर्व्हिसिंग, त्या काळामध्ये, प्रदानाच्या अटींनुसार केले जावे.

(4.2.4) तथापि, विहित केलेल्या कालावधीनंतर समाधानकारक कामगिरी दिसून न आल्यास, त्या पुनर्रचित खात्याचे ॲसेट वर्गीकरण, पुनर्रचनापूर्व प्रदान वेळापत्रकाच्या संदर्भात लागु असलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्सनुसार केले जाईल.

(4.2.5) मंजुर केलेल्या पुनर्रचना पॅकेजखाली, कोणतेही अतिरिक्त वित्त, विहित केलेल्या कालावधीमध्ये (जोडपत्र 2) ‘स्टँडर्ड ॲसेट’ म्हणून समजले जावे. तथापि, जेथे पुनर्रचनापूर्व सुविधांना ‘सबस्टँडर्ड’ व ‘शंकास्पद’ म्हणून वर्गीकृत केलेल्या खात्यांच्या बाबतीत, अतिरिक्त वित्तावरील व्याज उत्पन्नाची ओळख केवळ रोख धर्तीवरच केली जावी. वरील विहित केलेल्या कालावधीच्या अखेरीस, पुनर्रचित ॲसेट वरच्या दर्जामध्ये जाण्यास/नेण्यास पात्र नसल्यास, ते अतिरिक्त वित्त, पुनर्रचित कर्जाच्या वर्गीकरण प्रकारात ठेवले जाईल.

(4.2.6) पुनर्रचना केल्यानंतर झालेल्या स्टँडर्ड ॲसेटची त्यानंतर एखाद्या वेळी पुनर्रचना केली गेल्यास त्याला सबस्टँडर्ड म्हणून वर्गीकृत केले जावे. पुनर् रचना केलेला ॲसेट सबस्टँडर्ड किंवा शंकास्पद ॲसेट असल्यास व त्याची नंतर एखाद्या वेळी पुनर्रचना केली गेल्यास, तो सर्वप्रथम एनपीए झाल्याच्या तारखेपासून त्याचे ॲसेट वर्गीकरण धरले जाईल. तथापि, अशा दोन किंवा अधिक वेळा/प्रसंगी पुनर्रचित अग्रिम राशींना, त्यांनी समाधानकारक कामगिरी केल्यास, विद्यमान पुनर्रचना पॅकेजच्या अटींवर, विहित कालावधीनंतर (जोडपत्र 2) स्टँडर्ड वर्गात बढती दिली जाण्यास परवानगी आहे.

**(4.3) उत्पन्न ओळखीचे नॉर्म्स**

परिच्छेद 4.2.5, 5.2 व 6.2 मधील तरतुदींच्या अटींवर, ‘स्टँडर्ड ॲसेट्स’ म्हणून वर्गीकृत केलेल्या पुनर्रचित खात्यांबाबतचे व्याज उत्पन्न उपार्जित धर्तीवर व ‘अकार्यकारी ॲसेट्स’ म्हणून वर्गीकृत केलेल्या खात्यांबाबत ते रोख धर्तीवर ओळखले जाईल.

**(4.4) तरतुदीकरणाचे नॉर्म्स**

(4.4.1) पुनर्रचित अग्रिम राशींवरील तरतुद

(1) विद्यमान तरतुदीकरण नॉर्म्सनुसार एनबीएफसी, पुनर्रचित अग्रिम राशींविरुध्द तरतुदी ठेवतील.

(2) स्टँडर्ड अग्रिम राशी म्हणून पुनर्रचित केलेल्या खात्यांना, पुनर्रचनेच्या तारखेपासून प्रथम दोन वर्षांमध्ये उच्चतर तरतुद (वेळोवेळी विहित केल्यानुसार) लागु असेल. पुनर्रचना केल्यानंतर, व्याज/मुद्दलाच्या परतफेडीवरील मोराटोरियमच्या प्रकरणांमध्ये, अशा अग्रिम राशींना, मोराटोरियमच्या कालासाठी व त्यानंतरच्या दोन वर्षांसाठी विहित केलेल्या उच्चतर तरतुदी लागु असतील.

(3) अकार्यकारी अग्रिम राशी म्हणून वर्गीकृत केलेल्या पुनर्रचित खात्यांना, त्यांना स्टँडर्ड वर्गात बढती दिली गेल्याच्या तारखेपासून पहिल्या वर्षात उच्चतर तरतुद (वेळोवेळी विहित केल्यानुसार) लागु असेल.

(4) पुनर्रचित स्टँडर्ड अग्रिम राशींवरील वर दिलेली उच्चतर तरतुद, जानेवारी 24, 2014 पासून, नवीन पुनर्रचित स्टँडर्ड खात्यांच्या बाबत (फ्लो) 5% असेल व पुनर्रचित स्टँडर्ड खात्यांच्या स्टॉकसाठी (मार्च 23, 2014 रोजी) ती तरतुद टप्प्याटप्प्याने पुढील प्रमाणे वाढविली जाईल.

* 2.75% - मार्च 31, 2014 पासून
* 3.50% - मार्च 31, 2015 पासून (2014-15 च्या चार तिमाहींवर विस्तारित)
* 4.25% - मार्च 31, 2016 पासून (2015-16 च्या चार तिमाहींवर विस्तारित)
* 5% - मार्च 31, 2017 पासून (2016-17 च्या चार तिमाहींवर विस्तारित)

(4.4.2) पुनर्रचित अग्रिम राशींच्या फेअर मूल्यामधील -हासासाठी तरतुद

(1) पुनर्रचनेचा एक भाग म्हणून कमी झालेला व्याजदर आणि/किंवा मुद्दलाची परतफेड करण्याचे नवीन वेळापत्रक ह्यामुळे त्या अग्रिम राशींचे फेअर मूल्य कमी होऊ शकते. मूल्यामध्ये होणारा असा -हास हा एनबीएफसीसाठी आर्थिक तोटाच असतो व त्याचा आघात त्या एनबीएफसीच्या मार्केट मूल्यावर होऊ शकतो. ह्यासाठी एनबीएफसींनी, अग्रिम राशींच्या फेअर मूल्यामधील -हास मोजून, नफा-तोटा लेखेमध्ये डेबिट करुन त्यासाठी तरतुद करणे आवश्यक आहे. अशी तरतुद, वरील 4.4.1 मध्ये दिलेल्या विद्यमान तरतुदीकरण नॉर्म्सनुसार केलेल्या तरतुदींच्या व्यतिरिक्त व नॉर्मल तरतुदींपासून स्पष्ट निराळ्या खात्यात ठेवली जावी.

ह्यासाठी त्या अग्रिम राशीच्या फेअर मूल्यामधील -हास हा, त्या कर्जाच्या पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचने नंतरच्या फेअर मूल्यातील फरक असा काढला/मोजला जावा. पुनर्रचना करण्यापूर्वीचे त्या कर्जाचे फेअर मूल्य हे, पुनर्रचना करण्यापूर्वी त्या अग्रिम राशीवर आकारण्यात आलेल्या विद्यमान दराने, व्याज म्हणून, कॅश फ्लोजचे विद्यमान मूल्य व एनबीएफसीच्या बेअर दराने - (म्हणजे, संबंधित कर्जदाराला पुनर्रचनेच्या तारखेस लागु असल्यानुसार, कोणत्याही कसुरीशिवाय, त्या कर्जाचे सर्व्हिसिंग केले गेले असल्यास, कर्ज करारनाम्यानुसार कर्जदाराला लागु असलेला व्याज दर) डिसकाऊंट केलेले मुद्दल, असे काढण्यात/मोजण्यात यावे. पुनर्रचना केल्यानंतरचे फेअर मूल्य हे, पुनर्रचना केल्यानंतर त्या अग्रिम राशीवर आकारण्यात आलेल्या दराने व्याज म्हणून कॅश फ्लोजचे विद्यमान मूल्य, आणि पुनर्रचना करण्याच्या तारखेस कर्जदाराला लागु असलेल्या एनबीएफसीच्या बेअर कर्जदाराने डिसकाऊंट केलेले मुद्दल.

वरील सूत्र, व्याज दर चक्राबरोबर, कर्जाच्या विद्यमान मूल्यामधील -हासामधील तफावत कमी करते व भविष्यातही एनबीएफसींनी ह्याचे सतत अनुसरण करणे आवश्यक आहे. ह्याशिवाय येथे पुनश्च सांगण्यात येते की, वरीलप्रमाणे आवश्यक तरतुदी ह्या, एनबीएफसींनी कर्जाची पुनर्रचना केल्यामुळे, त्या कर्जाच्या कंत्राट अटींमध्ये बदल होण्यास कारण अशा एनबीएफसींच्या कृती-कारवायांमुळेच निर्माण झाल्या असून त्या वित्तीय सूट ह्या स्वरुपाच्याच आहेत. एनपीए म्हणून वर्गीकृत केलेल्या खात्यांच्या ॲसेट वर्गीकरणाशी जोडणी असलेल्या तरतुदींपासून ह्या तरतुदी स्पष्टपणे वेगळ्या आहेत व त्या कर्जाच्या क्रेडिट दर्जामधील -हासामुळे झालेला बिघाड दर्शवितात. अशा प्रकारे ह्या दोन प्रकारच्या तरतुदी एकमेकींच्या बदली म्हणून नाहीत.

(2) पुनर्रचना केल्यानंतर, कर्ज/इक्विटीमध्ये रुपांतरित केलेली मुद्दलाची रक्कम 'विद्यमान गुंतवणुक' खाली ठेवणे आवश्यक असून तिचे मूल्यांकन नेहमीच्या मूल्यांकन नॉर्म्स अनुसार केले जावे. ह्यासाठी, फेअर मूल्यात झालेला -हास वाढण्यासाठी, मुद्दलाचा कर्ज/इक्विटीमध्ये रुपांतरित न झालेल्या भागाचे एनपीव्ही काढणे वेगळ्याने काढणे आवश्यक आहे. तथापि, एनबीएफसीसाठी एकूण -हास/तोटा म्हणजे वरील भागाचा एनपीव्ही अधिक कर्ज/इक्विटी संलेखांमध्ये रुपांतरण केल्याने झालेला मूल्यांकन तोटा.

ह्यासाठी एनबीएफसींना सांगण्यात येते की, त्यांनी पुनर्रचित खात्यांच्या फेअर मूल्यामधील -हास सुयोग्यतेने गणन करावा/काढावा. कारण, त्याचा परिणाम केवळ त्यांनी करावयाच्या तरतुदीकरणावरच होणार नसून, तो परिणाम, प्रायोजकांकडून करणे आवश्यक असलेल्या त्यागावरही होणार आहे (संदर्भ - परिच्छेद 7.2.2, 4). ह्याशिवाय, एनबीएफसींनी कोणत्याही प्रकारच्या वित्तीय अभियांत्रिकेने, कॅश फ्लोजचे नक्त विद्यमान मूल्य कृत्रिमरीत्या कमी करु नये. पुनर्रचित खात्यांच्या फेअर मूल्यातील -हासाचे अचूक मापन करण्याची खात्री करण्यासाठी, चाचणी व शिल्लकांबाबत एक सुयोग्य यंत्रणा ठेवण्यासही एनबीएफसींना सांगण्यात येत आहे.

(3) अग्रिम राशीच्या फेअर मूल्यामधील -हासाच्या बदल्यात एखादी सिक्युरिटी घेतली गेल्यास ती सिक्युरिटी परिपक्व होईपर्यंत तिचे मूल्य रु.1/- समजले जावे. ह्याने खात्री होईल की नफा-तोटा लेखेत होणारा आर्थिक त्याग नाकबूल असणार नाही.

(4) सर्व परतफेड दायित्वे पूर्ण होईपर्यंत व त्या खात्यातील आऊटस्टँडिंग रकमेचे संपूर्ण पुनर्प्रदान केले जाईपर्यंत, प्रत्येक ताळेबंदावरील तारखेस, फेअर मूल्यातील -हास पुनश्च काढला/गणन केला जावा. त्यामुळे कर्जदाराला लागु असलेल्या बेअर कर्जदारामधील बदलामुळे फेअर मूल्यातील बदल कळून येतील. परिणामी एनबीएफसी, तरतुदीमधील तुटीसाठी व्यवस्था/तरतुद करु शकतात किंवा त्या स्पष्ट खात्यात ठेवलेली अतिरिक्त रक्कम रिव्हर्स करु शकतात.

(6) तज्ज्ञान/सुयोग्य इन्फ्रास्ट्रक्चर ह्यांच्या अभावामुळे, अग्रिम राशींच्या फेअर मूल्यामधील -हास गणन करणे एनबीएफसीला अवघड होत असल्यास, फेअर मूल्यातील -हास काढण्यासाठी वर विहित केलेल्या रीतीला पर्याय म्हणून, एनबीएफसींना, फेअर मूल्यातील -हासाची रक्कम नोशनली काढून/गणन करुन, जेथे एनबीएफसीला असलेले एकूण येणे रु. एक कोटीपेक्षा कमी असेल तेथे, सर्व पुनर्रचित खात्यांच्या बाबतीत एकूण एक्सपोझरच्या पाच टक्के दराने तरतुद करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

(4.4.3) एखाद्या खात्याच्या विरुध्द आवश्यक असलेल्या तरतुदींवर (नेहमीच्या तरतुदी अधिक अग्रिम राशीच्या फेअर मूल्यात झालेल्या -हासासाठीची तरतुद, आऊटस्टँडिंग कर्ज रकमेच्या 100% एव्हढी मर्यादा आहे.

**(5) मुद्दलाचे कर्ज/इक्विटीमध्ये रुपांतरण करण्यासाठी प्रुडेंशियल नॉर्म्स**

**(5.1) ॲसेट वर्गीकरण नॉर्म्स**

पुनर्रचनेचा एक भाग म्हणून, येणे असलेल्या मुद्दल रकमेच्या एखाद्या भागाचे कर्ज किंवा इक्विटी संलेखात रुपांतरण केले जाऊ शकते. अशा प्रकारे निर्माण केलेल्या कर्ज/इक्विटी संलेखाचे वर्गीकरण, ती पुनर्रचित अग्रिम राशी वर्गीकृत केली असलेल्या ॲसेट वर्गीकरण प्रकारात/वर्गात केले जाईल. ह्या संलेखांच्या ॲसेट वर्गीकरणातील पुढील हालचाल, पुनर्रचित अग्रिम राशीच्या त्यानंतरच्या ॲसेट वर्गीकरणावर आधारित ठरविली जाईल.

**(5.2) उत्पन्न ओळख नॉर्म्स**

**(5.2.1) प्रमाणभूत (स्टँडर्ड) खाती**

'स्टँडर्ड' म्हणून वर्गीकृत केलेल्या पुनर्रचित खात्यांच्या बाबतीत, ह्या संलेखांनी निर्माण केलेले उत्पन्न हे उपार्जित धर्तीवर ओळखले जावे.

**(5.2.2) अकार्यकारी ॲसेट्स**

अकार्यकारी ॲसेट्स म्हणून वर्गीकृत केलेल्या पुनर्रचित खात्यांबाबत, ह्या संलेखांनी निर्माण केलेले उत्पन्न हे केवळ रोख धर्तीवर ओळखले जावे.

**(5.3) मूल्यांकन व तरतुदीकरण नॉर्म्स**

हे संलेख 'चालु गुंतवणुक' खाली ठेवले जावेत व त्यांचे मूल्यांकन नेहमीच्या मूल्यांकन नॉर्म्सनुसार केले जावे. स्टँडर्ड ॲसेट म्हणून वर्गीकृत केलेल्या इक्विटीचे मूल्यांकन, ती कोटेड असल्यास मार्केट मूल्याने किंवा ती कोटेड नसल्यास (पुनर् मूल्यांकन राखीव निधी विचारात न घेता) ब्रेक अप मूल्याने केले जावे आणि हे कंपनीच्या अगदी अलिकडील ताळेबंदावरुन पडताळून पाहिले जावे. अगदी अलिकडील ताळेबंद उपलब्ध नसल्यास त्या शेअर्सचे मूल्यांकन रु.1 दराने केले जावे. एनपीए म्हणून वर्गीकृत केलेल्या इक्विटी संलेखांचे मूल्यांकन ते कोटेड असल्यास, मार्केट मूल्याने केले जावे व इक्विटी कोटेड नसल्यास त्यांचे मूल्यांकन रु.1/- दराने केले जावे. ह्या संलेखांवरील घसारा, 'विद्यमान/चालु गुंतवणुक' वर्गाखाली ठेवलेल्या इतर कोणत्याही सिक्युरिटीज मधील मूल्यवर्धनाविरुध्द सेट ऑफ केला जाऊ नये.

**(6) प्रदान न केलेल्या व्याजाचे 'निधीयुक्त व्याज मुदत कर्ज (एफआयटीएल)', कर्ज किंवा इक्विटी संलेखात रुपांतरण करण्यासाठीचे प्रुडेंशियल नॉर्म्स.**

**(6.1) ॲसेट वर्गीकरण नॉर्म्स**

प्रदान न केलेल्या व्याजाचे रुपांतरण करुन निर्मित एफआयटीएल/कर्ज किंवा इक्विटींचे वर्गीकरण, ती पुनर्रचित अग्रिम राशी वर्गीकृत केली गेली असलेल्या ॲसेट वर्गीकरण वर्गातच केले जाईल. एफआयटीएल/कर्ज किंवा इक्विटी संलेखांच्या ॲसेट वर्गीकरणातील पुढील हालचाल, पुनर्रचित अग्रिम राशीच्या त्यानंतरच्या ॲसेट वर्गीकरणाच्या आधारावर ठरविली जाईल.

**(6.2) उत्पन्न ओळख नॉर्म्स**

(6.2.1) हे संलेख 'स्टँडर्ड' म्हणून वर्गीकृत केलेले असल्यासच त्यांनी निर्माण केलेले उत्पन्न उपार्जित धर्तीवर ओळखले जावे व ते अकार्यकारी ॲसेट म्हणून वर्गीकृत केलेले असल्यास रोख धर्तीवर ओळखले जावे.

(6.2.2) एफआयटीएल/कर्ज किंवा इक्विटी संलेखांच्या वसुल न झालेल्या उत्पन्नाला, 'संड्री लायाबिलिटीज खाते (व्याज भांडवलीकरण)' ह्या नावाच्या खात्यात क्रेडिट दिले जावे.

(6.2.3) वसुली न झालेल्या व्याज उत्पन्नाचे, कोटेड इक्विटीमध्ये रुपांतरण केले गेल्यास, व्याज उत्पन्न हे, इक्विटीमध्ये रुपांतरित केलेल्या व्याजाच्या रकमेपेक्षा अधिक नसल्यास, त्या खात्याला स्टँडर्ड वर्ग म्हणून बढती मिळाल्यानंतर, बढतीच्या तारखेस असलेल्या मार्केट मूल्यानुसार ओळखले जावे.

(6.2.4) केवळ एफआयटीएलची परतफेड झाल्यावर किंवा कर्ज/इक्विटी संलेखांची विक्री/विमोचन झाल्यावर, मिळालेली रक्कम पी ॲंड एल लेखेमध्ये ओळखली जाईल व त्याच वेळी 'संड्री लायाबिलिटीज खाते (व्याज भांडवलीकरण)' मधील शिल्लक त्यानुसार कमी केली जाईल.

**(6.3) मूल्यांकन व तरतुदीकरण नॉर्म्स**

मूल्यांकन व तरतुदीकरण नॉर्म्स वरील परिच्छेद 5.3 अनुसार असतील. मूल्यांकनावर घसारा असल्यास तो संड्री लायाबिलिटीज (व्याज भांडवलीकरण) खात्यात आकारला जाईल.

**(7) ॲसेट वर्गीकरणासाठी विशेष विनियामक वागणुक**

(7.1) वरील परिच्छेद 4 मध्ये ह्याबाबत दिलेल्या तरतुदींमध्ये बदल करुन तयार केलेली विशेष विनियात्मक वागणुक ही, इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प, नॉन-इन्फ्रा प्रकल्प ह्यात दिलेल्या अग्रिम राशींच्या पुनर्रचनेबाबत; आणि सीडीआर यंत्रणा/एसएमई कर्ज पुनर्रचना यंत्रणा खाली आणि कॉन्सेर्टियम/मल्टिपल लेंडिंग अरेंजमेंट मध्ये (पुढील प्रकारचे अग्रिम राशी वर्ग सोडून) पुनर्रचित केलेल्या कर्जाबाबत खालील परिच्छेद 7.2 मधील अटींवर उपलब्ध असेल :-

(1) कंझुमर व वैय्यक्तिक अग्रिम राशी

(2) कॅपिटल मार्केट एक्सपोझर्स म्हणून वर्गीकृत केलेल्या अग्रिम राशी

(3) कमर्शियल रियल इस्टेट एक्सपोझर्स म्हणून वर्गीकृत अग्रिम राशी.

ह्या तीन प्रकारच्या खात्यांचे, आणि परिच्छेद 7.2 मध्ये दिलेल्या अटींचे पालन न करणा-या इतर खात्यांचे ॲसेट वर्गीकरण, वरील परिच्छेद 4 मध्ये ह्याबाबत दिलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्सने नियंत्रित असेल.

**(7.2) विशेष विनियामक वागणुकीची तत्त्वे**

ह्या विशेष विनियामक वागणुकीचे दोन घटक आहेत. (1) पुनर्रचना पॅकेजच्या जलद अंमलबजावणीसाठी प्रोत्साहन

(2) पुनर्रचित खात्याचे ॲसेट वर्गीकरण, पुनर् रचनापूर्व ॲसेट वर्गीकरण प्रकारात ठेवणे.

**(7.2.1) पुनर्रचना पॅकेजच्या जलद अंमलबजावणीसाठी प्रोत्साहन**

परिच्छेद 4.1.2 मध्ये दिल्यानुसार, एनबीएफसीकडे अग्रिम राशींच्या पुनर्रचनेसाठीचा अर्ज प्रलंबित असतानाच्या काळात, ॲसेट वर्गीकरणाचे नेहमीचे नॉर्म्स लागु असणे सुरुच राहील. एखाद्या ॲसेटचा पुनर् वर्गीकरण करण्याची प्रक्रिया, तो अर्ज केवळ विचाराधीन आहे म्हणून थांबू नये. तथापि, त्या पॅकेजच्या जलद अंमलबजावणी साठीचे एक प्रोत्साहन म्हणून, एनबीएफसीने पुढील वेळापत्रकानुसार, मंजुर केलेल्या पॅकेजची अंमलबजावणी केल्यास, सीडीआर यंत्रणेखाली येणा-या प्रकरणांच्या बाबतीत किंवा नॉन-सीडीआर प्रकरणात, पुनर्रचनेसाठीचा अर्ज एनबीएफसीला मिळाल्याचे वेळी, सीडीआर कक्षाचा संदर्भ घेतेवेळी असलेल्या दर्जामध्ये ॲसेट वर्गीकरणाचा दर्जा परत ठेवला जाऊ शकतो.

(1) सीडीआर यंत्रणेखाली मंजुरीच्या तारखेपासून 120 दिवसांच्या आत.

(2) सीडीआर यंत्रणेखाली पुनर्रचित प्रकरणे सोडून अन्य प्रकरणात, एनबीएफसीला अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून 120 दिवसांच्या आत.

**(7.2.2) ॲसेट वर्गीकरणाचे फायदे**

परिच्छेद 4 मध्ये दिलेल्या प्रुडेंशियल साचाचे अनुसरण करण्याव्यतिरिक्त खालील अटींचे अनुपालन करण्याच्या अटींवर - (1) परिच्छेद 4.2.1 मध्ये केलेल्या बदलानुसार, विद्यमान ‘स्टॅंडर्ड ॲसेट’चा दर्जा पुनर्रचना केल्यानंतर सबस्टॅंडर्ड वर्गात/प्रकारात कमी केला जाणार नाही.

(2) परिच्छेद 4.2.2 मध्ये केलेल्या बदलानुसार, विहित केलेल्या कालावधीत, समाधानकारक कामगिरी केलेली दिसून आल्यास, सबस्टॅंडर्ड/शंकास्पद खात्यांच्या ॲसेट वर्गीकरणात, पुनर्रचना केल्यानंतर -हास/कमीपणा होणार नाही.

तथापि, हे लाभ पुढील अटींचे पालन केले गेल्यासच उपलब्ध असतील.

(1) एनबीएफसीबाबतचे येणे (ड्युज), जोडपत्र 2 मध्ये दिल्याप्रमाणे ‘संपूर्णपणे सुरक्षित’ असावेत. मूर्त सिक्युरिटीने संपूर्ण सुरक्षित असण्याची अट ही इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांना लागु असणार नाही - मात्र, ह्या प्रकल्पांपासून निर्माण झालेले कॅश फ्लोज् हे अग्रिम राशीची परतफेड करण्यास पुरेसे असावेत व हे कॅश फ्लोज् एस्क्रो करण्यासाठी,

अर्थसहाय्य करणा-या एनबीएफसींकडे सुयोग्य यंत्रणा असावी व त्यांचा ह्या कॅश फ्लोज्वर स्पष्ट असा कायदेशीर रीत्या प्रथम हक्क असावा.

(2) ते एकक इन्फ्रास्ट्रक्चर कार्यकृतींमध्ये असल्यास ते 8 वर्षांमध्ये, व इतर एककांच्या बाबतीत 5 वर्षांमध्ये सफलताक्षम झाले पाहिजे.

(3) पुनर्रचित अग्रिम राशींचा, मोराटोरियमसह परतफेड कालावधी, इन्फ्रास्ट्रक्चर अग्रिम राशींसाठी 15 वर्षांपेक्षा व इतर प्रकारच्या अग्रिम राशींसाठी 10 वर्षांपेक्षा अधिक नसला पाहिजे.

(4) प्रायोजकांचा त्याग व त्यांनी आणलेला अतिरिक्त निधी हा, एनबीएफसींच्या त्यागाच्या किमान 20% किंवा पुनर्रचित कर्जाच्या 2% पैकी जे जास्त असेल तेवढा असावा. ही किमान अट असून, प्रकल्पाच्या जोखमीच्या कमी-अधिकपणावर अवलंबून प्रायोजकांनी त्याग रक्कम आणण्याच्या क्षमतेवर अवलंबून, त्यांच्याकडून अधिक त्याग रक्कम येणे एनबीएफसी ठरवू शकतात. ह्याशिवाय मोठ्या खात्यांच्या, विशेषतः सीडीआर खात्यांच्या बाबतीत असा उच्चतर त्याग केला जाण्याचा आग्रह धरला जावा. कर्जदारांना पुनर्रचनेचे लाभ देतेवेळी प्रायोजकांचा त्याग समोर आणला जावा. 'एनबीएफसीचा त्याग' ह्या संज्ञेचा अर्थ म्हणजे, वरील परिच्छेद 4.4.2 (1) व (2) मध्ये दिलेल्या रितीने 'अग्रिम राशीच्या फेअर मूल्यातील -हास' ची रक्कम किंवा 'एकूण त्याग' चे गणन करणे.

(5) प्रायोजकाची वर्गणी रोख स्वरुपातच आणली जावी असे नाही, तर ती, इक्विटीचे डि-रेटिंग, प्रायोजकाने आणलेल्या अप्रतिभूतित कर्जाचे इक्विटीमध्ये रुपांतरण व व्याजमुक्त कर्जे ह्या स्वरुपातही आणली जाऊ शकते.

(6) जोडपत्र-2 मध्ये व्याख्या केल्यानुसार, विचाराधीन असलेली पुनर्रचना 'पुनश्च (रिपीटेड) केलेली पुनर्रचना' नाही.

(7.2.3) बँका/वित्तीय संस्थांकडून अग्रिम राशींच्या पुनर्रचनेवरील विद्यमान प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वांचे पुनरावलोकन करण्यासाठीच्या कार्यकारी गटाच्या (अध्यक्ष - श्री. महापात्रा) शिफारशींना अनुसरुन पुनर्रचना पॅकेजची अंमलबजावणी करण्यासाठीचे प्रोत्साहन, व अटी पूर्ण केल्यानंतर केलेल्या पुनर्रचनेवर उपलब्ध असलेले ॲसेट वर्गीकरण लाभ (वरील परिच्छेद 7.2.1 व 7.2.2), सर्व पुनर्रचनांसाठी, एप्रिल 1, 2015 पासून काढून घेतले जातील. ह्यासाठीचा अपवाद म्हणजे, इन्फ्रास्ट्रक्चर तसेच नॉन-इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प कर्जांच्या बाबतीत (कृपया परिच्छेद 3 पहा) डीसीसीओ मधील बदलांशी संबंधित तरतुदी. ह्याचा अर्थ असा होतो की, एप्रिल 1, 2015 पासून, एखाद्या स्टँडर्ड खात्याची पुनर्रचना केल्यावर (डीसीसीओ मधील बदल सोडून अन्य कारणांनी) पुनर्रचनेनंतर लगेच ते खाते सबस्टँडर्ड म्हणून वर्गीकृत केले जाईल आणि अकार्यकारी ॲसेट्सचे, त्यांची पुनर्रचना केल्यानंतर, पुनर्रचनेपूर्वी ते असलेल्या ॲसेट वर्गीकरणात राहणे सुरुच राहील व पुनर्रचनापूर्व परतफेड, वेळापत्रकाच्या संदर्भात, विद्यमान ॲसेट वर्गीकरण नॉर्म्स अनुसार त्यापेक्षा खालच्या ॲसेट वर्गीकरण प्रकारात जातील.

**(8) संकीर्ण**

(8.1) एनबीएफसींनी, पुनर्रचना प्रक्रियेचा एक भाग म्हणून रुपांतरण क्षमतेच्या (इक्विटीमध्ये) प्रश्नाबाबत धोरण ठरवावे. ह्यामुळे, संबंधित सेबी विनियम नजरेसमोर ठेवून, त्या एनबीएफसींना, पुनर्रचित रकमेच्या एका भागाचे इक्विटीमध्ये रुपांतर करण्याचा हक्क असेल.

(8.2) कर्जाचे प्रिफरन्स शेअर्समध्ये रुपांतरण हे शेवटचा उपाय म्हणून केले जावे आणि असे कर्जाचे, इक्विटी/प्रिफरन्स शेअर्समध्ये केलेले रुपांतरण, कोणत्याही परिस्थितीत एका मर्यादेपर्यंत (कॅप) (पुनर्रचित कर्जाच्या 10%) निर्बंधित असावे. ह्याशिवाय, कर्जाचे इक्विटीमध्ये केलेले रुपांतरण हे केवळ सूचिबध्द कंपन्यांच्या बाबतीतच केले जावे.

(8.3) एनबीएफसींनी, त्यांच्या मंजुरीप्राप्त पुनर्रचना पॅकेजमध्ये, परतफेड शीघ्रतेने केली जाण्याबाबत धनकोचा हक्क व मुदतपूर्व प्रदान करण्याचा कर्जदाराचा हक्क समाविष्ट करण्याचा विचार करावा. ह्याशिवाय, सर्व पुनर्रचना पॅकेजेसमध्ये ‘भरपाई करण्याचा हक्क’ हा खंड समाविष्ट केला जावा, आणि तो कर्जदाराच्या विशिष्ट कामगिरीवर आधारित असावा. कोणत्याही परिस्थितीत, धनकोंनी, भरपाईच्या किमान 75% रक्कम वसुल करावी आणि जेथे बेअर कर्जदराच्याही खाली पुनर्रचनेखालील काही सुविधा देण्यात आली आहे तेथे भरपाईची 100% रक्कम वसुल केली जावी.

(8.4) वैय्यक्तिक हमीची अट घातल्याने, प्रायोजकांच्या बाबतीत ‘स्किन इन दि गेम’ ची किंवा पुनर्रचना पॅकेजबाबत दायित्वाची खात्री होत असल्याने, पुनर्रचनेच्या सर्व प्रकरणात प्रायोजकांची वैय्यक्तिक हमी घेतली जावी आणि वैय्यक्तिक हमीच्या जागी/बदल्यात कॉर्पोरेट हमी स्वीकारली जाऊ शकत नाही. तथापि, जेथे कंपनीचे प्रायोजक हे व्यक्ती नसून अन्य कॉर्पोरेट बॉडीज आहेत तेथे, किंवा जेथे व्यक्तिगत/वैय्यक्तिक प्रायोजकांची स्पष्टपणे ओळख नाही तेथे कॉर्पोरेट हमी स्वीकारली जाऊ शकते.

**(9) प्रकटीकरणे**

मार्च 31, 2014 रोजी संपणा-या वित्तीय वर्षापासून एनबीएफसींनी, त्यांच्या प्रसिध्द केलेल्या वार्षिक ताळेबंदांमध्ये, ‘नोट्स ऑन अकाऊंट्स’ खाली पुनर्रचित केलेल्या अग्रिम राशींची संख्या व रक्कम, आणि जोडपत्र 4 मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार, पुनर्रचित अग्रिम राशींच्या फेअर मूल्यामधील -हासाची रक्कम ह्याबाबतची माहिती प्रकट करावी. सीडीआर यंत्रणा, एसएमई कर्ज पुनर्रचना यंत्रणा व इतर वर्ग ह्यांच्या खाली पुनर्रचित केलेल्या अग्रिम राशींसाठी ही माहिती वेगळ्याने देणे आवश्यक आहे. पुनर्रचित भाग किंवा सुविधा ह्यांचेबरोबर ज्यांची खाती पुनर्रचित केली गेली आहेत अशा कर्जदारांच्या सर्व खात्यात/सुविधांमध्ये आऊटस्टँडिंग असलेली एकूण रक्कम एनबीएफसींनी प्रकट केलीच पाहिजे. ह्याचा अर्थ, एखाद्या कर्जदाराच्या सुविधा/खात्यांपैकी केवळ एकाचीच पुनर्रचना केली गेली असली तरीही, एनबीएफसीने त्या विशिष्ट कर्जदाराच्या सर्व सुविधा/खात्यांसंबंधीची संपूर्ण आऊटस्टँडिंग रक्कम प्रकट करावी. जोडपत्र 4 मध्ये दिलेल्या प्रकटीकरण नमुन्यात पुढील गोष्टीही समाविष्ट आहेत :-

(1) उच्चतर तरतुद व जोखीम भार (लागु असल्यास), लागु असलेली स्टँडर्ड पुनर्रचित खाती सोडून, पुनर्रचित केलेल्या खात्यांचा संचयित धर्तीवर तपशील.

(2) निरनिराळ्या वर्गाखालील पुनर्रचित खात्यांवर केलेली तरतुद.

(3) पुनर्रचित खात्यांची हालचाल.

ह्याचा अर्थ म्हणजे, पुनर्रचित अग्रिम राशींवर (सुरुवातीपासून किंवा एनपीए वर्गापासून बढती मिळाल्याने स्टँडर्ड म्हणून वर्गीकृत) केलेल्या तरतुदी, विहित कालावधीमध्ये समाधानकारक कामगिरी केली गेली असल्याने नॉर्मल स्तरावर परत येतात/लागु होतात तेथे अशा अग्रिम राशी एनबीएफसींनी, त्यांच्या वार्षिक ताळेबंदातील 'नोट्स ऑन अकाऊंट्स' मध्ये, पुनर्रचित खाती म्हणून प्रकट करणे आवश्यक नाही. तथापि, अशा पुनर्रचित खात्यांवरील, त्या पुनर्रचित खात्यांच्या फेअर मूल्यामधील -हासासाठीची तरतुद, विद्यमान सूचनांनुसार ठेवणे, एनबीएफसींनी सुरु ठेवावे.

(10) ह्यासाठी ठेवलेल्या निकषांनुसार पुनर्रचनेसाठी अन्यथा पात्र ठरत असलेल्या व औद्योगिक नसलेल्या कार्यकृती करणा-या कॉर्पोरेट्ससाठी ही सीडीआर यंत्रणा उपलब्ध आहे. ह्याशिवाय, सीडीआर यंत्रणेखाली न येणा-या कॉन्सॉर्टियम/मल्टिपल लेंडिंग खात्यांची पुनर्रचना करण्याच्या बाबतीत, त्यांच्या स्वतः मधील/धनकोंमधील सहकार दृढतर करण्यासाठी एनबीएफसींना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

पुनश्च एकदा सांगण्यात आले आहे की, पुनर्रचनेचे उद्दिष्ट, एककांचे आर्थिक मूल्य टिकवून ठेवणे हे आहे - वादग्रस्त खात्यांना कायम खतपाणी घालणे हे नव्हे. केवळ सफलताक्षमतेचे काळजीपूर्वक केलेले मूल्यमापन, खात्यांमधील दुर्बलता त्वरित शोधणे, व पुनर्रचना पॅकेजेसची कालबध्द अंमलबजावणी, ह्यांच्या द्वारेच एनबीएफसी व कर्जदार हे साध्य करु शकतात.

**परिशिष्ट 1**

**सफलताक्षमता पॅरामीटर्ससाठी स्थूलमानाने बेंचमार्कस**

(1) गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा हा, 5 वर्षांच्या सरकारी सिक्युरिटीचे उत्पन्न अधिक 2 टक्के एवढा असावा.

(2) डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो, 5 वर्षांच्या कालावधीत 1.25 असावा. ह्या कालावधीत ते युनिट सफलताक्षम झाले पाहिजे - आणि वर्ष ते वर्ष धर्तीवर तो रेशो 1 पेक्षा जास्त असावा. 10 वर्षांच्या परतफेड कालावधीसाठीचा नॉर्मल डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो सुमारे 1.33 असावा.

(3) परताव्याचा अंतर्गत दर व भांडवलाचा खर्च ह्यामधील बेंचमार्क तफावत किमान 1% असावी.

(4) कार्यकारी (ऑपरेटिंग) व रोख ब्रेक इव्हन पॉईंट्स काढण्यात यावेत व ते उद्योगाच्या नॉर्म्स बरोबर तुलनीय असावेत.

(5) पूर्वेतिहासाचा डेटा व भविष्यातील प्रक्षेपणे ह्यावर आधारित कंपनीचा कल/झुकाव उद्योगाबरोबर तुलनीय असावा. अशा प्रकारे, भूतपूर्व व भविष्यातील ईबीआयडीटीए ची वर्तणुक अभ्यासिली जावी व तिची उद्योग सरासरींशी तुलना केली जावी.

(6) खाती व्याख्या केल्यानुसार असलेला लोन लाईफ रेशो (एलएलआर) 1.4 असावा. ह्यामुळे सर्व्हिसिंग करावयाच्या कर्ज रकमेला 40% आधार (कुशन) प्राप्त होईल.

एलएलार = कर्जाच्या जीवन कालामधील (व्याज व मुद्दलासह) एकूण उपलब्ध कॅश फ्लोचे (एसीएफ) विद्यमान मूल्य/ कर्जाची कमाल रक्कम.

परिशिष्ट 2

## कळीच्या/महत्त्वाच्या संकल्पना

### (1) अग्रिम राशी

'अग्रिम राशी' ह्या संज्ञेचा अर्थ म्हणजे, मुदत कर्जे, डिसकाऊंट केलेली/खरेदी केलेली बिले, फॅक्टर्ड रिसीव्हेबल्स इत्यादींसह अर्व प्रकारच्या कर्ज सुविधा आणि इक्विटी स्वरुपामधील सोडून अन्य गुंतवणुकी.

### (2) संपूर्णपणे प्रतिभूतित/संरक्षित (फुलली सिक्युअर्ड)

जेव्हा एखद्या एनबीएफसीला येणे असलेल्या (पुनर्रचित कर्जाच्या अटीनुसार मुद्दल व येणे असलेल्या व्याजाचे विद्यमान मूल्य) त्या ड्युजच्या बाबतीत एनबीएफसीच्या हितसंबंधात चार्ज केलेल्या रकमा, त्या सिक्युरिटीच्या मूल्याने संपूर्णपणे संरक्षित असतात, तेव्हाच एनबीएफसींचे ड्युज (येणे रक्कम) संपूर्णपणे सुरक्षित असल्याचे समजले जाते. सिक्युरिटीच्या वसुली करता येण्यासारखे मूल्याचे मूल्यमापन करतेवेळी, प्राथमिक तसेच तारणयुक्त सिक्युरिटीज हिशेबात घेतल्या जातील - मात्र, अशा सिक्युरिटीज मूर्त (टँजिबल) सिक्युरिटीज असाव्यात, हमी इत्यादिसारख्या प्रायोजक/इतरांच्या हमी सारख्या अमूर्त स्वरुपात नसाव्यात. तथापि, ह्यासाठी, बँकेने दिलेल्या हमी, राज्य सरकारांच्या हमी व केंद्र सरकारच्या हमी ह्या मूर्त स्वरुपातील सिक्युरिटी समजण्यात येतील.

### (3) पुनर्रचित खाती

एखादे पुनर्रचित खाते म्हणजे, कर्जदाराच्या वित्तीय अडचणीसंबंधाने असलेल्या आर्थिक किंवा कायदेशीर कारणांनी ही एनबीएफसी अन्यथा विचारात घेणार नाही. अशा कर्जदाराला दिलेल्या सवलती अशा पुनर्रचनेमध्ये सामान्यतः अग्रिम राशी/सिक्युरिटीजच्या अटींमधील बदल, म्हणजे ज्यात इतर बाबींबरोबर, परतफेडीचा कालावधी/परतफेडीची रक्कम/हप्त्यांची रक्कम/व्याज दर ह्यामधील बदल (स्पर्धात्मक कारणे सोडून अन्य कारणांनी) समाविष्ट असतात. तथापि, ईएमआयमध्ये बदल न करण्यासाठी व्याजदर पुनश्च निश्चित केल्यावर येणा-या तरत्या दराच्या परतफेड मुदतीमध्ये केलेला विस्तार, खात्यांच्या एका वर्गाला एकसमान रितीने लागु केला असल्यास, ते खाते 'पुनर्रचित खाते' म्हणून समजले जाणार नाही/होणार नाही. दुस-या शब्दात, संपूर्ण वर्गाविरुध्द ऐवजी, वैय्यक्तिक कर्जदारांच्या ईएमआयमध्ये विस्तार करणे किंवा तो लांबणीवर टाकणे असे केले गेल्यास ती खाती 'पुनर्रचित खाती' म्हणून वर्गीकृत केली जाऊ शकतात.

जेथे सुयोग्य पूर्व-मंजुरी घेण्यात आली आहे आणि जेथे कर्जदाराच्या प्रत्यक्ष गरजेवर आधारित रोलओव्हर करण्यास परवानगी देण्यात आली आहे व कर्जदाराच्या कर्ज-दुर्बलतेमुळे कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही. लघु मुदत-कर्जाच्या रोल ओव्हरच्या बाबतीत ती कर्जे पुनर्रचित खाती म्हणून समजली जाणार नाहीत. ह्याशिवाय, कर्जदाराने इतर बँका/धनकोंकडून, कॉन्सॉर्टियम मध्ये किंवा मल्टिपल बँकिंगखाली अशाच सुविधांचा लाभ घेतला असण्याच्या शक्यतेमुळे, एनबीएफसींनी अशा सुविधा देतेवेळी सावध/दूरदर्शी असावे. ह्याशिवाय, ह्या तरतुदी संबंधात लघु मुदत कर्जामध्ये, रिव्हॉल्विंग कॅश क्रेडिट किंवा कार्यकारी भांडवल डिमांड कर्जे ह्यासारखी, सुयोग्यतेने मूल्यमापन केलेली नियमित कार्यकारी भांडवल कर्जे समाविष्ट नाहीत.

**(4) वारंवार पुनर्रचित केलेली कर्जे**

जेव्हा एखादी एनबीएफसी एखाद्या खात्याची पुनर्रचना दुस-यांदा (किंवा त्यापेक्षा अधिक वेळा) करते तेव्हा ते खाते 'वारंवार पुनर् रचित खाते' समजले जाईल. तथापि, प्रथम पुनर्रचनेच्या अटींखाली देण्यात आलेल्या सवलतींच्या कालावधीनंतर दुसरी पुनर्रचना केली गेल्यास, ते खाते 'वारंवार पुनर्रचित खाते' समजले जाणार नाही.

**(5) एसएमईज**

लघु व मध्यम उद्योग (एसएमई) हा वेळोवेळी सुधारित आरपीसीडी परिपत्रक आरपीसीडी. प्लेन्स. बीसी. क्र. 63. 06. 02/2006-07 दि. एप्रिल 4, 2007 मध्ये व्याख्या केलेला एक उपक्रम आहे.

**(6) विहित कालावधी**

विहित कालावधी म्हणजे, पुनर्रचित पॅकेजच्या अटींखाली, मोराटोरियमच्या कमाल/सर्वात मोठा कालावधी असलेल्या कर्ज सुविधेवर, व्याज किंवा मुद्दल ह्यापैकी उशीरा असेल त्याचे, प्रथम प्रदान सुरु होण्यापासून एक वर्षाचा कालावधी

**(7) समाधानकारक कामगिरी**

विहित कालावधीमधील समाधानकारक कामगिरी म्हणजे, त्या कालावधीत, पुढील अटींचे केलेले अनुसरण :-

**अकृषिक मुदत कर्ज खाती**

अकृषिक/बिगर शेतकी मुदत कर्ज खात्यांच्या बाबतीत, ते खाते एनपीए म्हणून वर्गीकृत केले जाण्यासाठीच्या दिवसांच्या संख्येपेक्षा अधिक कालावधीसाठी कोणतेही प्रदान थकित (ओव्हरड्यु) राहू/असू नये. ह्याशिवाय विहित कालावधीच्या अखेरीस कोणतीही थकबाकी (ओव्हरड्युज) असू नये.

**सूचना**

(1) ईएमआयमध्ये बदल न व्हावा ह्यासाठी, गृह कर्जांच्या बाबतीत परतफेडीच्या कालावधीचा विस्तार करतेवेळी, एनबीएफसींनी, विस्तारित परतफेड कालावधीसह, संपूर्ण परतफेड कालावधीदरम्यान, त्या कर्जदाराच्या उत्पन्न निर्माण/परतफेड क्षमता बाबत स्वतःचे समाधान करुन घ्यावे.

(2) ईएमआयमध्ये बदल न व्हावा ह्यासाठी कर्जदाराला मुदतवाढ/मुदतीत विस्तार पाहिजे असला तरीही, त्या विस्तारित कालावधीदरम्यान, परतफेड क्षमतेबाबत काळजी वाटत असल्यास एनबीएफसींनी, अशा कर्जदारांच्या परतफेड कालावधीत वाढ/विस्तार करु नये.

(3) मूळ परतफेड कालावधीनुसार गृह कर्जांची परतफेड करु इच्छिणा-या कर्जदारांना, उच्चतर ईएमआयचा पर्याय एनबीएफसींनी उपलब्ध करुन द्यावा.

**परिशिष्ट 3**

**कॉनसॉर्टियम/मल्टिपल बँकिंग/सिंडिकेशन व्यवस्था ह्याखालील अग्रिम राशींच्या पुनर् रचनेसाठी संस्थात्मक साचा (फ्रेमवर्क)**

**(अ) कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचना (सीडीआर) यंत्रणा**

(1.1) **उद्दिष्ट**

कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचना (सीडीआर) यंत्रणा साचाचे उद्दिष्ट म्हणजे, अडचणींचा सामना करणा-या सफलताक्षम संस्थांच्या कॉर्पोरेट कर्जांची पुनर्रचना, बीआयएफआर, डीआरटी व इतर कायदेशीर संस्थांच्या बाहेर, सर्व संबंधितांच्या लाभासाठी, वेळेवारी व पारदर्शकतेने केली जाण्याची खात्री करुन देणे. विशेषतः ह्या साचाचा उद्देश, काही अंतर्गत व बाह्य घटकांमुळे बाधित झालेल्या सफलताक्षम कॉर्पोरेट संस्थांना टिकवून ठेवणे आणि एका नीटनेटक्या व समन्वययुक्त पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे, धनको व इतर स्टेकहोल्डर्सना होणारा तोटा/हानि किमान करणे हा असेल.

(1.2) **व्याप्ती**

सीडीआर यंत्रणेची रचना/कार्यकृती ही, एकापेक्षा जास्त बँक/वित्तीय संस्था (एफआय) कडून कर्ज सुविधा घेणा-या कर्जदारांच्या अग्रिम राशींची पुनर्रचना, समन्वयाने करण्यास मदत करणारी आहे. एकापेक्षा अधिक बँक/एफआयकडून वित्त मिळविणा-या मोठ्या कर्जदारांच्या पुनर्रचना प्रस्तावाची जलद वासलात लावण्यासाठी असलेला, सीडीआर यंत्रणा हा एक संस्थात्मक साचा आहे. ही यंत्रणा, कोणतीही कार्यकृती करणा-या सर्व कर्जदारांना पुढील अटींवर उपलब्ध आहे :-

(अ) कर्ज देण्याच्या मल्टिपल बँकिंग/सिंडिकेशन/कॉनसॉर्टियम खाली एकापेक्षा जास्त बँक/एफआयकडून कर्जदारांनी कर्ज सुविधा घेतल्या असाव्यात.

(ब) एकूण आऊटस्टँडिंग एक्सपोझर (निधी आधारित असलेले व निधी आधारित नसलेले) रु.10 कोटी व त्यापेक्षा अधिक असल्यास

देशामधील सीडीआर प्रणाली तीन टायर रचनेची असेल –

- सीडीआर स्थायी मंच व त्याचा कोअर गट
- सीडीआर एम्पॉवर्ड गट
- सीडीआर कक्ष.

**(2) सीडीआर स्थायी मंच**

(2.1) सीडीआर स्थायी मंच ही, सीडीआर प्रणालीत भाग घेणा-या सर्व वित्तीय संस्था व बँकांची प्रतिनिधिक सर्वसाधारण संस्था (बॉडी) असेल. सर्व बँका व वित्तीय संस्थांनी त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधांसाठी ह्या प्रणालीत भाग

घ्यावा. सीडीआर स्थायी मंच ही स्वयंअधिकार असलेली बॉडी असेल व ती धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करील व कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचनेच्या प्रगतीवर देखरेख ठेवील.

(2.2) सर्च संबंधितांच्या हितसंबंधात कर्ज पुनर्रचनेच्या योजना तयार करण्यासाठीची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे एकत्रितपणे व सलोख्याने तयार करण्यास, धनको तसेच कर्जदार ह्या दोघांच्याही साठी, हा मंच एक अधिकृत प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देईल.

(2.3) सीडीआर स्थायी मंचामध्ये समाविष्ट असलेल्या पुढीलप्रमाणे - अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया लि., अध्यक्ष, भारतीय स्टेट बँक, व्यवस्थापकीय संचालक व सीईओ, आयसीआयसीआय बँक लि; अध्यक्ष, इंडियन बँक्स असोशिएशन, तसेच ह्या प्रणालीमध्ये कायमस्वरुपी सभासद म्हणून सहभाग घेणारे, सर्व बँकांचे व वित्तीय संस्थांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक. युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, जनरल इंशुअरन्स कॉर्पोरेशन, लाईफ इंशुअरन्स कॉर्पोरेशन ह्यांचाही काही कर्जदारांबाबत एक्सपोझर्स आली असू शकत असल्याने, ह्या संस्थाही सीडीआर प्रणालीमध्ये भाग घेऊ शकतात. हा मंच त्याच्या अध्यक्षांची निवड एक वर्षासाठी करील व त्यानंरच्या वर्षांमध्ये फिरते तत्व (प्रिंसिपल ऑफ रोटेशन) अंगिकारिले जाईल. तथापि हा मंच, सीडीआर स्थायी मंचाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी संपूर्ण वेळ कार्यकारी अध्यक्ष ठेवण्याचा निर्णय घेऊ शकतो. सीडीआर स्थायी मंच व कोअर गटाचा आरबीआय हा सभासद असणार नाही. तिची भूमिका केवळ स्थूलमानाने मार्गदर्शक तत्त्वे देण्यापुरतीच सीमित असेल.

(2.4) सीडीआर स्थायी मंचाची सभा किमान सहा महिन्यातून एकदा असेल व त्यात कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचना प्रणालीचे पुनरावलोकन व प्रगतीवर देखरेख ठेवली जाईल. त्याचप्रमाणे हा मंच, सीडीआर अधिकारी गटाने अनुसरण करावयाच्या, पुनर्रचनेसाठीच्या महत्त्वाच्या पॅरामीटर्स संबंधित, आणि सीडीआर कक्षाने अनुसरण करावयाच्या कर्ज पुनर्रचनेसाठी संबंधित धोरणे व मार्गदर्शक तत्त्वांसह (उदा. एखाद्या पुनर्रचना पॅकेजखाली एखाद्या एककासाठी सफलताक्षम होण्याचा कमाल कालावधी, प्रायोजकांच्या त्यागाचा किमान स्तर इत्यादि) धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे तयार करील. आणि कर्ज पुनर्रचनेसाठी त्यांचे कार्य सुरळीतपणे चालण्याबाबत व विहित केलेल्या वेळापत्रकाचे अनुसरण केले जात असल्याची खात्री करुन घेईल. त्याचप्रमाणे सीडीआर अधिकारी (एम्पॉवर्ड) गट व सीडीआर कक्ष ह्यांचे वैय्यक्तिक निर्णयांचे पुनरावलोकनही हा मंच करु शकतो. त्याचप्रमाणे हा सीडीआर स्थायी मंच, किचकट व प्रक्रियेसाठी विहित केलेल्या कालावधीपेक्षाही जास्त विलंब होऊ शकणा-या प्रकरणांमध्ये विशेष वागणुक देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करु शकतो.

(2.5) सभा आमंत्रित करण्यासाठी व त्याच्या वतीने धोरणविषयक निर्णय घेण्यास, स्थायी मंचाला मदत करण्यासाठी, सीडीआर स्थायी मंचामधूनच एक सीडीआर कोअर गट तयार केला जाईल. ह्या कोअर गटामध्ये, इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया लि., भारतीय स्टेट बँक, आयसीआयसीआय बँक लि., बँक ऑफ बरोडा, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, इंडियन बँक्स असोशिएशन ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व भारतातील विदेशी बँकांचे प्रतिनिधी म्हणून इंडियन बँक्स असोशिएनशनचे उपाध्यक्ष असतील.

(2.6) हा सीडीआर कोअर गट, सीडीआर एम्पॉवर्ड गट व सीडीआर कक्ष ह्यांनी कर्ज पुनर्रचनेसाठी अनुसरावयाची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे तयार करील. ही मार्गदर्शक तत्त्वे, सीडीआर एम्पॉवर्ड गटाच्या कार्यवाहीमध्ये येणा-या कार्यकारी अडचणी सुयोग्यपणे सोडविण्यास उपयोगी असतील. त्याचप्रमाणे हा सीडीआर गट, सीडीआर प्रणालीकडे संदर्भित केलेल्या प्रकरणांवर प्रक्रिया करण्यासाठीचा पर्ट चार्टही विहित करील व कालावधी जारी करण्याबाबतचे बदल ठरवील. त्याचप्रमाणे हा सीडीआर कोअर गट, विशेषतः क्षमता वापर, उत्पादांची किंमत, नफा-मार्जिन, मागणी, कच्च्या मालाची उपलब्धता, इनपुट-आऊटपुट गुणोत्तर व आयात/आंतरराष्ट्रीय मूल्य स्पर्धा ह्यांचा संभाव्य आघात ह्यासंबंधाने पुनर्रचना प्रस्ताव तयार/मंजुर करतेवेळी अति आशादायक प्रक्षेपणे गृहीत धरली जाणार नाहीत ह्याची खात्री करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करील.

**(3) सीडीआर एम्पॉवर्ड गट**

(3.1) कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचनेची वैय्यक्तिक प्रकरणे सीडीआर एम्पॉवर्ड गटाकडून ठरविली जातील व ह्या गटात, संबंधित कंपनीबाबत एक्सपोझर असलेल्या बँका व वित्तीय कंपन्यांच्या ईडीस्तरीय प्रतिनिधींसह, इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया लि., आयसीआयसीआय बँक लि. आणि भारतीय स्टेट बँक ह्यांचे ईडीस्तरीय प्रतिनिधी हे स्थायी सभासद म्हणून असतील. ह्या गटाच्या सभा चालविण्यास स्थायी सभासद मदत करत असले तरी मतप्रदान हे केवळ धनकोंच्या एक्सपोझर्सच्या प्रमाणानुसारच असेल. सीडीआर एम्पॉवर्ड गट परिणामकारक व रुंद पायाचा करण्यासाठी व त्याचे कार्य सुरळीतपणे व सक्षमतेने होण्यासाठी खात्री करुन घ्यावी लागेल की, सीडीआर एम्पॉवर्ड गटात त्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सहभागी संस्था/बँका ह्यांनी वरिष्ठ अधिका-यांचे एक पॅनल तयार केले आहे आणि सीडीआर एम्पॉवर्ड गटाच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी केवळ ह्या पॅनलमधील उप-अधिकारीच पाठविले जात आहेत. ह्याशिवाय, एका खात्याबाबत सभेत हजर राहणा-या नामनिर्देशितांनी, त्यांचे प्रतिनिधी पाठविण्याऐवजी, त्या खात्यासंबंधीच्या सर्व सभांना हजर रहावे.

(3.2) संबंधित बँक/एफआय, कर्ज-पुनर्रचेनेसाठी केलेल्या त्यागासह आवश्यक असलेल्या दायित्वे पाळत/ठेवत आहे ह्याची खात्री करण्यासाठी, सीडीआर एम्पॉवर्ड गटावरील बँका/वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधित्वाचा स्तर पुरेशा वरिष्ठ स्तरावर असावा. वैय्यक्तिक कॉर्पोरेट्सच्या कर्जांच्या पुनर्रचनेसंबंधाने, त्यांच्या संस्थांच्या वतीने निर्णय घेण्यास त्यांना प्राधिकृत करण्यासाठी, सहभागी असलेल्या संस्था/बँकांच्या संबंधित संचालक मंडळांकडून सीडीआर एम्पॉवर्ड गटावरील त्यांच्या प्रतिनिधींच्या बाजूने/हितसंबंधात सर्वसाधारण प्राधिकृतीकरण दिले गेले असावे.

(3.3) सीडीआर एम्पॉवर्ड गट, त्याला सीडीआर कक्षाने सादर केलेल्या पुनर्रचनेच्या विनंतीच्या सर्व प्रकरणांचा प्राथमिक रिपोर्ट विचारात घेईल. त्या कंपनीची पुनर्रचना दर्शनीदृष्ट्या सुसाध्य/शक्य असून स्थायी मंचाने ठरविलेल्या धोरणानुसार व मार्गदर्शक तत्वांनुसार ती संस्था/उद्योग संभाव्यतः सफलताक्षम असल्याचे एम्पॉवर्ड गटाने ठरविल्यानंतर, लीड (पुढारी) संस्थेबरोबर सीडीआर कक्ष, सविस्तर पुनर्रचना पॅकेज तयार करील. तथापि, लीड संस्थेला तपशीलवार पुनर्रचना पॅकेज तयार करण्यात अडचणी आल्यास, सहभागी बँका/वित्तीय संस्थांनी, सीडीआर कक्षाचा प्राथमिक रिपोर्ट विचारासाठी येतो. त्या एम्पॉवर्ड गटाच्या पहिल्या सभेत, तपशीलवार पुनर्रचना पॅकेज करणारी पर्यायी बँक/वित्तीय संस्था निश्चित करावी.

(3.4) सीडीआर एम्पॉवर्ड गटासाठी, कर्ज पुनर्रचनेच्या प्रत्येक प्रकरणात लक्ष घालणे, त्या कंपनीची सफलताक्षमता व पुनर् जीवन संभाव्यता ह्यांचे परीक्षण करणे, आणि 90 दिवसांच्या कालावधीत किंवा एम्पॉवर्ड गटाकडे प्रकरण संदर्भित केल्यापासून 180 दिवसांच्या आत, पुनर्रचेनेचे पॅकेज मंजुर करणे ह्या गोष्टी अपरिहार्य/सक्तीच्या असतील. सीडीआर एम्पॉवर्ड गट, उदाहरणादाखल दिलेल्या पुढील पॅरामीटर्सवरील स्वीकार्य असलेल्या सफलताक्षमतेच्या बेंचमार्कबाबत निर्णय घेईल. आणि हे पॅरामीटर्स, प्रकरणनिहाय प्रत्येक प्रकरणाच्या गुणविशेषानुसार लागु केले जातील.

- गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा (आरओसीई)
- डेट मार्जिन कव्हरेज रेशो (डीएससीआर)
- परताव्याचा अंतर्गत दर (आयआरआर) व निधीचा खर्च (सीओएफ) ह्यामधील फरक/तफावत.
- त्यागाची व्याप्ती

(3.5) प्रत्येक बँक/वित्तीय संस्थेच्या संचालक मंडळाने तिच्या मुख्य कार्यकारी अधिका-याला (सीईओ) आणि/किंवा कार्यकारी संचालकाला (ईडी), नियंत्रणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठीच्या आवश्यकतांसह, सीडीआर प्रणालीकडे संदर्भित केलेल्या प्रकरणांच्या बाबतीत पुनर्रचना पॅकेज ठरविण्यासाठी प्राधिकृत करावे. प्रत्येक कर्ज कर्ज खात्याच्या बाबतीत, सीडीआर एम्पॉवर्ड गट दोन किंवा तीन वेळा सभा घेईल. जेथे पुनर्रचनेचे महत्त्वाचे पॅरामीटर्स, त्याला/तिला देण्यात आलेल्या अधिकाराच्या पलिकडे आहेत अशा प्रकरणांच्या बाबतीत, गरज पडल्यास, सहभागी सभासदांना त्यांच्या सीईओ/ईडीकडून सुयोग्य अधिकार/प्राधिकृतता मिळविण्याची संधी ह्यामुळे उपलब्ध होईल.

(3.6) सीडीआर एम्पॉवर्ड गटाचे निर्णय हे अंतिम निर्णय असतील. कर्जांची पुनर्रचना ही सफलताक्षम व शक्य असल्याचे एम्पॉवर्ड गटाला आढळून आल्यास व त्याबाबत त्याने मंजुरी दिल्यास ती कंपनी पुनर्रचना प्रकारात ठेवली/घेतली जाईल. पुनर्रचना सफलताक्षम नसल्याचे आढळून आल्यास, धनको, येणे रकमेची वसुली करण्यास आणि/किंवा त्या कंपनीचे द्रवीकरण करण्यास किंवा गुंडाळण्यास वैय्यक्तिकपणे किंवा एकत्रितपणे करण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचलण्यास मुक्त आहेत.

**(4) सीडीआर कक्ष**

(4.1) सीडीआर स्थायी मंच व सीडीआर एम्पॉवर्ड गट ह्यांना, त्यांच्या सर्व कार्यांमध्ये सीडीआर कक्ष मदत करील. हा सीडीआर कक्ष, प्रायोजित पुनरुज्जीवन योजना व इतर माहिती मागवून, कर्जदार/धनकोंकडून मिळालेल्या प्रस्तावांची छाननी करील व पुनरुज्जीवन करणे शक्य आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी, ते प्रकरण एका महिन्याच्या आत सीडीआर एम्पॉवर्ड गटासमोर सादर करील. ते शक्य असल्यास सीडीआर कक्ष, धनकोंच्या आणि तशी आवश्यकता वाटल्यास बाहेरील तज्ञांच्या मदतीने सविस्तर पुनरुज्जीवन योजना तयार करील. प्रथम दर्शनी शक्य दिसून न आल्यास धनको त्यांची येणी वसुल करण्याची कारवाई सुरु करु शकतात.

(4.2) धनको किंवा कर्जदार कॉर्पोरेट कर्जाच्या पुनर्रचनेसाठी सीडीआर कक्षाकडेच जातील. इतर स्टेकहोल्डर्सबरोबर सल्लामसलत करुन, एक प्राथमिक पुनर्रचना योजना तयार करुन ती योजना एक महिन्याच्या आत सीडीआर कक्षाला सादर करण्याची, कॉर्पोरेट संस्थांबाबतची जबाबदारी, लीड संस्था/मुख्य स्टेक होल्डर्सची असेल. सीडीआर कक्ष, सीडीआर

स्थायी मंचाने मंजुर केलेली सर्वसाधारण धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे ह्यानुसार पुनर् रचना योजना तयार करुन, 30 दिवसांच्या आत, एम्पॉवर्ड गटाच्या विचारार्थ व निर्णयासाठी सादर करील. एम्पॉवर्ड गट, ती योजना मंजुर करु शकेल किंवा त्यात बदल करु शकेल. परंतु अंतिम निर्णय एकूण 90 दिवसांच्या आत घेतला जाण्याची खात्री करुन घेईल. तथापि, पुरेशा कारणांसाठी हा कालावधी, सीडीआर कक्षाकडे प्रकरण संदर्भित केल्याच्या तारखेपासून 180 दिवसापर्यंत वाढविला जाऊ शकतो.

(4.3) सध्या, सीडीआर स्थायी मंच, सीडीआर एम्पॉवर्ड गट व सीडीआर कक्ष हे, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया लि. येथेच आहेत. तथापि, स्थायी मंचाला आवश्यक वाटल्यास व ठरविल्यास ते दुस-या ठिकाणी हलविले जाऊ शकतात. प्रशासकीय व इतर खर्च, वित्तीय संस्था व बँकांद्वारे शेअर केला जाईल. ही शेअर करण्याची रीत स्थायी मंच ठरविल्यानुसार असेल.

(4.4) सीडीआर कक्षामध्ये बँका व वित्तीय संस्थाकडून पाठविण्यात आलेले पुरेसे कर्मचारी असतील. हा सीडीआर कक्ष बाहेरील व्यावसायिक सहाय्य घेऊ शकतो. सीडीआर कक्षासह सीडीआर यंत्रणा चालविण्यासाठीचा खर्च, कोअर गटामधील वित्तीय संस्था व बँका ह्यांच्या प्रत्येकी रु.50 लाख दराने व इतर संस्था व बँका ह्यांच्या प्रत्येकी रु.5 लाख वर्गणीमधून भागविला जाईल.

**(5) इतर लक्षणे**

**(5.1) पात्रता निकष**

(5.1.1) ही योजना केवळ एक वित्तीय संस्था किंवा केवळ एक बँकेबाबतच्या खात्यांना लागु असणार नाही. बँका व वित्तीय संस्थांना रु.10 कोटी व त्यापेक्षा अधिक असे आऊटस्टँडिंग निधी आधारित असलेले व निधी आधारित नसलेले एक्सपोझर असलेल्या कोणत्याही प्रकारची कार्यकृती करत असलेल्या कॉर्पोरेट कर्जदारांच्या बहुविध/अनेक बँकिंग खाती/सिंडिकेशन/कॉनसॉर्टियम खाती ह्या सीडीआर यंत्रणेखाली येतील.

(5.1.2) वर्ग 1 सीडीआर प्रणाली, केवळ ‘स्टँडर्ड’ व ‘सबस्टँडर्ड’ म्हणून वर्गीकृत केलेल्या खात्यांना लागु असेल. अशीही परिस्थिती असू शकते की जेथे एखाद्या बँकेकडून कर्जाचा एक छोटा भाग शंकास्पद म्हणून वर्गीकृत करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत, किमान 90% धनकोंच्या पुस्तकात (मूल्यानुसार) ते खाते, ‘स्टँडर्ड’/’सबस्टँडर्ड’ म्हणून वर्गीकृत केले गेले असल्यास, उर्वरित 10% धनकोंच्या पुस्तकात, सीडीआरसाठी पात्र असल्याचे ठरविण्यासाठी, ते खाते स्टँडर्ड/सबस्टँडर्ड म्हणून वर्गीकृत केले जाईल. सीडीआर प्रणालीकडे संदर्भित करण्यापूर्वी ते खाते/कंपनी आजारी, एनपीए किंवा विहित कालावधीसाठी कसुरी करणारे असण्याची आवश्यकता नसेल. तथापि, एनपीएच्या संभाव्यतः सफलताक्षम असलेल्या प्रकरणांना प्राधान्य दिले जाईल. ह्या दृष्टिकोनामुळे आवश्यक ती लवचिकता उपलब्ध होईल व कर्ज पुनर्रचनेसाठी वेळेवारी हस्तक्षेप केला जाऊ शकेल. ह्यासाठी कोणतेही मैलाचे दगड विहित करण्याची आवश्यकता नसेल कारण ही प्रक्रिया बँका व वित्तीय संस्थांनी किंवा त्यांच्या संमतीने सुरु केली जात असते.

(5.1.3) केवळ एकाच बँकेमध्ये लबाडी व फसवणुक करणा-या कॉर्पोरेट संस्था सीडीआर यंत्रणेखाली पुनर्रचना केली जाण्यास पूर्वीप्रमाणेच अपात्र असल्या तरी, जेथे कर्जदाराचे हेतुतः कसुरी करणारा म्हणून विशेषतः जुन्या प्रकरणांमध्ये

केलेल्या वर्गीकरणाची रीत पारदर्शक नव्हती. अशा कर्जदार-वर्गीकरणासाठीच्या तारणांचे पुनरावलोकन कोअर गट करु शकतो आणि सीडीआर यंत्रणेखाली कर्जदाराला एक संधी दिल्यास तो ती कसुरी दुरुस्त करु शकतो. ह्याबाबत कोअर गट स्वतःचे समाधान करुन घेऊ शकतो. अशी अपवादात्मक प्रकरणे केवळ कोअर गटाच्या मंजुरीनेच पुनर्रचनेसाठी स्वीकारली जावीत. कोअर गटाने खात्री करुन घ्यावी की, फसवणुकी व अप्रामाणिक हेतूने निधी अन्यत्र वळविण्याची प्रकरणे समाविष्ट केली जाणार नाहीत.

(5.1.4) कंपनीच्या विरोधात धनकोंनी वसुलीचे खटले/दावे दाखल केले आहेत. अशी खाती, सीडीआर यंत्रणेखाली विचारात घेतली जाण्यासाठी पात्र असू शकतात - मात्र, सीडीआर यंत्रणेखाली ते प्रकरण सोडविले जाण्याचा पुढाकार 75% (मूल्याने) धनकोंनी व 60% (संख्येने) धनकोंनी घेतला असला पाहिजे.

(5.1.5) बीआयएफआर प्रकरणे सीडीआर प्रणालीखाली पुनर्रचना केली जाण्यास पात्र नाहीत. केवळ सीडीआर कोअर गटाने खास शिफारस केल्यासच, मोठ्या मूल्याची बीआयएफआर प्रकरणे सीडीआर प्रणालीखाली पुनर्रचनेसाठी पात्र ठरु शकतात. सीडीआर प्रणालीखाली विचारात घेतली जाण्यासाठी, प्रत्येक प्रकरणानुसार, कोअर गट, अपवादात्मक बीआयएफआर प्रकरणांची शिफारस करील. अशा पॅकेजची अंमलबजावणी करण्यापूर्वी, बीआयएफआरची मंजुरी घेण्यासाठीचे सर्व शिष्टाचार पूर्ण केले असल्याची खात्री कर्ज देणा-या संस्थांनी करुन घ्यावी.

**(5.2) सीडीआर प्रणालीशी संदर्भ**

(5.2.1) कॉर्पोरेट डेट रिस्ट्रक्चरिंग सिस्टिमकडे संदर्भित करण्याचे कार्य पुढीलद्वारे केले जाऊ शकते - (1) कार्यकारी भांडवल किंवा मुदत वित्त (टर्म फायनान्स) ह्यामध्ये किमान 20% भाग असलेला एक किंवा अधिक धनको किंवा (2) वरील (1) मध्ये दिल्यानुसार स्टेक असलेल्या बँकेने किंवा वित्तीय संस्थेने पाठिंबा दिला असल्यास संबंधित कॉर्पोरेट द्वारा.

(5.2.2) सीडीआर प्रणालीच्या बाहेर धनको पुनर्रचना करण्याचा विचार करु शकतील किंवा आवश्यक तेथे कायदेशीर कारवाई सुरु करु शकतील. अशी लवचिकता उपलब्ध असली तरीही, बँकांनी/एफआयनी, जेथे वित्तीय प्रणालीचे एक्सपोझर रु.100 कोटींपेक्षा अधिक आहे अशा सर्व पात्र प्रकरणांचा आढावा घ्यावा आणि ते प्रकरण सीडीआर प्रणालीकडे संदर्भित करण्याचा विचार करावा किंवा नव्या, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटीज इंटरेस्ट अधिनियम 2002 खाली पुढील कारवाई करावी किंवा डीआयटी इत्यादींमध्ये दावा दाखल करावा.

**(5.3) कायदेशीर पाया**

(5.3.1) सीडीआर ही एक अ-वैधानिक यंत्रणा असून ती, ऋणको-धनको करार (डीसीए) व आंतर-धनको करार (आयसीए) ह्यावर आधारित एक ऐच्छिक प्रणाली आहे. ऋणको-धनको करार (डीसीए) व आंतर-धनको करार (आयसीए) हे सीडीआर यंत्रणेला कायदेशीर पाया देतील. मूळ कर्ज कागदपत्र करतेवेळी (भविष्यातील प्रकरणांसाठी) किंवा कॉर्पोरेट कर्ज पुनर्रचना कक्षाकडे संदर्भित करतेवेळी धनकोंना डीसीएशी सहमत व्हावे लागेल. त्याचप्रमाणे, सीडीआर यंत्रणेतील सर्व सहभागींना, त्यांच्या स्थायी मंचाच्या सभासदत्वामार्फत, ठरविण्यात आलेल्या धोरणांनुसार व

मार्गदर्शक तत्वांनुसार ही प्रणाली कार्यकारी करण्यासाठी, आवश्यक त्या अंमलबजावणी व दंडात्मक खंडासह कायद्याने बंधनकारक करार करणे आवश्यक असेल. धनकोंनी सही केलेला आयसीए सुरुवातीला 3 वर्षांसाठी वैध असेल व त्यानंतर आणखी 3 वर्षांसाठी त्याचे नूतनीकरण करता येईल. विदेशी मुद्रेत कर्ज देणारे देशाबाहेरील धनको हे सीडीआर प्रणालीचा एक भाग नाहीत. असे धनको, तसेच सीडीआर प्रणालीत स्थगित नसलेले, जीआयसी, एलआयसी, युटीआय ह्यासारखे धनको, व्यवहार ते व्यवहार आयसीएवर सही करुन, अशा कॉर्पोरेटबाबत एक्सपोझर असल्यास, एखद्या विशिष्ट कॉर्पोरेटच्या सीडीआर यंत्रणेत सामील होऊ शकतात.

(5.3.2) आवश्यक त्या अंमलबजावणी व दंडात्मक खंड असलेला आंतर धनको करारनामा सर्व धनकोंसाठी बंधनकारक असेल. व त्यात, सीडीआर प्रणालीच्या निरनिराळ्या अटी/पैलूंचे अनुसरण करण्याचे वचन धनको देतील. ह्याशिवाय, धनको सहमती देतील की, मूल्यानुसार 75% धनको व संख्येनुसार 60% धनको, एखाद्या विद्यमान कर्जाचे (म्हणजे थकित कर्ज) एक पुनर्रचना पॅकेज तयार करण्यास राजी असल्यास, ते उर्वरित धनकोंसाठीही बंधनकारक असेल. वर्ग 1 सीडीआर योजनेमध्ये केवळ स्टँडर्ड व सबस्टँडर्ड खात्यांचा समावेश असल्याने व ही खाती मूल्यानुसार 75% व संख्येने 60% धनकोंच्या मते, सीडीआर पॅकेज दिल्यानंतर कार्यकारी होण्याची संभाव्यता असल्याने, असे अपेक्षित आहे की, इतर धनको (मूल्याने किमान 75% व संख्येने किमान 60% धनकोंच्या बाहेरील) संमत असलेल्या अतिरिक्त वित्त सहाय्यासह संपूर्ण सीडीआर पॅकेजमध्ये भाग घेण्यास इच्छुक असतील.

(5.3.3) सीडीआर यंत्रणेची परिणामकारकता सुधारण्यासाठी, पुनर्रचना करणे आवश्यक असेल. त्या-त्या वेळी, सीडीआर यंत्रणेखाली मंजुर होणा-या/होऊ शकणा-या पुनर्रचना पॅकेजच्या अटींचे पालन करण्यास, सीडीआर यंत्रणेचे सभासद नसलेल्यांसह सर्व धनको राजी असतील. असा एक खंड, कॉन्सॉर्टियम/सिंडिकेट खात्यांसंबंधित कर्ज करारांमध्ये टाकण्यात यावा.

(5.3.4) धनको-ऋणको करारामधील एक सर्वात महत्त्वाचा मुद्दा/बाब, दोन्हीही पक्षांना 90 दिवसांसाठी किंवा 180 दिवसांसाठी बंधनकारक असलेला 'स्टँड स्टिल' करार ही असेल. ह्या खंडाखाली, ऋणको व धनको हे दोघेही सहमती देतील की, ह्या 'स्टँड स्टिल' कालावधीत हे दोन्हीही पक्ष अन्य कोणत्याही कायदेशीर कारवाईचा आश्रय घेणार नाहीत व कायदेशीर रितीने बंधनकारक असलेल्या 'स्टँड स्टिल' साठी राजी असतील. बाहेरील कायदेशीर किंवा अन्य प्रकारच्या हस्तक्षेपाशिवाय, आवश्यक ती कर्ज-पुनर्रचना करण्यासाठी सीडीआर प्रणालीला मदत होण्यासाठी हे आवश्यक असेल. तथापि, हा स्टँड स्टिल खंड केवळ एखाद्या कर्जदाराकडून किंवा धनकोकडून दुस-या पक्षावर केलेल्या दिवाणी कारवाईलाच लागु असेल. त्यात फौजदारी कारवाई समाविष्ट नसेल. ह्याशिवाय, स्टँड स्टिल कालावधीत, आऊटस्टँडिंग विदेशी मुद्रा फॉरवर्ड कॉंट्रॅक्ट्स, डेरिवेटीव उत्पाद प्रत्यक्षात येऊ शकतात (क्रिस्टलाईज्ड) - मात्र अशा कृतीसाठी कर्जदार राजी असला पाहिजे. ह्याशिवाय कर्जदार सहमती देईल की, स्टँड स्टिल कालावधीमध्ये, ते कागदपत्र मर्यादेच्या हेतूसाठीच लागु केले जातील (एक्सटेंडेड) आणि कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी तो (कर्जदार) कोणत्याही अन्य प्राधिकरणाकडे जाणार नाही व कर्जदार कंपनीचे संचालक, स्टँड स्टिल कालावधीत राजीनामा देणार नाहीत.

**(5.4) अतिरिक्त वित्ताचे शेअरिंग**

(5.4.1) अतिरिक्त वित्त असल्यास ते, ‘स्टँडर्ड’ किंवा ‘सबस्टँडर्ड’ खात्याच्या सर्व धनकोंनी -मग ते कार्यकारी भांडवल धनको असोत की मुदत धनको असोत - दरानुसार/प्रमाणानुसार उपलब्ध करावयाचे आहे. एखाद्या अंतर्गत कारणामुळे एखादा धनको (किमान 75% व 60% च्या बाहेरील) अतिरिक्त वित्त देण्यास इच्छुक नसल्यास, त्या धनकोला परिच्छेद 5.6 मधील तरतुदीनुसार पर्याय उपलब्ध असेल.

(5.4.2) अतिरिक्त वित्त उपलब्ध करुन देणारांना, मग ते विद्यमान धनको असोत किंवा नवीन धनको असोत - एक पसंतीनुसार (प्रिफरेंशियल) हक्क असेल व तो हक्क त्या पुनर्रचना पॅकेजखालील, अतिरिक्त एक्सपोझरच्या बाबतीत, वसुलीजन्य कॅश फ्लोजच्या संबंधात विद्यमान वित्त देणा-यांमधून गणन करावयाचा आहे.

**(5) निर्गमन पर्याय**

परिच्छेद 5.5.1 मध्ये दिल्यानुसार, कोणत्याही अंतर्गत कारणाने अतिरिक्त वित्त देण्यास इच्छुक नसलेल्या धनकोला (किमान 75% व 60% च्या बाहेरील) एक पर्याय उपलब्ध असेल. त्याच वेळी, ‘फ्री रायडर’ समस्या टाळण्यासाठी, असा पर्याय घेण्यास इच्छुक असलेल्या धनकोंसाठी काही अनुतेजक (डिसइन्सेंटिव) देणे आवश्यक ठरते. असे धनको, (अ) त्याचा अतिरिक्त वित्ताचा वाटा एखाद्या नव्या किंवा विद्यमान धनकोंकडून मिळविण्याची व्यवस्था करु शकतात किंवा (ब) सीडीआर पॅकेज परिणामकारक झाल्यानंतर त्याला मिळणारे पहिल्या वर्षाचे व्याज स्थिगित करण्यास राजी होऊ शकतात. वर निर्देशिलेले पहिल्या वर्षाचे स्थगित व्याज, चक्रवाढ न केले जाता, धनकोला येणे असलेल्या मुद्दलाच्या शेवटच्या हप्त्याबरोबर प्रदान केले जाईल.

(5.5.2) ह्याशिवाय, किमान 75% व 60% मधील सर्व धनकोंना निर्गमन पर्यायही उपलब्ध असेल - मात्र त्यासाठी, एम्पॉवर्ड गटाने मंजुर केलेल्या पुनर्रचना पॅकेजचे अनुपालन करण्यासाठी खरेदीदार राजी असला पाहिजे. विद्यमान धनकोंना, त्यांच्या कर्जदारांबाबतच्या एक्सपोझर्सच्या विद्यमान स्तरासह राहण्यास परवानगी दिली जाऊ शकते - मात्र त्यासाठी, अतिरिक्त वित्ताचा त्यांचा शेअर घेणा-या विद्यमान किंवा नवीन धनकोंशी त्यांची जोडणी (टायअप) केली असली पाहिजे.

(5.5.3) ह्या पॅकेजमधून बाहेर पडू इच्छिणा-या धनकोंना त्यांचा विद्यमान वाटा/शेअर, विद्यमान किंवा नवीन धनकोंना, सुयोग्य किंमतीने विकण्याचा पर्याय उपलब्ध आहे व ही सुयोग्य किंमत विद्यमान धनको व ताबा घेणारा धनको ह्या दोघांनीही मिळून ठरवावयाची आहे. विद्यमान धनकोंना असलेले येण्याचा ताबा/टेक ओव्हर/घेतला असल्याने, व नवीन धनको परतफेड व सर्व्हिसिंगसाठी विद्यमान धनकोंच्या समान/स्तरावर असतील.

(5.5.4) निर्गमन पर्यायामध्ये अधिक लवचिकता आणण्यासाठी, पुनर्रचना पॅकेजचा एक भाग म्हणून, आवश्यक तेथे, एकाच वेळी तडजोड विचारात घेण्यात यावी. सीडीआर यंत्रणेकडे संदर्भित करण्यापूर्वी, एखाद्या धनकोकडील खात्याची, एखाद्या कर्जदाराने एका वेळीच तडजोड (ओटीएस) केल्यास, अशा ओटीएसखाली पूर्ण केलेली दायित्वे, पुनर्रचित पॅकेजमध्ये रिव्हर्स (उलट) केली जाऊ नयेत. अशा ओटीएस मुळे निर्माण झालेल्या पुढील प्रदान दायित्वांचे, त्या पुनर्रचना पॅकेजमध्ये फॅक्टरिंग केले जावे.

(5.6) **वर्ग 2 सीडीआर प्रणाली**

(5.6.1) असे प्रसंग घडले आहेत की जेथे, धनकोंना, प्रकल्प सफलताक्षम असल्याचे आढळून आले आहे, परंतु 'शंकास्पद' वर्गात टाकण्यात आली असल्याने ती खाती सीडीआर प्रणालीखाली पुनर्रचनेसाठी घेण्यात येऊ शकली नाहीत. ह्यासाठी, धनकोंच्या पुस्तकात खाली 'शंकास्पद' म्हणून दाखविण्यात आली असल्यास, व किमान 75% धनको (मूल्याने) व 60% धनको (संख्येने) ह्यांनी त्या खात्याच्या सफलताक्षमतेबाबत स्वतःचे समाधान करुन घेतले असल्यास व पुढील अटींवर अशा पुनर्रचनेला सहमती दिल्यास अशा प्रकरणांसाठी सीडीआरचा एक दुसरा वर्ग सुरु करण्यात/ठेवण्यात आला आहे.

(1) कर्ज पुनर्रचना पॅकेजखाली गणन केलेले अतिरिक्त वित्त देणे धनकोंसाठी बंधनकारक नसेल आणि कर्ज देणे किंवा न देण्याचा निर्णय देणे हे प्रत्येक धनको बँक/एफआय साठी वेगवेगळे असेल. दुस-या शब्दात, सीडीआर यंत्रणेच्या प्रस्तावित दुस-या वर्गाखाली, केवळ विद्यमान कर्जेच पुनर् रचित केली जातील, आणि व्यक्तिशः नवीन किंवा विद्यमान धनकोंकडून अतिरिक्त वित्त व्यवस्था करण्याची जबाबदारी प्रायोजकाची असेल.

(2) स्टँड स्टिल खंड, सीडीआर खाली पुनर्रचना प्रलंबित असतेवेळीचा ॲसेट वर्गीकरण दर्जा ह्यासारखे, सीडीआर यंत्रणेखालील नॉर्म्स ह्या वर्गालाही लागु असणे सुरुच राहील.

(5.6.2) कोणतेही प्रकरण वैय्यक्तिक रितीने आरबीआयकडे संदर्भित केले जाणार नाही. एखादे विशिष्ट प्रकरण, सीडीआरच्या मार्गदर्शक तत्वांखाली येते की नाही ह्याचा अंतिम निर्णय सीडीआर कोअर गट घेऊ शकतो.

(5.6.3) प्रथम वर्गाला लागु होत असणारी सीडीआर प्रणालीची इतर सर्व लक्षणे, दुस-या वर्गाखाली पुनर्रचित प्रकरणांनाही लागु असतील.

(5.7) **'भरपाई करण्याचा हक्क' खंड समाविष्ट/सामील करणे**

सीडीआरने मंजुर केलेल्या सर्व पॅकेजेसमध्ये, परतफेड लवकर/जलद करण्याचा धनकोंचा हक्क व कर्जदारांना मुदतपूर्व परतफेड करण्याचा हक्क समाविष्ट असलाच पाहिजे. सर्व पुनर्रचना पॅकेजेसमध्ये, 'भरपाई देण्याचा/करण्याचा हक्क' समाविष्ट केला गेलाच पाहिजे आणि तो कर्जदाराच्या विशिष्ट कामगिरीवर आधारित असावा. कोणत्याही परिस्थितीत, धनकोंनी भरपाईची 75% रक्कम वसुल केली पाहिजे व जेथे, पुनर्रचनेखाली काही सुविधा बेस रेट च्याही खाली देण्यात आली असेल तेथे भरपाईची 100% रक्कम वसुल केली जावी.

**(ब) एसएमई कर्ज पुनर्रचना यंत्रणा**

सीडीआर यंत्रणेव्यतिरिक्त, लघु व मध्यम उद्योगांना (एसएमई) घेतलेल्या कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी एक नवीन सुलभ यंत्रणा अस्तित्वात आहे. सीडीआर यंत्रणेत असल्यानुसारच्या विरुध्द, ह्या यंत्रणेचे कार्यकारी नियम ठरविणे हे संबंधित बँकांनाच सोपविण्यात आले आहे. बहुविध (मल्टिपल) कॉन्सॉर्टियम बँकिंग व्यवस्थेखाली रु.10 कोटी पर्यंत निधीयुक्त व निधीयुक्त नसलेल्या सर्व कर्जदारांना ही यंत्रणा लागु असेल. ह्या यंत्रणेमध्ये महत्वाचे पैलु/भाग पुढीलप्रमाणे आहेत :-

(1) ह्या यंत्रणेखाली, बँका, त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने, आरबीआयने ठरविलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्स साठी राहून, एसएमईंसाठी एक कर्ज पुनर्रचना योजना तयार करु शकतात. बँकांना तसे वाटाल्यास त्या, एसएमईमधील निरनिराळ्या क्षेत्रातील कर्जदारांसाठी निरनिराळे धोरणे तयार करु शकतात.

(2) ही योजना तयार करतेवेळी, ती योजना समजण्यास सोपी व किमानपक्षी, ह्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेली मार्गदर्शक तत्त्वे असलेली आहे ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी.

(3) ह्या योजनेचा मुख्य पाया/आधार असा आहे की, कमाल आऊटस्टँडिंग असलेल्या बँकेने, कमाल वाटचाल दुस-या क्रमांक असलेल्या बँकेबरोबर पुनर्रचनेचे पॅकेज तयार करावे.

(4) बँकांनी पुनर्रचना पॅकेज तयार करावे व त्याची अंमलबजावणी, विनंत्या प्राप्त झाल्याच्या तारखेपासून कमाल 90 दिवसांच्या आत करावी.

(5) ही एसएमई कर्ज पुनर्रचना योजना कोणतीही कार्यकृती करणा-या सर्व कर्जदारांना उपलब्ध असेल.

(6) एसएमई खात्यांची पुनर्रचना व पुनरुज्जीवन ह्यामधील प्रगतीचे बँकांनी तिमाही धर्तीवर पुनरावलोकन करावे आणि संचालक मंडळाला त्याबाबत कळवावे.

**परिशिष्ट 4**

## पुनर्रचित खाती जाहीर करणे

| अनु.क्र. | पुनर्रचनाचा प्रकार | | सीडीआर यंत्रणा अंतर्गत | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मालमत्ता वर्गीकरण | | | | | | | | | | | | |
| | तपशील | | मानक | उप-मानक | संशयास्पद | तोटा | एकूण | | | | | | |
| 1 | आर्थिक वर्षाच्या 1 एप्रिल रोजी पुनर्रचित खाती (उघडण्याचे आकडे) * | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| 2 | वर्षामध्ये नवीन पुनर्रचना | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| 3 | वित्तीय वर्षात पुनर्गठित मानक श्रेणीसाठी श्रेणीसुधारणे | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| 4 | पुनर्गठित मानक ॲडव्हान्स जे वित्तीय वर्षाच्या शेवटी उच्च तरतूदी आणि / किंवा अतिरिक्त जोखीम वजन आकर्षित करण्यास थांबतात आणि म्हणूनच पुढील वित्तीय वर्षाच्या सुरूवातीस | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुनर्रचित मानक प्रगती म्हणून दर्शविण्याची आवश्यकता नाही. | | | | | | | | | | | | |
| 5 | वित्त वर्षात पुनर्रचित खात्यांचे डाउनग्रेडेशन | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| 6 | वित्तीय वर्षात पुनर्रचित खात्यांचे लेखन-ऑफ | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| 7 | वित्तीय वर्षाच्या 31 मार्च रोजी पुनर्रचित खाती (बंद आकडेवारी *) | कर्ज घेणाऱ्यांची संख्या | | | | | | | | | | | |
| | | थकबाकी रक्कम | | | | | | | | | | | |
| | | त्यावरील तरतूद | | | | | | | | | | | |
| * प्रमाणित पुनर्रचित प्रगतीची आकडेवारी वगळणे जे उच्च तरतूदीला आकर्षित करीत नाहीत | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

**परिशिष्ट 4**

**इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्योगांना दिलेल्या दीर्घ मुदतीच्या प्रकल्प कर्जांची लवचिक पुनर्रचना**

(1) इन्फ्रास्ट्रक्चर/कोअर उद्‌योगांना दिलेल्या दीर्घ मुदतीच्या - समजा 25 वर्षे - कर्जाची पुनर्रचना पुढीलप्रमाणे केली जाऊ शकते.

(1) प्रकल्पाची मूलभूत/प्राथमिक सफलताक्षमता ही, आवश्यक त्या सर्व वित्तीय आणि अवित्तीय पॅरामीटर्स व विशेषतः त्या कर्जाचे सर्व्हिसिंग करण्याची क्षमता व कर्जाच्या मुदतीत परतफेड करण्याची क्षमता दर्शविणारा इंटरेस्ट कव्हरेज रेशोचा (ईबीआयडीटीए/इंटरेस्ट पे आऊट) स्वीकार्य स्तर ह्यावर आधारित असेल.

(2) सर्वंकष ॲमॉर्टायझेशन (कर्ज फेडीची तरतुद करणे) कालावधीमध्ये केलेल्या प्रत्येक पुनर् वित्तीकरणाचे वेळी ज्याची मुदत ठरविता येईल अशा शेष/उर्वरित कर्जाच्या नियतकालिक पुनर् वित्तीकरणासह (कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण) त्या कर्जाबाबत जास्त/दीर्घ ॲमॉर्टायझेशन कालावधी (ॲमॉर्टायझेशन शेड्युल) - समजा 25 वर्षे (त्या प्रकल्पाच्या नेहमीच्या जीवन कालावधीत/प्रकल्पाच्या सवलतीच्या कालावधीत) - ठेवण्यास परवानगी देणे.

(3) ह्याचा अर्थ असा होईल की, त्या प्रकल्पाच्या सफलताक्षमतेचे मूल्यमापन करतेवेळी व जेथे ॲव्हरेज डेट सर्व्हिस कव्हरेज रेशो (डीएससीआर) व इतर वित्तीय व बिगरवित्तीय पॅरामीटर्स दीर्घतर ॲमॉर्टायझेशन कालावधीसाठी - समजा 25 वर्षे - (ॲमॉर्टायझेशन शेड्युल) स्वीकार्य आहेत, तेथे त्या एनबीएफसीला तो प्रकल्प सफलताक्षम प्रकल्प म्हणून स्वीकारण्याची परवानगी दिली जाईल, परंतु विद्‌यमान किंवा नवीन धनकोंनी परवानगी दिल्यानुसार, किंवा बाँड्सच्या द्‌वारेही, शेष/उर्वरित कर्जाच्या पुनर् वित्तीकरणासह (कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण), केवळ समजा 5 वर्षांसाठी - निधी सहाय्य (सुरुवातीची कर्ज सुविधा) देऊ शकते. आणि

(4) ह्या प्रत्येक 5 वर्षांनंतरच्या केलेले पुनर् वित्तीकरण (कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण) हे, मूळ ॲमोर्टायझेशन शेड्युलनुसार ठरविलेल्या कमी केलेल्या रकमांचे असेल.

(2) वरील परिच्छेद 1 मध्ये सुचविल्यानुसार, इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्‌योगांमधील नवीन दीर्घ कालीन प्रकल्पांना एनबीएफसी वित्त सहाय्य करु शकतात, मात्र त्यासाठी :-

> (1) केवळ आरबीआयच्या हार्मोनाइज्ड मास्टर लिस्ट ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर खाली व्याख्या केलेल्या, इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांना, व भारत सरकारच्या वाणिज्य व उद्‌योग मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या, इंडेक्स ऑफ एट कोअर इंडस्ट्रीज् (आधार 2004-05) मध्ये समाविष्ट असलेल्या कोअर उद्‌योग क्षेत्रातील प्रकल्प (उदा. कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायु, पेट्रोलियम रिफायनरी उत्पाद, खते, पोलाद (मिश्र व मिश्र नसलेले), सिमेंट व वीज - खते, वीज निर्माण, वितरण व पारेषण इत्यादी सारखी क्षेत्रेही हार्मोनाईज्ड मास्टर लिस्ट ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर सब-सेक्टर्समध्ये समाविष्ट आहेत) अशा पुनर् वित्तीकरणासाठी पात्र असतील.

(2) अशा प्रकल्पांच्या प्रथम/सुरुवातीच्या मूल्यमापनाचे वेळी, ताणतणावाच्या परिस्थितीतही अशा प्रकल्पांमधील कॅश फ्लोज् व आवश्यक ते वित्तीय व अवित्तीय पॅरामीटर्स दणकट असल्याची खात्री करुन घेत असताना, एनबीएफसी, एक ॲमॉर्टायझेशन शेड्युल (ओरिजिनल ॲमॉर्टायझेशन शेड्युल) निश्चित करु शकतात.

(3) सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल खालील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांबाबत ॲमॉर्टायझेशन शेड्युलची मुदत ही, सुरुवातीच्या सवलतीच्या कालावधीच्या 80% पेक्षा जास्त नसावी (20% मागे ठेवले जाणे) किंवा पीपीपी नसलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांबाबत युजर चार्जेस/टॅरिफ निश्चित करण्यासाठी, प्रकल्प मूल्यमापनाचे वेळी दिसून येत असलेल्या सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या 80% असावी, किंवा इतर कोअर उद्योग प्रकल्पांच्या बाबतीत, धनकोंच्या स्वतंत्र इंजिनियरने केलेल्या प्रकल्प मूल्यमापनाचे वेळी दिसून येत असलेल्या सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या 80% असावी.

(4) सुरुवातीची कर्ज सुविधा देऊ करणारी एनबीएफसी मध्यम मुदतीचे, समजा 5 ते 7 वर्षे कर्ज मंजुर करु शकते. ह्यामधून सुरुवातीच्या बांधणी काळाची, तसेच कमर्शियल ऑपरेशन्स सुरु करण्याच्या तारखेपर्यंतचा (डीसीसीओ) कालावधी व रेव्हेन्यु रँप अप देखील ह्यात समाविष्ट असतील. ह्या कालावधीच्या अखेरीस करावयाची परतफेड (ओरिजिनल ॲमॉर्टायझेशन शेड्युलनुसार उर्वरित शेष प्रदानांच्या विद्यमान मूल्यासमान) ही, तिचे पुनर् वित्तीकरण केले जाईल असे सुरुवातीलाच विहित केले जाण्यासह, बुलेट पेमेंट म्हणून रचित केली जाऊ शकते. ही परतफेड त्याच धनकोकडून किंवा नवीन धनकोंच्या गटाकडून किंवा ह्या दोन्हींच्या संयोजकांकडून, कॉर्पोरेट बाँड देऊन किंवा कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण म्हणून घेतली जाऊ शकते. आणि ॲमॉर्टायझेशन शेड्युलच्या समाप्तीपर्यंत, अशा प्रकारच्या पुनर् वित्तीकरणाची पुनरावृत्ती केली जाऊ शकते.

(5) डीसीसीओमध्ये विस्तार/मुदतवाढ नसल्यास सुरुवातीच्या कर्ज सुविधेचे परतफेड वेळापत्रक सामान्यतः मूळ ॲमॉर्टायझेशन शेड्युलनुसार केलेले असावे. अशा बाबतीत डीएनबीएस.सीओ.पीडी.क्र.367/03.10.01/2013-14, दि. जानेवारी 23, 2014 आणि डीएनबीआर.सीओ.पीडी.क्र.011/03.10.01/2014-15, दि. जानेवारी 16, 2015, मध्ये दिलेल्या विद्यमान सूचनांनुसार, सुधारित डीसीसीओ मूळ डीसीसीओपासून, इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प व बिगर इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी अनुक्रमे दोन वर्षांनी व एक वर्षाने येत असल्यास, केवळ डीसीसीओचा विस्तार करणे हे, काही अटींवर, पुनर्रचना करण्यासाठी विचारात घेतले जाणार नाही. अशा प्रकरणात, डीसीसीओच्या विस्तार काल समान किंवा त्यापेक्षा कमी कालाचा परतफेड शेड्युलमधील बदल (सुधारित परतफेड शेड्युलच्या सुरुवातीच्या व शेवटच्या तारखांसह) हा पुनर्रचना म्हणून विचारात घेतला जाणार नाही - मात्र त्यासाठी, त्या कर्जाच्या अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल झाला नसावा किंवा, त्या विलंबाची भरपाई म्हणून वाढविण्यात आल्या असाव्यात, आणि वरील परिच्छेद 2(3) मध्ये विहित केल्यानुसार संपूर्ण प्रकल्प कर्जाचे ॲमॉर्टायझेशन हे, त्या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या 85% मध्ये/दरम्यान केले जावे[7].

(6) एखाद्या प्रकल्प कर्जाचे ॲमॉर्टायझेशन शेड्युल, 'पुनर्रचना' म्हणून न समजले जाता, वित्तीय बंद (फायनान्शियल क्लोझ) करतेवेळी केलेल्या गृहीतकांच्या तुलनेत, त्या प्रकल्पाच्या प्रत्यक्षात केलेल्या

------------

(7) परिच्छेद 2 (3) मध्ये विहित केलेल्या प्रकल्प कर्जाच्या 80% सिलिंगपासून डीसीसीओ प्रगत करण्यामध्ये विलंब झाल्यास, सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या केवळ 5% शिथिलता उपलब्ध केली जाते. मूळ ॲमॉर्टायझेशन शेड्युल ठरविताना एनबीएफसी त्याचे फॅक्टरिंग करु शकतात.

कामगिरीवर आधारित, त्या कर्जाच्या मुदतीत (डीसीसीओ नंतर) एखादा सुधारित केले/बदलले जाऊ शकते. मात्र त्यासाठी :-

(अ) ॲमॉर्टायझेशन शेड्युल मधील बदलाच्या तारखेस ते कर्ज स्टँडर्ड कर्ज असावे.

(ब) ॲमॉर्टायझेशन शेड्युलमधील बदलापूर्वी व नंतरही त्या कर्जाचे नक्त विद्यमान मूल्य तेच असावे आणि

(क) वरील परिच्छेद 2 (3) मध्ये विहित केल्यानुसार, संपूर्ण आऊटस्टँडिंग कर्जाचे ॲमॉर्टायझेशन, त्या प्रकल्पाच्या आर्थिक जीवनमानाच्या 85% च्या आत[8] केले जावे.

(7) सुरुवातीची कर्ज सुविधा किंवा पुनर् वित्त कर्ज सुविधा कोणत्याही टप्प्यावर एनपीए झाल्यास, पुढील पुनर् वित्त सहाय्य थांबविण्यात यावे आणि एनपीए झाल्यावर ते कर्ज धारण करणा-या एनबीएफसीने, ते कर्ज ओळखणे मान्य करणे आवश्यक असेल व विद्यमान विनियमांखाली आवश्यक असलेल्या तरतुदी करणे आवश्यक असेल. एकदा ते खाते एनपीए दर्जाच्या बाहेर आले की ते खाते, ह्या सूचनांनुसार पुनर् वित्तासाठी पात्र होईल.

(8) सुरुवातीची कर्ज सुविधा किंवा कर्ज सुविधांचे पुनर्वित्त मंजुर करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर, कर्जाच्या प्रत्येक टप्प्यावरील जोखमीच्या समप्रमाणात, एनबीएफसी कर्जांची किंमत ठरवू शकतात आणि अशी किंमत ही त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या दरानुसार असावी.

(9) एनबीएफसींनी त्यांचे हितसंबंध सुयोग्य कागदपत्रे ठेवून व प्रतिभूती निर्माण करुन सुरक्षित ठेवावेत.

(10) त्यांच्या ॲसेट-लायाबिलिटी व्यवस्थापनासाठी एनबीएफसींना, कर्जांच्या नियतकालिक ॲमॉर्टायझेशन्स मधील, तसेच प्रत्येक पुनर्रचना कालावधीच्या अखेरीस आऊटस्टँडिंग कर्जाच्या बुलेट परतफेडीमधील कॅश फ्लोज् हिशेबात घेण्याची परवानगी सुरुवातीला देण्यात येईल. तथापि, मिळालेल्या अनुभवामुळे, येणा-या कालावधीत, एनबीएफसींना, कर्जांच्या अशा ॲमॉर्टायझेशनमधील कॅश फ्लोज्च्या वर्तणुकीबाबत अभ्यास करुन ते कॅश फ्लोज् त्यानुसार एएलएम विवरणपत्रात नोंदवावे/दाखवावे लागतील.

(11) एनबीएफसींनी जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून ओळखावे/जाणीव ठेवावी की, त्या कर्जाला इतर एनबीएफसी/धनकोंचे पुनर् वित्त मिळणार नाही. अशीही संभाव्यता असेल आणि लिक्विडिटीच्या गरजा काढताना व ताणतणावाच्या परिस्थितीला त्यांनी ही बाब विचारात घ्यावी. ह्याशिवाय, इतर एनबीएफसी/धनको ह्यांनी केलेले अंशतः किंवा संपूर्ण पुनर्वित ह्यांची स्पष्ट ओळख पटत नसल्यास, लिक्विडिटी गुणोत्तरे काढण्यासाठी, अशा पुनर् वित्तीकरणापासून येणारे कॅश फ्लोज् हिशेबात घेतले जाऊ नयेत. आणि

(12) असे वित्त सहाय्य करण्यासाठी एनबीएफसीकडे त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेले धोरण असावे.

(3) ह्याशिवाय, एनबीएफसी, इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प व कोअर उद्योग प्रकल्पांना दिलेल्या विद्यमान प्रकल्प कर्जांचे खाली दिलेल्या नॉर्म्सनुसार नियतकालिकतेने पुनर् वित्तीकरण करण्याच्या पर्यायासह, लवचिकतेने रचना करु शकतात.

------

(8) कृपया वरील तळटीप 1 चा संदर्भ घ्यावा,

(1) केवळ प्रकल्पांना दिलेली कर्जे ज्यांच्यामध्ये सर्व संस्थात्मक धनकोंचे, इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्र (आरबीआयच्या इन्फ्रास्ट्रक्चर हार्मोनाईज्ड मास्टर लिस्ट खाली व्याख्या केलेले व कोअर उद्योग क्षेत्रात (भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या, इंडेक्स ऑफ एट कोअर इंडस्ट्रीज (आधार 2004-05) मध्ये समाविष्ट) एकूण एक्सपोझर रु.500 कोटींपेक्षा जास्त आहे, अशा लवचिक पुनर् रचनेसाठी व पुनर् वित्तीकरणासाठी पात्र असतील.

(2) एनबीएफसी, प्रकल्प कॅश फ्लोज्च्या पुनर् मूल्यांकनावर आधारित व कमर्शियल ऑपरेशन्स सुरु केल्याच्या तारखेनंतर (डीसीसीओ), त्या प्रकल्पाच्या जीवनमानातून एकदाच, विद्यमान प्रकल्प कर्जांसाठी, (हे 'पुनर्रचित' म्हणून समजले न जाता) एक नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन वेळापत्रक (शेड्युल) निश्चित करु शकतात - मात्र त्यासाठी

(अ) कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युलमध्ये बदल केल्याच्या तारखेस ते कर्ज स्टँडर्ड कर्ज असावे.

(ब) कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युलमध्ये बदल करण्यापूर्वी व तो केल्यानंतरही त्या कर्जाचे नक्त विद्यमान मूल्य तेच असले पाहिजे.

(क) नवीन ॲमॉर्टायझेशन शेड्युल, सार्वजनिक - खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल खालील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांबाबत, मूळ सवलत कालावधीच्या 85% च्या आत (15% शेष) किंवा पीपीपी नसलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांच्या बाबतीत, युजर चार्जेस/टॅरिफ ठरविण्यासाठी, प्रकल्प मूल्यमापन करतेवेळी दिसून आलेल्या सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या 85% किंवा इतर कोअर उद्योगांच्या बाबतीत, धनकोंच्या स्वतंत्र इंजिनियरने प्रकल्प मूल्यमापन करतेवेळी दिसून आलेल्या सुरुवातीच्या आर्थिक जीवनमानाच्या 85% असावे.

(ड) त्या प्रकल्पाच्या सफलताक्षमतेचे मूल्यांकन एनबीएफसीने केलेले असावे व मार्च 21, 2014 रोजीच्या, फ्रेमवर्क फॉर डिसस्ट्रेस्ड ॲसेट्स इन दि इकॉनॉमी खाली स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र मूल्यमापन समितीने कसून तपासणी केलेले असावे.

(3) वरील परिच्छेद 3(2) अनुसार, नवीन ॲमॉर्टायझेशन शेड्युल निश्चित करण्याच्या तारखेस हे प्रकल्प कर्ज 'पुनर्रचित स्टँडर्ड' म्हणून वर्गीकृत केले गेल्यास व नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युल निश्चित करण्याचा उद्योग 'वारंवार पुनर्रचना' म्हणून समजला न जाता, ते कर्ज 'पुनर्रचित ॲसेट' म्हणून वर्गीकृत करणे सुरुच ठेवले जाईल. अशा ॲसेट्सची बढती (अपग्रेडेशन), नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युल विचारात घेऊन, खात्यांची पुनर्रचना करण्यावरील विद्यमान प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्त्वांनी नियंत्रित असेल.

(4) वर निर्देश केलेल्या नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युल मधील त्यानंतर केलेले बदल. विद्यमान पुनर्रचना नॉर्म्सने नियंत्रित असतील.

(5) प्रकल्पाने वाणिज्य कार्यकृती सुरु केल्यानंतर, एनबीएफसी, प्रकल्प मुदत कर्जाला नियतकालिकतेने (5 ते 7 वर्षे) पुनर्वित्तसहाय्य देऊ शकतात. प्रत्येक पुनर् वित्तीकरण कालावधीच्या अखेरीस असलेली परतफेड ही, (नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युलनुसार उरलेल्या शेष प्रदानांच्या सममूल्य), तिचे पुनर् वित्तीकरण करण्यात येईल. ही बाब सुरुवातीलाच विहित करुन, एक बुलेट रिपेमेंट (परतफेड) म्हणून रचली जाऊ शकते. हे पुनर् वित्तीकरण, त्याच

धनकोकडून किंवा नवीन धनकोंकडून किंवा दोन्हीच्या संयोगाने, पुनर् वित्तीकरण कर्ज सुविधा म्हणून कॉर्पोरेट बाँड देऊन केले जाऊ शकते आणि अशा पुनर्वित्तीकरणांची पुनरावृत्ती, नवीन कर्ज ॲमॉर्टायझेशन शेड्युल समाप्त होईपर्यंत केली जाऊ शकते.

प्रकल्प मुदत कर्जांचे नियतकालिक पुनर्वित्तीकरण करतेवेळी, वरील परिच्छेद 3(2) मधील नक्त विद्यमान मूल्यासंबंधीची तरतुद लागु असणार नाही.

(6) प्रकल्प मुदत कर्ज किंवा कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण कोणत्याही टप्प्यावर एक अकार्यकारी ॲसेट (एनपीए) झाल्यास, त्यापुढील पुनर्वित्तीकरण थांबविले जावे आणि एनपीए झालेले कर्ज धारण करणा-या एनबीएफसी ते कर्ज - तसे झाल्याचे ओळखून, विद्यमान विनियमांखाली आवश्यक असलेल्या तरतुदी कराव्यात. ते खाते एनपीए दर्जाच्या बाहेर आल्यानंतर, ह्या सूचनांनुसार ते पुनर् वित्तीकरणासाठी पात्र असेल.

(7) सुरुवातीची कर्ज सुविधा किंवा कर्ज सुविधेचे पुनर् वित्तीकरण मंजुर करण्याच्या प्रत्येक टप्प्यावरील जोखमींच्या सम प्रमाणात, एनबीएफसी, त्या कर्जाची किंमत ठरवू शकतात आणि ती किंमत, त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेल्या दरानुसार असावी.

(8) एनबीएफसींनी त्यांचे हितसंबंध, सुयोग्य कागदपत्रे ठेवून व प्रतिभूती निर्माण करुन सुरक्षित ठेवावेत.

(9) एनबीएफसींना, त्यांच्या ॲसेट लायाबिलिटीच्या व्यवस्थापनासाठी, कर्जाच्या नियतकालिक ॲमॉर्टायझेशनमधील, तसेच प्रत्येक पुनर्रचना कालावधीच्या अखेरीस असलेल्या आऊटस्टँडिंग कर्जाच्या बुलेट परतफेडीमधील कॅश फ्लोज् हिशेबात घेण्याची परवानगी सुरुवातीला देण्यात येईल. तथापि, मिळालेल्या अनुभवामुळे, येणा-या कालावधीत, एनबीएफसींना, कर्जाच्या अशा ॲमॉर्टायझेशनमधील कॅश फ्लोजचा, वर्तणुकीबाबतचा अभ्यास करुन, त्यानुसार, ते कॅश फ्लोज् एएलएम विवरणपत्रात दाखवावे लागतील.

(10) एनबीएफसींनी, जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून जाणीव ठेवावी की, त्या कर्जाला इतर एनबीएफसी/धनकोंचे पुनर् वित्त मिळणार नाही. अशीही संभाव्यता असेल आणि लिक्विडिटीच्या गरजा काढताना व ताणतणावाच्या परिस्थितीत, त्यांनी ही बाब विचारात घ्यावी आणि

(11) अशा वित्तसहाय्याबाबत एनबीएफसींकडे, त्यांच्या संचालक मंडळाने मंजुर केलेले धोरण असावे.

(4) येथे स्पष्ट करण्यात येते की, एनपीए म्हणून वर्गीकृत झालेल्या इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्योगांना दिलेल्या प्रकल्प कर्जाच्या लवचिक पुनर्रचनेसाठी, वरील साचानुसार एनबीएफसी, दीर्घ मुदतीचे कर्ज ॲमॉर्टायझेशन उपलब्ध करु शकतात. तथापि, असे करणे ही ‘पुनर्रचना’ समजली जाईल आणि त्या ॲसेट्सना ‘एनपीए’ म्हणून समजले जाणे सुरुच राहील. त्या खात्यामधील सर्व आऊटस्टँडिंग कर्ज/सुविधांनी विहित केलेल्या कालावधीत (खात्यांची पुनर्रचना वरील विद्यमान प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वांमध्ये व्याख्या केल्यानुसार) समाधानकारक कामगिरी केली असल्यासच अशा खात्यांना वरचा दर्जा/बढती दिली जावी.

म्हणजे, त्या खात्यामधील सर्व सुविधांवरील मुद्दल व व्याज ह्यांचे सर्व्हिसिंग, त्या कालावधीमधील प्रदानाच्या अटीनुसार केले जाईल. तथापि, वरील परिच्छेद 3 (6) मध्ये विहित केल्यानुसार ते खाते 'स्टँडर्ड' म्हणून वर्गीकृत केले गेल्यावरच, नियतकालिक पुनर्वित्तीकरण सुविधेला परवानगी दिली जाईल.

(5) येथे पुनश्च सांगण्यात येते की, लवचिक रचना व पुनर्वित्तीकरणाचे कार्य केवळ डीसीसीओ नंतरच केले जावे. ह्याशिवाय, ह्या पुनर्रचना मार्गदर्शक तत्त्वांखाली विशेष ॲसेट लाभ मिळविण्यासाठीची एक अट (अधिसूचना क्रमांक डीएनबीएस(पीडी).क्र.272/सीजीएम(एनएसव्ही)-2014, दि. जानेवारी 23, 2014 च्या जोडपत्र 2 चा परिच्छेद 7.2.2 मोराटोरियमसह पुनर्रचित अग्रिम राशीचा परतफेडीचा कालावधी, इन्फ्रास्ट्रक्चर अग्रिम राशींसाठी 15 वर्षांपेक्षा व इतर अग्रिम राशींसाठी 10 वर्षांपेक्षा जास्त नसावा). ह्या परिपत्रकाखाली येणा-या, इन्फ्रास्ट्रक्चर व कोअर उद्योगांना दिलेल्या कोणत्याही कर्जाला लागु असणार नाही.

(6) नियतकालिक कालावधीने, आरबीआय ह्या सूचनांचे पुनरावलोकन करील.

**परिशिष्ट 5**

Branch details Of NBFCs

VALIDATE FORM | EDIT FORM

ADD BRANCH | DELETE BRANCH

| Company Name | | | Company code number (as given by RBI) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Branch Name | Branch Address | City | District | State | Opening Date (dd/mm/yyyy) | Closing Date (dd/mm/yyyy) | Amount Of Public Deposit(*) Rs. in lakhs | Remarks |
| 1 | | | | | | | | | |

* - This column is to be filled only by deposit taking companies, else substitute '0' in place

**परिशिष्ट 6**

## तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजवरील डेटा

| एनबीएफसी कर्जदाराचे नाव | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पॅन | | | | | |
| रिपोर्ट देण्याची तारीख | | | | | |
| शेअर होल्डिंग माहिती | | | | | |
| कंपनीचे नाव | आयएसआयएन | कर्जाच्या विरोधात ठेवलेल्या समभागांची संख्या | कर्ज घेणाऱ्याचा प्रकार (प्रमोटर / नॉन प्रमोटर) | कर्ज घेणाऱ्याचे नाव | कर्ज घेणाऱ्याचे पॅन |
| | | | | | |
| | | | | | |

**जोडपत्र**

## परिपत्रकांची यादी

| अनु.क्रमांक | परिपत्रक क्रमांक | तारीख |
|---|---|---|
| 1 | डीएनबीआर.015/सीजीएम(सीडीएस)-2015 | एप्रिल 08, 2015 |
| 2 | डीएनबीआर (पीडी) 018/ सीजीएम(सीडीएस)-2015 | एप्रिल 10, 2015 |
| 3 | डीएनबीआर 022/ सीजीएम(सीडीएस)-2015 | मे 14, 2015 |
| 4 | डीएनबीआर 025/ सीजीएम(सीडीएस)-2015 | मे 21, 2015 |